# आमचे प्रेरणास्थान



जन्म २२ जून १९२२ - मृत्यू ११ मार्च २००५

**स्व. मीतीरामजी उदेभानजी उपाख्य भाऊसाहेब लहाने**

संस्थापक अध्यक्ष

सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर

# संपादकीय

आमच्या उपरोक्त कला महाविद्यालयाचा हा अठरावा वार्षिकांक आपल्या हाती सोपवितांना कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. 'मोतीपुष्प' या विशेष नामाने तो दरवर्षी आम्ही प्रकाशित करीत असतो.

स्व.भाऊसाहेब लहाने यांच्या दृष्टीसमोर वरिष्ठ महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास करून दर्जेदार उच्च शिक्षणाची सोय पिंजरमध्येच व्हावी हे स्वप्न होते. आमच्या सुदैवाने त्यांच्या डोळ्यासमोरच हे स्वप्न पूर्ण झाले. काळ अनंत आहे. काळाच्या ओघात महाविद्यालयाच्या स्थापनेला सव्वीस वर्षे उलटून गेलीत. या सव्वीस वर्षात अनेक स्थित्यंतरे झालीत. इंटरनेटमुळे आजच्या जगाला खूपच गतीमान केले आहे. दूरशिक्षणाद्वारे अध्यापनाची गती विस्मयकारक वाढली आहे.

दरम्यान महाविद्यालयातील आम्हा सर्व प्राध्यापकांच्या हातून हजारो विद्यार्थी—विद्यार्थीनी पदवी प्राप्त करून विविध क्षेत्रात कार्यरत झालीत. मागे वळून पाहतांना मनात विचार येतो की, या हजारो विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी अर्थार्जनासह त्यांच्या जीवनात स्थिरावलीत. त्याचा निष्कर्ष असा निघतो की, काही शेकडो विद्यार्थी त्यांच्या कुटुंबातील पारंपारिक शेती व पूरक व्यवसाय सांभाळीत आहेत. काही विद्यार्थ्यांनी अन्य व्यवसाय निवडले व ते समाजात स्थिरपणे उभे राहिलेत. काही विद्यार्थ्यांनी शिक्षण घेता—घेता बलोपासनेवर भर दिला परिणामी हे विद्यार्थी पोलीस खाते व सैन्यात विविध हुद्यांवर कर्तव्य बजावीत आहेत.तर पदव्युत्तर शिक्षण घेऊन काही विद्यार्थी व विद्यार्थीनी बॅकेत व पोस्टात रूजू झालेत. त्यातीलच काही विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक व वकील झालेत. ही आमच्या महाविद्यालयाची जमेची बाजू आहे. उर्वरित विद्यार्थी या देशाचे आदर्श नागरिक आहेत. कारण शिक्षणाने त्यांच्यात विवेकीपणा व आदर्श मूल्यांचे संर्वधन करण्याचे कार्य आम्ही केले आहे. शिक्षणाने आलेला विवेकीपणा व उपजत बुध्दिकौशल्यांच्या जोरावर महाविद्यालयाचे निवडक विद्यार्थी समाजासमोर उत्तम वक्ते या बिरूदाने वावरत आहेत. याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो.

'मोतीपुष्प' या वार्षिक अंकाची कल्पना, त्याचे नियोजन व मांडणी तसेच अंतर्गत सजावट व काही नवे उपक्रम याचे संपूर्ण श्रेय आमचे सन्माननीय प्राचार्य डॉ.व्ही.सी. खारोडे सर यांनाच जाते प्राचार्यांच्या मनात सतत महाविद्यालयाच्या उत्कर्षाचा ध्याय असतो. या ध्यासाचे फळ म्हणजे हा या वर्षी प्रकाशित होणारा अंक होय. आम्ही निमित्तमात्र आहोत.

महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांनी, कार्यालयाने वेळेत सर्व माहिती उपलब्ध करून दिली, त्यांचे मी आभार मानतो. विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या अंकासाठी सर्जनशील साहित्य पूरवून खारीचा वाटा उचलला आहे.

**संपादक मंडळ :—** **डॉ. एम.के. फडणीस** **डॉ. ए.व्ही. वाहुरवाघ**
**डॉ. आर.एन. गावंडे** **कु. पल्लवी काळदाते (वि. प्रतिनिधी)**

**प्रकाशक :—** **सुशिक्षण प्रसारक मंडळ, पिंजर ता. बार्शिटाकळी जि. अकोला.**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखकांचे नांव | पृष्ठ क्र |
|---|---|---|---|
| | संपादकीय | | |
| १) | प्राचार्यांचे मनोगत | डॉ.व्ही.सी.खारोडे | १ |
| २) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कार्यातील समन्वय | डॉ.वासुदेव भगत | ३ |
| ३) | नॅक मुल्यांकन : संधी व आव्हाने | डॉ. पंकज तायडे | ११ |
| ४) | मोबाईल फोनचे व्यसन व त्याचे घातक परिणाम | प्रा.रणजित हिवराळे | १८ |
| ५) | महानुभाव संप्रदायातील स्त्री व्यक्तिमत्वाचे पैलू | डॉ.अशोक वाहुरवाघ | २३ |
| ६) | विद्यार्थी जीवनपर मोबाईल का प्रभाव | डॉ. रेखा काळबांडे | ३० |
| ७) | Role of Teachers in Shaping Students' Lives | डॉ.रामकृष्ण गावंडे | ३३ |
| ८) | A Comprehensive Analysis Of Recent Advancements And New Trends Within The Faculty Of Sports: A Case Study On The Maharashtra Athletics Association | डॉ. नानासाहेब सपकाळ | ३६ |
| ९) | सावित्रीबाई फुले सामाजिक व शैक्षणिक कार्य | प्रा.सुनिल मनवर | ४१ |
| १०) | राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल | डॉ.रामकृष्ण गावंडे कार्य.अधिकारी | ४५ |
| ११) | Academic Calender & Action Plan | | ५० |
| १२) | सार्वजनिक सुट्या | | ५३ |
| १३) | सोडून गेल्यावर "Miss you''म्हणण्यापेक्षा सोबत आहे तोपर्यंत "With you"म्हणा | कु.शुभागी कै.काकड | ५४ |
| १४) | एक स्त्री | कु.यमुना ग. देशमुख | ५६ |
| १५) | स्वच्छता अभियान | कु. तेजल पु. सोनोने | ५७ |
| १६) | मैत्री | कु.स्नेहा सु.भारस्कर | ५९ |
| १७) | विचाराचे वेड | कु. वैष्णवी नं.राऊत | ६० |
| १८) | आयुष्य | कु. वैष्णवी नं.राऊत | ६१ |
| १९) | कसं जगायचं | कु.पल्लवी काळदाते | ६२ |
| २०) | छत्रपती श्री. शिवाजी महाराज | कु.पल्लवी काळदाते | ६३ |
| २१) | ज्या मुली लहान कपडे घालतात त्यासाठी एका वडीलाकडून समर्पित | कु. वैष्णवी नं.राऊत | ६६ |
| २२) | असे जगावे | कु.सोनाली राऊत | ६७ |
| २३) | मी चाललो शोधण्यास मला | कु.सोनाली राऊत | ६८ |
| २४) | कणा | कु.सोनाली राऊत | ६९ |
| २५) | मोबाईल [Smart Phone]/ माझा शेतकरी बाप... | कु.सानिका महल्ले | ७० |
| २६) | जाळी.... | कु.सानिका महल्ले | ७१ |
| २७) | माझे राजे.../ बाबा, तुमची परी मोठी झाली. | कु.सानिका महल्ले | ७२ |
| २८) | आई/ वडील/ भाऊ | कु.प्रतिक्षा सं. मेसरे | ७४ |
| २९) | आई/बालपण | कु.पुजा दे. डाबेराव | ७५ |
| ३०) | बाबा/मैत्री | कु.पुजा दे. डाबेराव | ७६ |
| ३१) | मराठी मुलगी | कु.पुजा दे. डाबेराव | ७७ |
| ३२) | मैत्रिणी | कु.शुभांगी कै. काकड | ७८ |
| ३३) | कुणाच्या इतक्याही जवळ जाऊ नये. | कु.शुभांगी कै. काकड | ७९ |
| ३४) | विष्णू थरे/अनाथांची आई सिंधुताई | कु. आरती ब. घुमसे | ८० |
| ३५) | एवढंच मागतेय 'ती' | कु. आरती ब. घुमसे | ८१ |
| ३६) | तू ओट कर | कु.सुनिता मालटे व महेश भेंडकर | ८३ |
| ३७) | छत्रपती शिवाजी महाराज | कु.गायत्री स. अढाऊ | ८४ |
| ३८) | सर्वव्यापी छत्रपती शिवाजी महाराज जीवन व कार्य | कु. निलाक्षी महल्ले | ९१ |
| ३९) | वेचलेले मोती | श्री.भाऊराव पाटील महल्ले | ९६ |

# प्राचार्यांचे मनोगत

आमच्या **भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज**चा हा २०२३—२०२४ चा अठरावा वार्षिकांक आपल्या हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आमचे महाविद्यालय ग्रामीण जनजीवनाशी नाते सांगणारे आहे. संचालक मंडळ, शिक्षण—शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी व भोवतालचे वातावरण हे ग्रामीण मातीशी इमान राखणारे आहे. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण — उच्च शिक्षण देतांना काही मर्यादा येतात. मर्यादांवर मात करण्याचा प्रयत्न आमच्यातील सर्व घटक मनापासुन करीत असतात. स्व.भाऊसाहेबांच्या पुण्यमय कृपा आशीर्वादाचे बळ आमच्या पाठीशी सदैव असतेच. त्यांच्याच आशीर्वादामुळे 'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानून आमची शैक्षणिक वाटचाल चालू आहे. १९९५ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यायाने नॅक बंगलोर द्वारा पहिली चाचणी स्व. भाऊसाहेबांच्या कृतिशील मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पाडली. २०१२ मध्ये नॅक समितीने पुन्हा आमच्या महाविद्यालयाचे परिक्षण केले. त्यावेळेस महाविद्यालयाला १९१ गुण प्राप्त झाले होते. 'सी' हा ग्रेड प्राप्त केल्यावर आम्ही पुनश्च कामाला लागलो.

सप्टेंबर २०१७ मध्ये आमच्या महाविद्यालयाला नॅक समितीने तिसऱ्या सायकलसाठी भेट दिली. सदर समितीचे अध्यक्ष गुजरातचे डॉ. मोहिते सर होते. समन्वयक हिमाचल प्रदेशच्या डॉ. रैना मॅडम होत्या नॅक पिअर टीमचे सदस्य उत्तर प्रदेशातील डॉ. शगुन आनंद सर होते. समीतीने आमच्या ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे कौतुक केले त्यांनी योग्य गुणांकन करून २.११ गुणांसह आम्हाला 'बी' ग्रेड बहाल केला.

आमचे महाविद्यालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत, ग्रामीण भागातून चौथ्या सायकलसाठी पुढे आलेले एकमेव महाविद्यालय आहे. ग्रामीण भागात गुणवत्ता टिकवितांना अनेक अडचणी येतात. प्राप्त परिस्थितीत गुणवत्ता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करतो, भविष्यात या महाविद्यालयातील विद्यार्थी देशाचा उत्तम नागरिक बनावा हे आमचे उदिष्ट आहे. या कामी मला सर्वाच्या सहकार्यांची आवश्यकता आहे. मला हे सहकार्य मिळेल ही खात्रीही आहे.

२०१७—२०१८ या सत्रापासून विद्यापीठाने कला शाखेमध्ये सेमिस्टर पध्दतीचा अवलंब केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही पध्दती अत्यंत जटील त्याचे विपरित दिसून येत आहेत; तसेच चांगले परिणामही दिसत आहेत. जसे की, मार्च—एप्रिल महिन्यातही विद्यार्थी—खास करून सजग विद्यार्थीनी महाविद्यालयात तासिकांसाठी उपस्थित असतात. ही खूप मोठी जमेची बाजू आहे. संपूर्ण मे महिन्यात परीक्षा संपन्न होतील. ही सुध्दा आनंदाची बाब आहे. मी सेमिस्टर पध्दतीच्या यशस्वीतेसाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

महाविद्यालयाचा हिरवागार व नयनरम्य परिसर, खेळाचे मोठे मैदान, रनिंग ट्रॅक, परिपूर्ण इमारत, सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा, संगणकीकृत कार्यालय, अनुभवी व ज्ञानसंपन्न शिक्षकवर्ग ज्ञानप्रकाश कौशल्य विकास केंद्राद्वारा विद्यार्थ्यांना संगणक शिकण्याची अद्ययावत सुविधा, इंग्रजी संभाषणाचे धडे देणारे वर्ग व विविध सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धाचे आयोजन व उत्तेजन या आमच्या जमेच्या बाजू आहेत. परिसरात विशाल वृक्ष उभारण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. त्यासाठी आम्रवृक्ष, नीमवृक्ष, पिंपळवृक्ष, गुलमोहर व अशोकांच्या झाडांची लागवड आम्ही केली आहे. झाडांना पाणी उपलब्ध व्हावे म्हणून वेस्ट वॉटर मॅनेजमेंट, रेन वॉटन हार्वेस्टींग, नवीन बोअरची उभारणी, ठिबक सिंचन पध्दती आदीचा अवलंब आम्ही करतो. या प्रयत्नातून पर्यावरणास

हातभार लावण्याचे सत्कर्म आम्ही करतो याचा आनंद वाटतो.'हिरवागार व स्वच्छ परिसर व विद्यार्थ्यांचे उत्साहाचे झरे' हे आमचे शैक्षणिक ब्रीद आहे. सोबतच महाविद्यालयास अधिक समाजाभिमुख करणे हे अंतिम ध्येय आहे, त्यासाठी मला आपल्या सर्वांचे सहकार्य हवे आहे. आपण सहकार्य कराल ही आशा आहेच.

महाविद्यालयात एखाद्या विषयात विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सुविधा असावी असा महाविद्यालयाचा मानस आहे. उद्‌देश हाच की, ग्रामीण भागातील गरीब, होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात जाऊ शकत नाही. त्यामुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. अशा गरजू विद्यार्थ्यांसाठी एम.ए. पर्यंत शिक्षण सुविधा महाविद्यालयातच देण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू. तसेच महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाची बाब म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयात संशोधन करता यावे म्हणून महाविद्यालयाने 'अर्थशास्त्र विषय संशोधन केंद्र' सुध्दा मिळवले आहे.

सन २०२४—२५ पासून बी.ए. प्रथम ला नविन शैक्षणिक धोरणानुसार प्रवेश करावयाचे आहेत. ही बाब कठिण असली तरी शासनाच्या धोरणाचा एक भाग म्हणून हे काम आम्ही प्रभावीपणे करू व विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करू महाविद्यालयाच्या बाबतीत अंत्यत अभिमानाची बाब म्हणजे महाविद्यालयाने सत्र २०२३—२४ मध्ये नॅक चे चौथे सायकल पूर्ण केले असून महाविद्यालयाला 'बी ग्रेड' (२.०७) मिळाला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाच्या ग्रामीण भागातील महाविद्यालयामध्ये नॅक चौथे सायकल पूर्ण करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे आणि हे केवळ भाऊसाहेबांचा महाविद्यालयाला असलेला आशिर्वाद ह्यामुळेच शक्य झाले आहे.

**डॉ. व्ही. सी. खारोडे**

**प्राचार्य**

**भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश**
**आर्ट्स कॉलेज, पिंजर**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कार्यातील समन्वय

प्रा.डॉ.वासूदेव वा भगत
भाऊसाहेब लहाने महाविद्यालय
पिंजर जि.अकोला
Email:-
wasudeo.bhagat70@gmail.com
मोबाईल नं :- ९४०३४७४३२४

प्रास्ताविक

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन प्रतिकूल परीस्तिथीशी संघर्ष करून अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले आहे. त्या कार्याचा किंवा त्या चळवळीचा संबंध जनमानसाच्या कल्याणाशी संबंधित होता. त्यांनी आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देऊन स्वत: आणि सहकाऱ्यांच्या माध्यमातून अमलात आणले आहेत. त्यांच्याशी विभिन्न आंदोलने तथा चळवळी परत्वे असंख्य जीवाभावाचे विश्वासपात्र लोक जोडले गेले होते. त्यांमध्ये सामान्य जनांची संख्या अगणित होती. त्याचप्रमाणे प्रमुख जाणकार विद्वान आणि तत्कालीन मागास मानलेल्या जाती शिवाय वरिष्ठ जातीतील अनेक प्रमुख नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसोबत कार्य केलेले आहे. त्या अनेक प्रमुख व्यक्ती आणि नेत्यांमध्ये डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या योगादानाशी संबंधित प्रस्तुत लेखाचा विषय आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कार्यातील समन्वयाची मांडणी आणि विश्लेषण समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामूळेच एका बाजूला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीच्या घटना तथा प्रसंग तर दुसऱ्या बाजूला डॉ.पंजाबराव देशमुख यांनी त्या चळवळीला दिलेला पाठींबा, प्रत्यक्ष सहभाग आणि चिकित्सा याचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यांमध्ये अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळवून देण्याबाबत करण्यात आलेल्या सत्याग्रहातील डॉ.आंबेडकर आणि पंजाबराव देशमुख यांच्यातील समन्वय. १९३७ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत सुद्धा त्यांनी समन्वय साधला होता. तसेच भारतीय संविधान निर्मितीच्या कार्यात डॉ.पंजाबराव देशमुखांनी डॉ.आंबेडकरांशी चिकित्सक पद्धतीने साधलेल्या समन्वयाचे विश्लेषण समाविष्ट आहे.

"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ ला महाडच्या चवदार तळयावर आपल्या हजारो सहकाऱ्यांसह अस्पृश्यांना पाणी भरण्याच्या मानवी हक्कासाठी सत्याग्रह केला."[१] त्यापूर्वी डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वात अस्पृश्यता निर्मूलनाबरोबरच मुंबईतील कामगारांच्या न्याय्य मागणीसाठी १९२३ पासून अतिशय व्यापक स्वरुपाचे आंदोलन राबविले होते. तसेच कोकणातील शेतमजूर आणि शेतकऱ्यांमध्ये जाचक 'खोती' पद्धत्ती आणि अन्य समस्याबाबत जागृती घडवून आणली

होती. त्यामुळे डॉ.आंबेडकरांचे कार्य विशिष्ट जातीपुरते किंवा मुंबई शहरापूरते मर्यादित नसल्याचे त्यांच्या एकूण कार्यपद्धतीवरून तत्कालीन जागृत जनतेच्या निदर्शनास आले होते. त्यामुळेच डॉ.आंबेडकरांची लोकप्रियता प्रचंड गतीने सर्वत्र वाढीस लागली होती.त्याच दरम्यान १९२६ ला डॉ.पंजाबराव देशमुख हे सहा वर्षे विदेशात शिक्षण घेऊन अमरावतीत दाखल झाले होते. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजसुधारणेसाठी करण्याचा संकल्प त्यांनी केला. इंग्लंडच्या शिक्षणाने त्यांचे शोषीत पीडितांच्या उद्धाराचे विचार अधिक प्रगल्भ झाल्याचे जाणवले. त्यामुळेच अमरावतीच्या काशीराम बापू देशमुख यांनी केलेल्या सत्कार प्रसंगी भाऊसाहेब म्हणाले होते, “मी जरी बॅरिस्टर झालो तरी पण अनेक बॅरिस्टर झाले नाहीत तर माझ्या एकट्याचा काहीच उपयोग होणार नाही.माझ्या विलायतेचा अनुभव हेच सांगतो की आपल्या रक्ताचा एक एक थेंब,एक एक कण सर्वांच्या अभ्युदयाकरीता खर्च करीत रहा.ज्ञानयज्ञ अखंड चालू दे! ”[२] या अभिप्राय म्हणून केलेल्या विधानातून त्यांच्या मनातील शिक्षण प्रसाराची व्यापक भावना स्पष्ट होते.त्यासाठीच त्यांनी विदेशात असतानाच १९२५च्या जुलै मध्ये श्री शिवाजी मराठी हायस्कूलची स्थापना अमरावतीत करून घेतली होती. ह्या शिक्षण प्रसाराच्या पार्श्वभूमी आणि विचारातून त्यांनी शिक्षण प्रसाराला प्राधान्य दिले. तेव्हाच ऑगस्टला १९२७ मध्ये अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्य हिंदूंना प्रवेश मिळवण्यासाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय अमरावतीच्या सुधारणावादी स्पृश्य व अस्पृश्य समाजसेवकांनी घेतला होता. अंबादेवी मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहात तरुण तडकदार, उच्चविद्या विभूषित डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सहर्ष सहभाग घेतला. मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहासाठी स्थापन करण्यात आलेल्या सत्याग्रह समितीचे अध्यक्ष पद डॉ.पंजाबराव देशमुख यांनाच देण्यात आले होते.

अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह समितीच्या अध्यक्षासह श्री.संपतराव नाईक, व्ही. बी. चौबाळ,नानासाहेब अमृतकर, रा. सा.रणदिवे, दलपतसिंह चौव्हान यांनी अमरावती जिल्हयातील गावोगावी जाऊन सत्याग्रह चळवळीचा प्रचार केला. या संबंधीचा वृत्तांत पंजाबराव देशमुख यांनी स्वत: डॉ.आंबेडकरांना कळविला. त्यांच्या मार्गदर्शनात अस्पृश्यांना अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या पुढील कार्यक्रमाची आखणी सुरु झाली. या संबंधीचा वृत्तांत ‘बहिष्कृत भारत’ मध्ये छापण्यात आला होता. यामधून अमरावतीच्या अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहातील डॉ.पंजाबराव देशमुख आणि डॉ.आंबेडकर यांच्यातील नियोजन, प्रचार व समन्वय निदर्शनास येतो. तसे या चळवळीस १९२५ पासून श्री.माधोराव गोविंदराव मेश्राम यांच्या नेतृत्वात सुरुवात करण्यात आली होती. तथापि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या सहभागापासून विशेष महत्व प्राप्त झाले होते. १९२७ मध्ये अमरावतीच्या बडनेरा येथे, ‘अमरावती जिल्हा सत्याग्रह परिषद’ डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या परिषदेत हजारो लोकांची उपस्थिती लाभून त्यांनी सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी केली होती. तर दुसऱ्या बाजूला सनातनी लोकांनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेश सत्याग्रहाला विरोध करण्यासाठी बैठकी आणि सभा आयोजनाचे सत्र सुरु केले. या बैठका आणि सभा मधून सत्याग्रहाच्या विरोधाबरोबरच सत्याग्रहाचे प्रमुख सूत्रधार डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. मराठा हायस्कूल व मराठा बोर्डिंगच्या विद्यार्थ्यांना अस्पृश्यांच्या मिरवणुकीत बळजबरीने नेतात अशा आशयाची तक्रार पंजाबराव यांच्या विरुद्ध जिल्हाधिकाऱ्याकडे सुद्धा करण्यात आली. मराठा हायस्कूलचे अध्यक्ष डॉ.पंजाबराव देशमुख

जाहीर भाषणात म्हणतात , "अस्पृश्यांच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे जर मराठा हायस्कूल बंद पडणार असेल तर त्याची आम्हा तत्वनिष्ठ लोकसेवकांना परवा नाही."[३] या विधानावरून त्यांची अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळालाच पाहिजे यासंबंधीची तीव्र भावना लक्षात येते. तव्दतच डॉ.आंबेडकरांच्या चळवळीबाबतची प्रामाणिक श्रद्धा आणि विश्वास सुद्धा निदर्शनास येतो. बडनेरा सभेतील ठरावाप्रमाणे अंबादेवी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यासंबंधी अर्ज करण्यात आला होता. त्यावर मंदिर कमिटीने असमाधानकारक उत्तर दिले होते. तरीही शांततामय आणि तडजोडीच्या माध्यमातून अंबेच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळालाच पाहिजे म्हणून काही प्रमुख स्पृश्य पुढाऱ्याच्या माध्यमातून प्रयत्न सुरूच होते. त्याचाच एक भाग म्हणून २६ जुलै १९२७ ला दादासाहेब बागवे यांच्या निवासस्थानी त्यांच्याच अध्यक्षतेखाली सभा भरविण्यात आली होती. सभेला डॉ.पंजाबराव देशमुख आणि रा. गवई यांच्यासह मोठ्या संख्येने अस्पृश्य हजर होते. सभेतील मुख्य चर्चा आणि ठरावाचा सारांश म्हणजे महात्मा गांधी आणि अन्य राष्ट्रीय नेत्यामध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याबाबत एक वाक्यता आहे. तसेच नुकत्याच मोर्शी येथील हिंदुमहासभेच्या परिषदेत सार्वजनिक देवळे व मंदिरे खुली करावी असा ठराव पास केलेला आहे. यासर्व संदर्भाला अनुसुरून मंदिर कमिटीस पुन्हा अर्ज करून श्री.अंबादेवीचे मंदिर अस्पृश्यांना पंधरा दिवसाच्या आत खुले करण्याबाबत अवगत करावे. कमिटीचे उत्तर असमाधानकारक आल्यास अस्पृश्यांनी सत्याग्रह करण्यास तयार असावे. हा वृत्तांत बहिष्कृत भारताच्या १२ ऑगस्ट १९२७ च्या अंकात देण्यात आला होता.

वरील ठरवाला अनुसुरून पाठविलेल्या अर्जाला मंदिर कमिटीने "२१ ऑगस्ट १९२७ ला उत्तर दिले. मंदिर कमिटीला रूढी मोडण्याचा अधिकार नाही. मंदिर कमिटीने अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिल्यास संघर्ष उदभवण्याची दाट शक्यता आहे. सनातन धर्मियांना अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश मान्य नाही. त्याकरिता अस्पृश्यांनी प्रथम सनातन धर्मियांची मानसिकता बदलावी. त्यापूर्वी सत्याग्रह करण्यात आल्यास परिणामास अस्पृश्य आणि अर्जदार जबाबदार राहतील. "[४] अशा आशयाच्या उत्तरा नंतरही अस्पृश्यांबरोबरच डॉ.पंजाबराव देशमुख आणि त्यांचे सहकारी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवण्याच्या मागणीवर ठाम होते. सदरहू घटनांचा अहवाल भाऊसाहेबानी डॉ.आंबेडकरांना कळविला होता. ह्या सत्याग्रहाला अमरावतीच्या मातंग समाजाचा सनातन्यांच्या दबावामुळे विरोध होता. अशा स्तिथीत दोन्ही बाजूंनी निर्माण झालेल्या तणावामुळे अमरावती जिल्ह्यातील सामाजिक वातावरण ढवळून निघाले होते.

अंबादेवीच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळालाच पाहिजे, ही न्याय्य मागणी १९२५ पासून चर्चेत येऊन त्याचे चळवळीत रुपांतर झले होते. १९२७ च्या जुलै पासून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सत्याग्रह कमिटीचे अध्यक्ष म्हणून नेतृत्व स्वीकारले. त्यांच्या नेतृत्वात आणि त्यापूर्वी मंदिर कमिटीला अस्पृश्यांना मंदिर खुले करण्यातबाबत अनेक अर्ज करण्यात आले. तडजोडकमिटीने सुद्धा प्रयत्न केले होते. परंतु रूढीवादी सनातन्यांनी मंदिर प्रवेशाबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला नव्हता. म्हणून शेवटी सत्याग्रह कमिटीला मंदिर प्रवेशाच्या मानवी अधिकारासाठी सत्याग्रह करण्याशिवाय पर्याय नव्हता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' मध्ये अंबादेवी मंदिर

प्रवेशाच्या घडामोडीस प्रसिद्धी देऊन स्वत: या मानवी अधिकाराबाबत प्रभावी लिखाण केले होते. ह्या सर्व घडामोडी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्याच माध्यमातून झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना अंबादेवी मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अमरावतीतील सत्याग्रही यांच्यातील दुवा म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या घडामोडीनंतर डॉ.पंजाबराव देशमुख यांनी प्रत्यक्ष सत्याग्रह करण्यापूर्वी डॉ.आंबेडकरांना अमरावतीस येण्याचा आग्रह धरला.कोणताही विलंब न करता डॉ.आंबेडकरांनी अमरावतीस येण्याची तारीख दिली.

डॉ.पंजाबराव देशमुख यांना डॉ.आंबेडकरांचे कार्यकर्तृत्व आणि महाराष्ट्र तथा देशातील जनतेवरील प्रभाव माहित होता. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेत 'वऱ्हाड प्रांतिक दुसरी अस्पृश्य परिषद' आयोजित करण्याचे भाऊसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यानी निश्चित केले होते. डॉ.आंबेडकर अमरावतीला येणार असल्याची बातमी अमरावती परिसरात पसरली. अंबादेवी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रहात नाव नोंदविलेल्या जनतेमध्ये अतिशय उत्साहाचे वातावरण बनत गेले. तर दुसऱ्या बाजूला मंदिर कमिटीमध्ये संभ्रमाची स्थिती उदभवली होती. अशाप्रकारे डॉ.आंबेडकरांच्या आगमनाची चर्चा अमरावती परिसरातील गावागावापर्यंत पोहचली.

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी जातीने लक्ष घालून 'वऱ्हाड प्रांतिक दुसरी अस्पृश्य परिषदेच्या' आयोजनाची तयारी केली. अमरावती येथील 'इंद्रभूवन थिएटर' परिषदेसाठी निश्चित करण्यात आले. पूर्व नियोजनाप्रमाणे "डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे सहकारी देवराव नाईक, सी .ना.शिवतरकर, रा.दा.कांबळी, दा.वि.प्रधान यांच्यासह १३ नोव्हेंबर १९२७ ला अमरावतीत परिषदेसाठी दाखल झाले. डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली परिषद सुरु झाली. परिषदेस सत्याग्रह समितीचे अध्यक्ष डॉ.पंजाबराव देशमुख, सचिव संपतराव नाईक तसेच बॅरिस्टर तिडके, ग.अ.गवई, चौबळ वकील, एम.एल.सी केशवराव देशमुख, डॉ.पटवर्धन आदी प्रमुख पुढारी उपस्थित होते. परिषदेच्या सुरुवातीस डॉ.पंजाबराव देशमुख यांनी डॉ.आंबेडकरांचा परिचय देऊन अतिशय प्रभावी भाषण केले. अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या निमित्ताने होत असलेल्या परिषदेचे महत्व प्रतिनिधींना समजावून सांगितले. "[५] बहुसंखेने अस्पृश्य सत्याग्रही परिषदेत सहभागी झाले होते.

परिषदेत उपस्थित अन्य मान्यवरांची सुद्धा भाषणे झाली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी परिषदेला संबोधित केले.अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश हा मानवी अधिकार आहे. त्यामुळे मानवतेची खरी जाण असलेले उच्चवर्णीय या सत्याग्रहाच्या चळवळीत सहभागी झाले आहेत. त्यांचे हे कार्य जसे मानवीय आहे. तसेच ते नि:स्वार्थी आणि जबाबदारीचे आहे.म्हणून विशेषता डॉ.पंजाबराव देशमुख आणि त्यांचे उच्चवर्णीय सहकारी धन्यवादास पात्र आहेत. कारण या सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या उच्चावर्णीयावर अनेक खोटे आरोप करण्यात आले आहेत. तरीही ते अस्पृश्यासोबत खंबीरपणे उभे आहेत. इतकेच नव्हे तर डॉ.पंजाबराव देशमुख हे सत्याग्रहाचे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या खंबीर नेतृत्वामुळेच सत्याग्रहाची पुढील दिशा ठरविण्यासाठी आणि अधिकाधिक जनतेचा पाठींबा मिळविण्यासाठी आज ही परिषद होत आहे, असे वक्तव्य डॉ.आंबेडकरांनी सर्वप्रथम केले. शिवाय सत्याग्रहाचे महत्व आणि सत्याग्रह कोणी करावा हे सुद्धा अनेक उदाहरणातून त्यांनी पटवून

दिले. याच आशयावर आधारित अतिशय सखोल मार्गदर्शन डॉ.आंबेडकरांनी केले. त्यांच्या प्रभावी आणि कळकळीच्या भाषणामुळे उपस्थित जनसमुदायात सत्याग्रहाप्रती नवचैतन्य निर्माण झाले. पूर्वनियोजना प्रमाणे १५ नोव्हेंबर १९२७ पासून अंबादेवी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करण्यात येणार होता. “इतक्यात दादासाहेब खापर्डे अध्यक्ष श्री.अंबादेवी देवस्थान अमरावती यांच्याकडून डॉ.आंबेडकरांना पत्र आले येत्या तीन महिन्यात पुराणमतवादी लोकांचे मन वळवून मी हे मंदिर सर्वांसाठी खुले करून देतो, हे पत्र सभेत वाचून दाखविण्यात आले. त्यावर ठराव करण्यात आला. १५ नोव्हेंबर १९२७ पासून तीन महिन्याच्या आत जर देवस्थान कमिटीची तडजोडीची योजना ग्राह्य ठरली नाही, तर सत्याग्रह १५ फेब्रूवारी १९२८ ला सुरु करावा व तो ही सामुदायिक पद्धतीने. दादासाहेबांनी पुराणमतवादी विश्वस्तांचे मन वळवून तीन महिन्याच्या आत श्री.अंबादेवी देवस्थान सर्वासाठी खुले करावे. पुढे खापर्डे यांनी दिलेला शब्द पाळल्याने सत्याग्रहाचा प्रसंग टळला.”[६] स्वजातीचा विरोध पत्करून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी डॉ.आंबेडकरांच्या चळवळीतील अंबादेवी मंदिर प्रवेशाचे नेतृत्व केले होते. त्यांचे हे १९२६ ते १९२८ दरम्यानचे योगदान अतिशय पुरोगामी आणि दूरदृष्टीचे होते. त्यामुळेच डॉ.पंजाबराव देशमुख हे डॉ.आंबेडकरांना साथ देणाऱ्या उच्चवर्णीयातील प्रमुखा मधून एक मानले जातात. मंदिर प्रवेशाच्या चळवळीमुळे डॉ.आंबेडकर आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्यातील मैत्रीपूर्ण वैचारिक समन्वय अधिक वृद्धिंगत झाला.

डॉ.पंजाबराव देशमुख आणि डॉ.आंबेडकर भिन्न जाती समुदायाचे होते.परंतु दोघेही निर्भीड,कृतीशील,पुरोगामी विचाराचे असल्याचा प्रत्यय एकमेकास अंबादेवी मंदिर प्रवेशाच्या चळवळीतून आला होता.त्यामुळेच त्यांच्यात कायम मित्रत्वाचे नाम स्वाभाविकपणे निर्माण झाले.त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची व्याप्ती वाढत गेली.अनेक महत्वपूर्ण विषय त्यांनी हाताळले होते.त्यामध्ये महाड सत्याग्रह, मनुस्मुती दहन,अस्पृश्यांना काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी केलेला सत्याग्रह ह्या घटना विशेष आहेत. शिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची व्याप्ती वाढत गेली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लंडन येथील तीन गोलमेज परिषदेतील कामगिरी आणि महात्मा गांधीच्या उपोषणानंतर झालेल्या पुणे करारामुळे त्यांच्या चळवळीस अंतराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते.या प्रमुख घडामोडी सोबतच शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या समस्या सोडविण्याला त्यांनी प्राधान्य दिले होते.त्यासाठीच त्यांनी ‘स्वतंत्र मजूर’ पक्षाची स्थापना १९३६ ला केली.तत्कालीन मुंबई प्रांतातील अठरा पगड जातीतील नेत्यांनी डॉ.आंबेडकरांना स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्थापनेपासून निवडणुकीत सुद्धा एक दिलाने सहकार्य केले होते.अन्य नेत्याबरोबरच डॉ.पंजाबराव देशमुख यांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्यावतीने वऱ्हाड प्रांताची निवडणूक लढविली.सदरच्या निवडणुकीत डॉ.पंजाबराव देशमुख पराभूत झाले.मुंबई प्रांताच्या अन्य मतदार संघातून एकूण १७ उमेदवार स्वतंत्र मजूर पक्षाचे विजयी झाले होते.प्रत्यक्ष विधिमंडळात आणि जनतेच्या माध्यमातून स्वतंत्र मजूर पक्षाचा बहुजनांच्या हिताचा लढा अनेक माध्यमातून राबविण्यात आला. त्यांमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख यांचा सहभाग तेवढाच सक्रीय होता.

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी तत्कालीन कालावधीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सक्रीय सहभाग घेतला. तर दुसऱ्या बाजूला डॉ.बाबासाहेब शेडयुल कास्ट फेडेरेशनची स्थापना केली.जुलै १९४२ ते १९४६ पर्यंत डॉ.आंबेडकर यांना भारत सरकारमध्ये मजूरमंत्री म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली. या दरम्यानच्या कालावधीत डॉ.पंजाबराव देशमुख आणि डॉ.आंबेडकरांनी शोषित पिडीत बहुजन समाजाच्या उद्धारकार्यात स्वतंत्रपणे दोघेही व्यस्त होते,त्यानंतर ९ डिसेंबर १९४६ पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.पंजाबराव देशमुख भारताच्या संविधान निर्मितीच्या महत्वपूर्ण कार्यासाठी एकत्र आले.

डॉ.पंजाबराव देशमुख यांची संविधान सभेवर कॉंग्रेस पक्ष्याच्याद्वारे वऱ्हाड प्रांतातून निवड झाली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शेडयुल्ड कास्ट फेडरेशनद्वारे पश्चिम बंगाल मधुन घटना समितीवर निवड करण्यात आली. तथापि भारताच्या फाळणीमुळे तो प्रदेश पाकिस्तानमध्ये गेल्यामुळे डॉ.आंबेडकरांचे संविधान सभेचे सदस्यत्व रद्द झाले होते. तरीही त्यांचे कार्यकर्तृत्व आणि कायदेविषयक क्षेत्रातील विद्वता लक्षात घेऊन कॉंग्रेसच्या वतीने मुंबई प्रांतामधून त्यांना बॅरिस्टर जयकर यांचा जागेवर पुन्हा निवडून पाठविण्यात आले. २९ ऑगस्ट १९४७ ला डॉ.आंबेडकरांची संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मसुदा समितीत एकूण सात सदस्य असूनही त्यांच्या गैरहजेरीमुळे डॉ.आंबेडकरांनी एकट्यानेच भारतीय संविधानाच्या मसुद्याला कठोर परिश्रमाने आकार दिला. डॉ.पंजाबराव देशमुख संविधान सभेच्या चर्चेत सहभागी झाले. त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या दबावाला न जुमानता त्यांनी आपले मत स्पष्टपणे मांडले होते. त्यांनी संविधान सभेतील ठराविक प्रस्तावाला स्वमतानुसार विरोध दर्शविला होता.त्यांच्यामते राष्ट्रध्वजावर चरख्याचे चित्र अभिप्रेत होते.संविधानातील ५व्या आणि ६व्या कलमास विरोध करून नवीन नागरिकत्व पाच वर्षाऐवजी बारा वर्षे वास्तव्य असणाऱ्या व्यक्तीलाच नागरिकत्व देण्याची शिफारस केली होती. भारताच्या शासन व्यवस्थेची रचना एकात्मिक स्वरुपाची असावी असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले होते. तसेच भांडवलदार व्यापारी यांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या तरतुदीस त्यांनी कडाडून विरोध केला होता. तर दुसऱ्या बाजूस शेतकरी, शेतमजूर यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या प्रस्तावाचे समर्थन केले होते.

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सर्वच तरतुदीबाबत केवळ टीकात्मक परीक्षण केले नव्हते. डॉ.आंबेडकरांच्या मसुदा समितीद्वारे प्रस्तुत अनेक तरतुदीचे समर्थन सुद्धा केले होते. भारताच्या राष्ट्रपतीला अध्यादेश काढण्याचा अधिकार असावा तसेच राज्यपातळीवर राज्यपालास अध्यादेश काढण्याचा अधिकार असलाच पाहिजे याचे त्यांनी समर्थन केले होते. महालेखापरीक्षकाचे अधिकार, राज्यपालाची राष्ट्रपतीद्वारे नियुक्ती अल्पसंख्यकासाठी स्वतंत्र मंत्रालय असावे. तसेच भारतीय संविधानात नमूद असलेल्या मुख्यमंत्र्याच्या अधिकाराचे त्यांनी प्रभावी समर्थन केले होते. संविधान सभेतील भाषणामधून डॉ.पंजाबराव देशमुख यांनी मसुद्यावर केवळ टीकाच केल्या नसून पाठींबा सुद्धा दर्शविलेला आहे.तसेच त्यांनी केलेले परीक्षण हे अभ्यासपूर्ण अशा स्वरूपाचे होते. त्यांच्या परीक्षणामुळे अनेक महत्वाच्या मसुद्यावर सखोल चर्चा घडून आली. याबाबत डॉ.बाबासाहेब

आंबेडकर घटना समितीतील त्यांच्या शेवटच्या २५ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात त्या संबंधीचा उल्लेख करताना म्हणतात, "राजकीय पक्षाच्या अनुशासनाचे कठोरतेने पालन करण्यात आले असते तर ही सभा "जी हुजुरजी" सभा झाली असती. सौभाग्यवश पक्षात काही विद्रोही पण होते. श्री कामत, डॉ.पी.एस.देशमुख, श्री सिधवा, प्रो.सक्सेना आणि पं.ठाकुरदास भार्गव होते. यांच्या सोबतच प्रो.के.शाह आणि पं.हृदयनाथ कुंझरू यांचाही उल्लेख करावा लागेल जे प्रश्न त्यांनी उपस्थीत केले होते, ते मोठे सैद्धांतिक होते. आणि मी त्यांच्या प्रस्तावांचा स्वीकार करण्यास तैयार नव्हतो, म्हणून त्यांच्या प्रस्तावाचे मूल्य कमी होत नाही. आणि त्यांच्या सेवांचेही मूल्य कमी होत नाही.ज्या सेवा त्यांनी या सभेच्या कार्यवाहीत जिवंतपणा यावा यासाठी प्रदान केल्या.मी त्यांचा कृतज्ञ आहे. जर ते नसते तर मला या संविधानात निहित सिद्धांताची व्यवस्था करण्याची संधीच मिळाली नसती. जी या संविधानाला यंत्रवत पारित करण्याच्या कार्यपेक्षा निश्चितच अधिक महत्वपूर्ण होती."[७] डॉ.आंबेडकरांनी उल्लेख केलेल्या अन्य मान्यवर कायदे पंडितामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख सहभागी होते. संविधान निर्मितीच्या कार्यातील डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचे महत्व विशद केले आहे.संविधान निर्मितीच्या कार्यात दोघांनीही समन्वय साधल्याचे संविधानाच्या डिबेट वरून अधिक स्पष्ट होते. त्यासंबंधीचे ठराविक निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अप्रत्यक्ष समन्वयातील कार्य:- वरील कार्याशिवाय दोघांनीही भारताच्या सर्वांगीण उन्नतीसाठी भरीव योगदान दिल्याचे सर्वश्रूत आहे. डॉ.आंबेडकर आणि डॉ.देशमुख यांनी गरीब जनतेस शिक्षण मिळवून देण्यासाठी विचारांबरोबरच शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षणाचा प्रचार केला. दोघांनीही आपल्या संस्था समाजाला समर्पित केल्या.सर्व जातीतील शेतमजूर, शेतकरी यांच्या समस्या सोडविण्यासाठी सार्वजनिक जीवनाच्या अगदी प्रारंभापासून तर अगदी शेवटपर्यंत दोघांनीही निरंतर प्रयास केल्याचे स्पष्टहोते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवनाचा विशेष पैलू म्हणजे समाज तथा देशाच्या उन्नितीसाठी स्वत:चे सर्वस्व समर्पित केले आहे.दोघांनीही आंतरजातीय विवाह करून जातीभेद निर्मूलनाचे कार्य स्वत:च्या जीवनात अनुसरले. दोघांच्याही राजकारणाचा प्रसंगी राजकीय समन्वयाचा उद्देश शोषणमुक्त समाज निर्माण करणे हाच असल्याचे त्यांच्या कार्यपद्धतीवरून निदर्शनास येते. प्रामाणिकता, नैतिकता, जातीभेद निर्मुलनासाठी प्रसंगी दोघांनीही परिवार, स्वजात आणि स्वजनांचाही विरोध पत्करला होता. उपरोक्त कार्याशी संबंधित चळवळ दोघांनीही स्वतंत्रपणे राबविली आहे.प्रसंगी दोघांचेही राजकीय पक्ष भिन्न होते.परंतु त्यांच्या कार्यातील अंतिम उद्देशामध्ये शोषित पिडीतांचे कल्याण हा समन्वय निदर्शनात येतो.

## संदर्भसूची

१] खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड ३ सुगावा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती ऑगस्ट २००३

पृ.२७

३] नरके.हरी [संपादक] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, डॉ.आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन,

समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई २००८ पृ.१०२.

४] उपरोक्त पृ.८७ ५] उपरोक्त पृ.१३८

६] प्रा.सौ.देशमुख कल्पना. डॉ.पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान,रुचा प्रकाशन, नागपूर, २७ डिसेंबर १९९७ पृ.५

७] अनुवादक प्रा.घोडेस्वार देविदास,संविधान सभा डिबेट्स खंड १० नागपूर, राईट थिंकर प्रकाशन नागपूर पृ.७७७

**सत्र २०२३-२४ मध्ये राज्यशास्त्र विभागाद्वारे राबविलेले उपक्रम**

१) २२ जून २०२३ पालक सभेचे आयोजन
२) दिक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन ११ जुलै २०२३
३) २६ ऑगस्ट २०२३ ला माजी विद्यार्थी संघा द्वारे स्वर्गीय प्रा.डॉ.ए.के.ठाकरे अभ्यासीकेस प्रारंभ
४) माहितीचा अधिकार चर्चा सत्र ०६ ऑक्टोंबर २०२३
५) संविधान दिनाचे आयोजन ३० नोव्हेंबर २०२३
६) मतदार साक्षरता क्लबची स्थापना फेब्रुवारी २०२४
७) उन्नंत भारत अभियान दत्तकग्राम मधील सरपंच आणि ग्रामसेवक यांची कार्यशाळा २९ फेब्रुवारी २०२४

| अ.क्र. | वर्ग | | परीशार्थी | उत्तीर्ण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1) | B.A I | Sem II<br>College Result | 84<br>107 | 72<br>58 | 85.71%<br>54.20% |
| 2) | B.A II | Sem IV<br>College Result | 47<br>59 | 35<br>25 | 74.47%<br>42.37% |
| 3) | B.A III | Sem VI<br>College Result | 60<br>75 | 48<br>51 | 80.00%<br>68.00% |

# नॅक मुल्यांकन : संधी व आव्हाने

**पंकज मा तायडे,**

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयात राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषदेची तत्ज्ञ चमू १५ आणि १६ एप्रिल २०२४ ला येवून गेली. दोन दिवसाच्या मुल्यांकन प्रक्रियेत महविद्यालयाच्या समस्त विभागांचे परीक्षण झाले. परीक्षणातून महाविद्यालय 'ब' श्रेणी मानांकनास पात्र ठरले. सर्व कर्मचाऱ्यांनी उच्चतम श्रेणी मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. मुल्यांकन आणि मानांकन प्रक्रियेत प्राचार्य आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक यांच्यासमवेत कार्य करण्याची संधी मला मिळाली. सदर प्रक्रियेने महाविद्यालय विकसित होण्यासाठी असलेल्या संधी आणि महाविद्यालया समोरील आव्हानांचा परिचय झाला. प्रस्तुत लेखात राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषदेकडून मुल्यांकन करून घेणे का आवश्यक आहे? तसेच मुल्यांकन प्रक्रियेची पद्धती कशी आहे? आणि प्रक्रिया करतांना कोणत्या अडचणी येतात? या प्रश्नांची मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे.

भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज हे पिंजर ह्या अकोला जिल्ह्यातील दुर्गम भागात अध्यापनाचे कार्य करणारी शिक्षण संस्था आहे. या ठिकाणी मानवविद्या शाखेतील शिक्षण दिल्या जाते. महाविद्यालय स्थापनेचा प्रमुख उद्देश ग्रामीण तरुणांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हा आहे. त्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्न करते. विद्यार्थ्यांना अधिकाधिक नाविन्यपूर्ण शिक्षण देत असताना बदल स्वीकारणे ही काळाची गरज आहे. अनुषंगाने प्रयत्न केले जातात पण भौगोलिक स्थितीचा अडथळा आहे. ग्रामीण परिसरात अगदी आधुनिक प्रणाली अस्तित्वात आणल्यास विद्यार्थ्यांच्या सहज पचनी पडत नाही. मुल्यांकन प्रक्रियेत नाविन्यतेला विशेष महत्व देण्यात येत आहे. ग्रामीण तसेच

शहरी महविद्यालय यात कमी पडतात. याचा विपरीत परिणाम मुल्यांकन आणि मानांकनात श्रेणी सुधार न होण्यावर होतो.

## महाविद्यालयांनी मुल्यांकन का करावे ?

वर्तमान काळात शिक्षणाला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक तसेच सामाजिक विकासात शिक्षणाची महत्वपूर्ण भूमिका आहे. समाज शिक्षण घेण्याबाबत जागरूक झाला आहे. आपला पाल्य शिक्षण घेवून आपले समृद्ध जीवन जगला पाहिजे अशी प्रत्येक पाल्याची भावना आहे. त्यासाठी शिक्षणाची मागणी प्रचंड वाढली आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी विविध रोजगारक्षम अभ्यासक्रम अस्तित्वात आले आहेत. अध्यापन आणि अध्ययनाची पद्धती बदलत चालली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने ही बाब अधोरेखित झाली आहे. उच्च दर्जाचे रोजगारक्षम शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची चांगली मागणी आहे. उच्च शिक्षण संस्थेचा दर्जा निश्चीत होणे आवश्यक आहे. दर्जा असलेल्या संस्था समाजाची मागणी पूर्ण करून विद्यार्थ्यांना आपल्याकडे आकर्षित करू शकतात. त्यासाठी उच्च शिक्षण संस्थेने आपले मुल्यांकन आणि मानांकन करून घेतले पाहिजे.

राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषद शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, संशोधन, अध्यापन आणि शिक्षणाचा स्तर इत्यादींच्या आधारावर निश्चित करते. मानांकन करतांना उपलब्ध सुविधा आणि त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे 'अ', 'ब', 'क' या श्रेणी संस्थांना प्राप्त होतात. अश्याप्रमाणे मुल्यांकन झालेल्या संस्था विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय उच्चतर शैक्षणिक अभियान यांचेकडून आर्थिक मदत व इतर सुविधांसाठी पात्र ठरतात. त्यामुळे उच्चतम मानांकन श्रेणी प्राप्त संस्थांना विशेष महत्व आहे. विद्यार्थ्यांकडून अध्यापनासाठी सर्वोच्च श्रेणी असलेल्या संस्थांना सर्वाधिक मागणी आहे. कारण ते उच्च दर्जाचे शिक्षण देतात. परिणामी ज्या संस्था सर्वोत्तम पद्धती लागू करून अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणू

इच्छितात त्यांनी राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषद द्वारे मुल्यांकन करून उच्चतम मानांकन मिळवण्यासाठी प्रयत्न केले जातात.

मानांकन श्रेणी मिळण्याचे निकष निश्चित आहेत. त्यात दर्जेदार मुलभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, व्यवसाय कौशल्य विकसित करणाऱ्या अभ्यासक्रमांची उपलब्धता, विद्यार्थी केंद्रित अध्यापन प्रणाली, विद्यार्थी मूल्यमापन कार्यक्रम, प्रशिक्षित शिक्षक वर्ग, समाज व माजी विद्यार्थी यांच्या विकासात संस्थेची भूमिका, सह-अभ्यासेत्तर कार्यक्रमांची आखणी, समर्पित व्यवस्थापन असे काही ठळक निकष आहेत. अश्या निकषांची पूर्तता करण्यात यशस्वी ठरलेल्या संस्थेस मानांकन मिळते. अंतिमतः महाविद्यालय विकसित होते. म्हणून उच्च शिक्षण संस्थांनी मुल्यांकन आणि मानांकन करून घेणे आवश्यक आहे.

**मुल्यांकन व मानांकन प्रक्रिया**

विद्यापीठ अनुदान आयोग (University Grant Commission) तसेच केंद्रीय शिक्षण मंत्रालय यांनी देशातील सर्व उच्च शिक्षण संस्थांनी मुल्यांकन आणि मानांकन प्रक्रिया पूर्ण करावी असे २०२२ पासून बंधनकारक केले आहे. राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषद (National Assessment and Accreditation Council) कडे सदर जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषद (National Assessment and Accreditation Council) ही भारताच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापित आणि अनुदानित स्वयंशासित संस्था आहे. देशभरातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन आणि मानांकन करण्याचे एकमेव कार्य प्रस्तुत संस्थेकडे आहे. सद्यस्थितीत देशातील एकूण विद्यापीठांपैकी ३६२ विद्यापीठे तर ६१७६ महाविद्यालयांनी ही प्रक्रिया पूर्ण केली आहे. पारंपारिक शैक्षणिक प्रणालींच्या पुढे जावून कौशल्य आणि ज्ञान, दर्जेदार शिक्षण आणि उत्कृष्ट प्रशिक्षण प्रदान करण्यास मदत करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासास हातभार लावणे हे मुख्य उद्दिष्ट उपरोक्त संस्थेचे आहे. त्याचाच परिणाम म्हणून अलीकडे मोठ्या प्रमाणात देशातील उच्च शिक्षण संस्था या प्रक्रियेत व्यग्र असल्याचे दिसून येते. मुल्यांकन

आणि मानांकन करणे ही एक साचेबद्ध प्रक्रिया आहे. अगदी सुरवातीला महाविद्यालये तसेच विद्यापीठे गुणवत्ता प्रमाणित करण्यासाठी परिषदेकडे प्रस्ताव सादर करतात. याला स्वयं अध्ययन अहवाल असे संबोधले जाते. स्वयं अध्ययन अहवालात महाविद्यालयात आयोजित शैक्षणिक आणि शैक्षणिकेत्तर कृती विस्तृत पणे मांडल्या जातात. त्या सर्व अहवालाचा आभासी पद्धतीने परिषद अभ्यास करून संस्थेस प्रत्यक्ष भेटीचे नियोजन करते. संस्थेस भेट देण्यासाठी देशातील उच्चशिक्षण संस्थामध्ये उच्च पदावर काम करण्याचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यांचा 'तज्ञ चमू' (Peer Team) परिषदेकडून स्थापन करण्यात येतो.

उच्चशिक्षण संस्थेच्या भेटीमध्ये स्वयं अध्ययन अहवालात सादर केलेल्या संपूर्ण कृती अहवालांचे तज्ञ चमू परीक्षण करते. यालाच मुल्यांकन असे म्हणतात. मुल्यांकन प्रक्रियेत उच्च शिक्षण संस्थेत उपलब्ध मुलभूत सोयी सुविधा, शैक्षणिक उपक्रम, अभ्यासक्रमाची विद्यार्थ्यांना झालेली उपयुक्तता, शिक्षकांची उपक्रमशीलता, संशोधन कार्य इत्यादी बाबींची पडताळणी केली जाते. संपूर्ण पडताळणी नंतर तज्ञ चमू राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषदेस आपला अहवाल सादर करते. प्रस्तुत अहवालावरून उच्च शिक्षण संस्थेचे गुणपत्रक तयार करून श्रेणी बहाल करण्यात येते. मिळालेल्या श्रेणी वरून संस्थेची गुणवत्ता सिद्ध होते. मानांकन श्रेणी 'अ++', 'अ+', 'अ', 'ब++', 'ब+', 'ब', आणि 'क' अश्या प्रकारे गुणवत्तेनुसार दिल्या जातात.

**संधी –**

मुल्यांकन आणि मानांकन प्रक्रिया राबवल्या मुळे उच्च शिक्षण संस्थांना अनेक संधी प्राप्त होतात. सर्वात पहिली संधी म्हणजे उच्च पातळीचे श्रेणी प्राप्त झाल्यास केद्रीय शैक्षणिक धोरणा नुसार महाविद्यालय विकासासाठी अनुदान प्राप्त करता येते. संस्थेच्या विकासात आर्थिक मदत फार महत्वाची असते. विद्यापीठ अनुदान आयोगाने आर्थिक मदत करण्यास आखडता हात घेतला. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आर्थिक मदत करते पण त्याकरिता

'ब+' श्रेणी किंवा त्यावरील श्रेणीने मानांकन होणे आवश्यक आहे. विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतांना ज्या महाविद्यालयास उच्च मानांकन श्रेणी मिळाली आहे त्याच महाविद्यालयास प्राधान्य देतात. म्हणून ही प्रक्रिया केल्यास अधिकाधिक विद्यार्थी महाविद्यालयाकडे आकर्षित होतात. उच्च मानांकित महाविद्यालयात नोकर भरती साठी उद्योग कार्यक्रमांचे आयोजन करतात ही चांगली गोष्ट आहे. शिक्षकांना दर्जेदार संस्थेत काम करण्याची संधी मिळाल्यामुळे उत्तरोत्तर शैक्षणिक विकास करण्याची क्षमता विकसित होते. महाविद्यालय विकासाच्या अधिकाधिक योजना आखण्यास वाव मिळतो तसेच संस्थेचे सामाजिक उत्तरदायित्व पूर्णत्वास जाते.

अश्याप्रकारच्या अनेक संधी मुल्यांकन आणि मानांकन प्रक्रिया केल्यामुळे प्राप्त होतात. ह्या सर्व संधी महाविद्यालयाला विकसित होण्यास महत्वाची भूमिका बजावतात. मुल्यांकन प्रक्रियेमुळे महाविद्यालयात नवचैतन्य येते. अध्यापन आणि अध्ययन पद्धतीतील बदलांचा परिचय होतो.

**आव्हाने-**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद ही भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. उच्च शिक्षण संस्थांसाठी मान्यता हा एक आवश्यक बेंचमार्क आहे कारण ते त्यांची विश्वासार्हता आणि शिक्षणाची गुणवत्ता स्थापित करण्यात मदत करते. तथापि मान्यता मिळवणे हे सोपे काम नाही कारण त्यात अनेक आव्हाने आहेत.

**दस्तऐवजीकरण (Documentation):**

मुल्यांकन आणि मानांकन प्रक्रियेतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे दस्तऐवजीकरण. मुल्यांकन प्रक्रियेत संस्थात्मक माहिती, स्वयं-मूल्यांकन अहवाल, शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण अहवाल आणि विद्यार्थ्यांच्या अभिप्रायासह मोठ्या प्रमाणावर

दस्तऐवजांची आवश्यकता आहे. ही कागदपत्रे तयार करणे वेळखाऊ असू शकते आणि त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. या प्रयत्नात अध्यापन कार्य प्रभावित होते.

**शिकवण्याची आणि शिकण्याची गुणवत्ता:**

राष्ट्रीय परिषदेची तज्ञ चमू संस्थेतील शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करते. जे एक महत्त्वपूर्ण आव्हान आहे. शिकवण्याची आधुनिक पद्धती आत्मसात करून अध्यापन क्रिया राबवावी लागते. त्यासाठी सर्व शिक्षक त्यांच्या विषयांमध्ये सुयोग्य, अनुभवी, तज्ञ आणि कुशल असावे लागतात. पण सद्यस्थितीत हे सर्व बदल करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था मात्र उपलब्ध नाहीत. प्रसंगी त्या ग्रामीण शिक्षकांपर्यंत पोहचू शकत नाहीत.

**नाविन्यपूर्ण उपक्रमांचा अभाव:**

नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे सर्वच संस्थांना आवश्यक आहे. याशिवाय चांगले मानांकन मिळू शकत नाही. मानवविद्या शाखेला असे उपक्रम रावणे शक्य होत नाही. अश्या उपक्रमांना विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेत चांगला वाव असतो पण मानवविद्या शाखेला मात्र अडचणीचे ठरते.

**पायाभूत सुविधा:**

मुल्यांकन करणाऱ्या संस्थेकडे वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, तंत्रज्ञानाची उपलब्धता, क्रीडा सुविधा, स्वच्छता गृह, शुद्ध पिण्याचे पाणी इत्यादी पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या असाव्यात आणि राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषदेने ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता केली पाहिजे. सर्वच उच्च शिक्षण संस्था उपरोक्त पायभूत सुविधांची निर्मिती करू शकत नाहीत. परिणामतः मानांकन प्रक्रियेत सदर संस्था मागे पडतात.

**आर्थिक अडचणी:**

विकास प्रक्रियेत भांडवल महत्वाची भूमिका बजावत असते. संस्थांना त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी पुरेशी आर्थिक सुबत्ता असणे आवश्यक आहे. शासनाच्या अनुदानाची कमतरता तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांची कमतरता आर्थिक अडचणी निर्माण करते. याचा प्रत्यक्ष परिणाम संस्थेच्या विकासावर होतो. संस्थेच्या आर्थिक संसाधनांचे आणि महसूल निर्माण करण्याच्या क्षमतेचे मूल्यांकन परिषद करते. यात संस्था कमी पडल्यास मानांकनात दर्जा कमी होतो.

राष्ट्रीय मुल्यांकन आणि मानांकन परिषदेकडून उच्चतम श्रेणी मिळवणे हे भारतातील उच्च शिक्षण संस्थांसाठी एक महत्त्वपूर्ण आव्हान आहे. त्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, दस्तऐवजीकरण आणि संसाधन व्यवस्थापन आवश्यक आहे. तथापि, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून आव्हानांवर मात करता येते.

-----*****-----

# मोबाईल फोनचे व्यसन व त्याचे घातक परिणाम

**प्रा.रणजीत अशोक हिवराळे**
**(समाजशास्त्र विभाग)**

आधुनिक काळातील शस्त्र म्हणजे मोबाईल परंतु याच मोबाईलचा घातक परिणाम आज समाजामधील सर्व दूर पसरत चालला आहे. लहान मुलांपासून तर अगदी वयोवृध्दांपर्यंत हे व्यसन खोल रूजत चालले आहे. यावर जर वेळीच आवर घातला नाही, तर येणाऱ्या काळामध्ये आपल्याला अनेक रोगांनी पिडीत असलेले लोक समाजाध्ये दिसतील. ज्यांच्यासाठी एक स्वतंत्र विभाग तयार करावा लागेल, जो असणार आहे मोबाईल व्यसनाचा. आज जगातील दोन कोटी हून अधिक लोक मोबाईल फोन आणि सोशल मीडियावर व्यसनी आहेत. भारतातील लोक दररोज सुमारे पाच तास मोबाईलवर घालवतात. अशा परिस्थितीत स्मार्टफोनच्या व्यसनाची संबंधित मानसिक रोगाचीही समस्या वाढत चालेली आहे. आज—काल स्मार्टफोन हा बहुतेक लोकांच्या हातामध्ये आपल्याला पहावयास मिळतो जिकडे नजर जाईल तिकडे मोबाईल फोन हाती असलेला व्यक्ती आपल्याला दिसतो.

व्यक्ती हा मोबाईलचा वापर करून ऑनलाठन घरबसल्या काम करू शकतो. त्यामुळे त्याचा प्रचंड वापर वाढला आहे. जगातील मोठ्या संख्येने लोक स्मार्टफोनचे व्यसनी बनले आहेत. स्मार्टफोनच्या वापरामुळे लोकांचे डोळे कमकुवत होत आहेत आणि अनेक मानसिक आरोग्य संबंधी समस्या निर्माण होत आहेत. फोन आपल्या तणवाचाी पातळी वाढवू शकतो आणि चिंता आणि नैराश्यासारखे गंभीर समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. अश परिस्थितीमध्ये प्रत्येकाने त्याचा अतिरेक करणे टाळावा. अनेक ठिकाणी मोबाईल व्यसन मुक्ती केंद्र सुध्दा निघालेली आहेत. या सर्वांमधून मोबाईलचे व्यसन कमी झाले पाहिजे. याकरिता अनेक उपाय आपण करू शकतो परंतु सर्वात मोठा उपाय म्हणजे त्यावर मनाचा पगडा.

आपण ठरवले की दररोज एक तास मोबाईल कमी वापरणार तर हळू आपण याचे तास कमी करत नेऊन जर मोबाई फोनचा वापर हा कामापुरता म्हणजेच ठराविक वेळेमध्ये जर सुरूवात करायला सुरूवात केली. तर हळूहळू आपल्या असे लक्षात येईल की, आपण ज्याप्रमाणे नशे मधून बाहेर येतो. त्याचप्रमाणे आपल्या मनावरचा जो ताण आहे, तो हळू कमी होत जाईल. आज खरी गरज मोबाई मुक्ती किंवा मोबाईलचे व्यसन कमी करणे हे उद्देश आपल्या नजरेसमोर आता असले पाहिजे, हळूहळू काही व्यसने निघून जातात. परंतु मोबाईल एक असं व्यसन आहे की, जे लहान पासून तर मोठ्या पर्यंत सर्वांना जडलेला आहे. यावर वेळीच उपाय जर केला नाही. तर अनेक गंभर आजारांना तुम्हाला सामोरे जावे लागेल. टेलिफोन अवलंबित्व म्हणजे

स्मार्टफोनचा वेडेपणा. विशिष्ट वर्तणुकीशी अवलंबित्व सहसा ''नोमोफोबिया'' किंवा मोबाईल उपकरणाशिवाय असण्याची चिंता असे नाव दिले जाते.

संध्या, ग्रहावर ३.८ अब्ज मोबाईल फोन वापरकर्ते आहेत. व्हर्जिन मोबाईलने प्रकाशित केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, त्या अब्जावधी स्मार्टफोन वापरकर्त्यांना एका दशकापूर्वीच्या तुलनेत ४२७% अधिक संप्रेषणे आणि सूचना मिळतात. याव्यतिरिक्त, ते २७८% अधिक मजकूर पाठवतात. आधुनिक जीवनासाठी फोनचा वापर ही नैसर्गिक गरज भासते; तथापि, याळे चिंता आणि नकारात्मक परिणाम देखील होऊ शकतात. अशा उपकरणांच्या विशेष अतिवापरामुळे ग्राहकांना त्यांच्या मोबाईलच्या सवयींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. Google Trends नूसार २००४ पासून, ''मोबाईल फोन व्यसन'' साठी शोध वाढत आहेत. समईफानेमध्ये प्रवेश केल्याने माहिती उपलब्ध करून जीवन सोपे होऊ शकते. अस असले तरी, सुविध खर्चात येते. डिव्हायसेस काळजीपूर्वक डिझाइन केले आहेत की खाली ठेवणे कठीण आहे. त्यांचे रंग, आवाज आणि कंपने याद्वारे, तंत्रज्ञान आपल्या वापरकर्त्यांना हेतुपुरस्सर गुंतवून ठेवते. मागील Google डिझाइन नीतिशस्त्रज्ञ ट्रिस्टन हॅरिसवर आधारित, ''पुल टू रिफ्रेश'' सारखी वैशिष्ट्ये स्लॉट्स आणि इतर कॅसिनो व्हिडिओ गेमद्वारे प्रेरित होती. डिझायनर आणि तांत्रिक अभ्यिंते वापरकर्त्यांना त्याचे वेड लावण्यसाठी डिव्हाइसचे प्रत्येक पैलू काळजीपूर्वक विकसित करतात. सतत फोन वापरणे हा खरोखरच अलीकडे विकसति झालेला अवलंबित्व अमोबाईल.

अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन खरोखर अधिकृतपणे विशिष्ट समस ओळखणार नाही. तरीही, जागतिक स्तरावर अनेक वैद्यकीय तज्ञ आणि संशोधक याला वर्तणूक अवलंबित्व म्हणून ओळखतात. बऱ्याच अभ्यासांवर आधारित, काललांतराने, मोबाईल फोनचा विशेषत: समप्रित वापर बदलू शकतो आणि व्यक्तीवर नकारात्मक परिणाम करू शकतो, जसे की जुगार.

**फोन आणि मोबाईल फोनचे व्यसन यामुळे होऊ शकते :**

- झोपेची कमतरता.
- कमी एकाग्रता.
- सर्जनशीलता अवरोध.
- वाढेलेली चिंता.
- कमी आकलनशक्ती.
- ताण.
- एकटेपणा.
- असरक्षितता.
- बिघडलेले संबंध.
- खराब ग्रेड.
- मानसशास्त्रीय विकार.

सतत फोनचा अतिवापर केल्याने मेंदूतील रिवॉर्ड सर्किट्स रासायनिक पध्दतीने बदलण्यासाठी निश्चितपणे चाचणी केली जाते. सामान्यत: पीडित न्यूरोट्रांसमीटरपैकी एक म्हणजे गॅबापेंटिन (GABA). GABA एक चांगला प्रतिबंधक न्यूरोट्रांसमीटर आहे जो सुखदायक किंवा आनंददायी प्रभाव निर्माण करेल. हे भीती आणि चिंता नियंत्रित करू शकते.

इनहिबिटर घटकांच्या वापरास पुरस्कृत करून आणि व्यसनाधीन वर्तनांना मजबुती देऊन सवयीमध्ये महत्वाची भूमिका बजावते. मनातील राखाडी पदार्थ मुख्य मज्जासंस्थेशी जोडलेले

असते. जी व्यक्तीना हालचाल, साठवण आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. अलीकडील अभ्यासात फोनच्या सवयीसह सहभागींच्या मंदूचे स्कॅनिंग केले गेले. आणि त्यांच्या मेंदूच्या राखाडी रंगात मोठां बदल झाल्याचे समजले. संशोधकांच्या मते, मनाचे आरोग्य आणि आकार ड्रग्स वापरणाऱ्यांच्या मनासारखे होते. त्यांच्या फोनचे व्यसन असलेल्या लोकांमध्ये राखाडी पदार्थचे प्रमाण गंभीर भागत कमी केले जाते, हा आजार अशाच प्रकारे पदाथ्र वापर विकार असलेल्या व्यक्तीमध्ये दिसून येतो. हे लक्षात घेणे फार महत्त्वाचे आहे की अलिकडच्या वर्षात किशोरवयीन मुलांमध्ये मोठ्या नैराश्य आणि अत्महत्यांमध्ये वाढ झाली आहे, फोन व्यसनाशी संबंधित आहे.

किशोरवयीन मुलींना विशेषत: संवेदनाक्षम असतात. सेटर्स फॉर कंडिशन कंट्रोल अँड अवॉयडन्स (CDC)नुसार, २०१० आणि २०१५ दरम्यान, आत्महत्येचे प्रमाण ६५% ने वाढले. त्याच वेळी, मुलींमध्ये तीव्र नैराश्याचे प्रमाण ५८% वाढले. अनेक शास्त्रज्ञांच्या मते आत्महत्येतील वाढ हे टेलिफोन व्यसनाच्या नकारात्मक परिणामांचे थेट प्रतिनिधित्व आहे.

फोन व्यसनाची चिन्हे आणि लक्षणे

सध्या निरोगी आणि सक्तीच्या सेल्युलर वापरामध्ये एक मोठी ओळ अस्तित्वात आहे. विशिष्ट उपकरणावर जास्त अवलंबून राहिल्याने मोबाइल अवलंबित्व येऊ शकते. औषधाशी संबंधित विशिष्ट नॅशनल लायब्ररीने प्रकाशित केलेल्या अभ्यासपूर्ण नोंदीनुसार एकूण रहिवाशांशी संबंधित ६.३% लोक त्यांच्या स्मार्टफोनशी जोडलेले आहेत. ३० वर्षाखालील मुलांमध्ये गैरवर्तनाचा विशिष्ट नमुना सर्वात मोठा आहे. सरासरी १६% किशोरवयीन मुलांमध्ये आकडा आहे.

जरी दीर्घकाळ टेलिफोन वापर व्यापक आहे, तरीही एखादी व्यक्ती ''सामान्य'' फोन वापर आणि फोन व्यसन यांच्यात फरक कसा करू शकतो?

एखाद्याला फोन अवलंबित्वाची लक्षणे आहेत की नाही हे ओळखण्यासाठी येथे काही मार्ग आहेत:

- स्मार्टफोन वापराबद्दल खोटे बोलणे.
- मला चिंता व्यक्त करायला आवडली.
- काम, कॉलेज किंवा घरी जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात दुर्लक्ष किंवा समस्या देखील.
- फोन वापरण्यात खूप जास्त वेळ जातो.
- चिंतुमेळे लोकांची प्रोफाइल वारंवार तपासत आहे.
- अपघात किंवा दुखापती प्रामुख्याने फोन वापरामुळे होतात.
- कार्ये पूर्ण करण्यासाठी नंतर कार्य करा.
- असुरक्षित किंवा अस्तित्वात नसलेले परस्पर जीवन.
- पियजनांद्वारे अलगाव.
- कनेक्शनच्या अनुपस्थितीची भावना.
- फोन वापरात व्यत्यय येऊ शकतो अशा घटनेत राग किंवा चिडचिड.
- मी माझा फोन तपासण्यसाठी रात्री अंथरूणातून बाहेर पडलो.

- एका विशिष्ट क्षणी तुमचा फोन मिळवणे हे पूर्णपणे कंटाळवाणे आहेत.
- फॅन्टम कंपने (विशिष्ट फोन बज करू नयक म्हणून विचार करणे.)
- फोन वापरण्यासाठी मर्यादित करणे कठीण आहे.
- स्मार्टफोन किंवा आणखी एका डिव्हाइसवर प्रवेश करण्याची इच्छा आहे.
- भीतीचा संबंध हरवण्याशी आहे.

हे लक्षात ठेवण्यासाठी महत्वाची आहे की सध्या फोनचे व्यसन दर्शविणारी कोणतीही विशिष्ट वेळ, वारंवारता किंवा संप्रेषण पाठवले जात नाही. तथापि, ओव्हर—इंडिकेटर तयार करणे हे विशिष्ट अंतर्निहित समस्येचे चांगले सूचक आहे.

फोन व्यसन उपचार

मोबाईल फोन व्यापक आहे. तरीही, समस्थेचा सामना करण्यासाठी आणि उपचार करण्यासाची पध्दती आहेत. काही विशिष्ट केंद्रें आहेत जी मदत करू शकतात. या डिटॉक्स सुविधांशी संबंधित काही लोक त्यांच्या स्वत:च्या रूग्णांना या विशिष्ट डिजिटल व्यसनापासून मुक्त होण्यासाठी विविध अनुप्रयोग वापरतात.

मोबाईल फोन व्यसनावर उपचार करण्यासाठी सुविधांद्वारे वापरल्या जाणाऱ्या काही उपचार पध्दती येथे आहेत:

- संज्ञानात्मक — वर्तणूक थेरपी.
- गट थेरपी.
- विवाह किंवा जोडप्यांचे समुपदेशन.
- गट समर्थन (उदा., इंटरनेट टेक व्यसन अनामित)
- मानसोपचार.
- प्रेरक मुलाखत
- औषधोपचार सहाय्यक उपचार.

जरी स्मार्टफोन हे एक विलक्षण संसाधन असले तरी, ते विशेषत: मुलासाठी आणि तरूण प्रौढांसाठी संभाव्य धोकादायक साधने देखील असू शकतात. अत्याधिक फोन वापरामुळे उभ्दवणाऱ्या समस्यांचे विशिष्ट प्रमाण पूर्णपणे समजलेले नाही. तथापि, विज्ञान सेल्युलर फोन वापराशी आरोग्य समस्यांना जोडत असल्याने, सकारात्मक असणे आवश्यक आहे.

जर तुम्हाला तुमची किंवा तुमच्या काळजी असलेल्या कोणाची काळजी अमोबाईल, तर तुम्ही करू शकता अशा काही गोष्टी आहेत. फोन कोणत्याही व्यक्तीचा जीव घेऊ देऊ नका. पुनर्प्राप्तीच्या दिशेने एक सशक्त पाऊल उचला, शक्यतो एक संक्षिप्त कालावधी रेखांकित करून जद्वारे सर्व—आऊट ''फोन डिटॉक्सिफिकेशन'' पूर्ण होईल. जर ते तुमच्यासाठी किंवा समस्या असलेल्या व्यक्तीसाठी शक्त नमोबाईल तर, आमच्या समस्यांबद्दल जागरूक राहून आणि आम्ही शक्त तितक्या चांगल्या प्रकारे आमच्या वर्तनाचे निरीक्षण करून, काहीवेळा या समस्येबद्दल जास्तीत जास्त जागरूकता आणा. शिवाय, सर्वोत्तम उपचार शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. मुंबईत आभासा पुनर्वसन केंद्रासारी काही उत्तम पुनर्वसन केंद्रें आहेत, जिथे तुम्हाला सर्वोत्तम सुविधा आणि उपचार मिळू शकतात.

## Annual report of Career Katta 2023-2024

The career katta committee of our college actively organized various activities in the session 2023-2024 for the students. The report of various activities is as below.

**Awareness camp-**

Career katta committee organized awareness session for the newly admitted first year students. In this session total 32 students registered in career katta.

**Memorandum of Understanding**

The career kata of our college have done five memorandum of understanding with MITSC Kolhapur on "Police pre-recruitment training. Add-on courses, Skill Development center, Center for excellence, innovation and Incubation center for three/five year period.

**Add on courses**

Students of our college have regularly completed add on courses like Communication Skill Development and Leadership Development with good grade.

**One-day Seminar**

Career katta, of our college in collaboration with Economics department and Disha foundation Murtijapur, organized the one-day seminar on 'Guidance on Competitive Examination and Opportunities in Various Fields for students on dated 14/12/2023. Shri Pawan Raut told that all opportunities in various field and gave guidance on which things are necessary for preparing for competitive examination andhow to face interview. Students get benefited from above workshop.

- State level Competition-Our College got Second prize from District level category in state levelcompetition organized by MITSC
- Emotional Intelligence- online faculty development program
- Voice Care workshop-Voice care workshop for teachers attended on 28/12/2023 at Khamgaon.
- Financial Literacy-Students of our college had completed financial literacy program.

- Digital productivity-Students of our college had completed digital productivity program.
- State level Competition-Our college coordinator got third prize Prof. Ranjit Ashok Hiwrale from Akola District level category in state level competition organized by MITSC 2023-24,

# महानुभाव संप्रदायातील स्त्री व्यक्तित्वाचे पैलू

**डॉ.अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ**
भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश
आर्टस कॉलेज, पिंजर.
ता. बार्शिटाकळी जि. अकोला, महाराष्ट्र
महाराष्ट्र Mob. 9767615292

महाराष्ट्रात मुकुंदराजा नंतर आणि ज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर महानुभाव संप्रदाय हा उदयास आलेला आहे.**'महान अनुभवोस्तेजा बलं वा यस्य स:महानुभाव:'** या दृष्टीने मोठा तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग तो महानुभाव संप्रदाय किंवा पंथ असे आज संबोधले जाते. परंतु या संप्रदायाचे मूळ नाव परमार्ग आहे.

**महानुभाव** हे नाव प्रथम एकनाथांनी वापरले असल्याचे मत अभ्यासक, समीक्षक शं.गो. तुळपुळे म्हणतात.महानुभाव पंथाचे मूळ पुरुष गोविंदप्रभू उर्फ गुंडम राऊळ आहेत. परंतु पंथाचे प्रणेते मात्र चक्रधर स्वामी आहेत. चक्रधर स्वामींचा कालखंड हा इ.स. **११९४ ते १२८२** चा आहे. या कालखंडात महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता अस्तित्वात होती. यादवांच्या आश्रयामुळे महानुभाव संप्रदाय झपाट्याने प्रसार पावला. महाराष्ट्रात यादवांच्या काळात समाजात चातुर्वर्ण्याची मिरासदारी वाढलेली असताना चक्रधर स्वामींनी शंकराचार्य व रामानुजाचार्य यांच्या तत्त्वज्ञानाचा मिलाफ करून, ज्ञान आणि भक्ती यांची सांगड घालून आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. त्यामुळे सामान्य देवतांचे प्रस्थ कमी झाले. सोबतच देवतांच्या पुजेचा निषध केला आणि चातुवर्ण व्यवस्थेवर हल्ला चढविला. संपूर्ण अहिंसा आणि कडकडीत वैराग्य यांचे पालन आपल्या संप्रदायात अपरिहार्य मानले. धर्माचे रहस्य, तत्त्वज्ञान बोलीभाषेतून सांगण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. विशेष म्हणजे आपल्या संप्रदायात त्यांनी शूद्र, ब्राह्मण, क्षत्रिय यासोबतच स्त्रियांना सुद्धा सन्यास घेण्याची मुभा ठेवली. ज्या वेळी महाराष्ट्रात यादवांची सत्ता होती त्या काळात स्त्रियांना समाजात मानाचे अजिबात स्थान नव्हते.अशा परिस्थितीत चक्रधर स्वामिनी स्त्रियांना सामाजिक व धार्मिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यामुळे विविध स्तरातील बहुसंख्य स्त्रिया या संप्रदायास येऊन मिळाल्या. पुढे याच स्त्रियांनी महानुभाव संप्रदायात मराठी साहित्याच्या दृष्टीने मोठे योगदान दिले.आज तेच योगदान मैलाचा दगड ठरले आहे.

खरे पाहता स्त्री आणि पुरुष ही निसर्गवेली आहेत. दोघांमध्ये परस्परांपेक्षा वेगळे पूरक गुण आहेत. त्या गुणांचा उपयोग नेटकेपणानं झाला तर मानवाची - समाजात देशाची उन्नती होणे सहज शक्य आहे. हे तत्त्व संतांनी, थोरामोठ्यांनी जाणले . त्यामुळे त्यांची भूमिका समन्वयाची दिसते. त्यांच्या परिवारात पुरुषांबरोबर स्त्रियांचाही समावेश आहे. मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, मीराबाई, कान्होपात्रा, आनंदमयी माँ लल्लेश्वरी, भावंडीबाई, गोपा, गौतमी, आम्रपाली, संघमित्रा, मरुदेवी, मल्लिनाथा, आर्या,चंदना, जयंती,

क्लेअर, रोझ, राबिया या सारखी वारकरी, जैन, ख्रिस्ती, सुफी पंथातील नावं भराभर नजरेसमोर येतात. महानुभाव पंथात महदायिसा, एल्हाइसा, बोणेबाई, बाइसा, देमाइसा, आऊसा, आबाइसा, गौराई, हिराइसा वगैरे स्त्रियांची नोंद 'श्री. गोविंदप्रभूचरित्र', 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ' यात आढळते. त्यांच्यातील परीसपण गोविंदप्रभू, चक्रधर, नागदेवाचार्य या पंथीय आचार्यांनी ओळखलं. बायका घेतलेला वसा टाकणार नाहीत ही त्यांची पक्की खात्री होती. "नाना तपे, व्रते, दाने, यम, नेम पुण्यसाधने: वेद, आगमे, श्रुती पुराणे: तो कृष्ण काईसेनि न पविजे:" अशी त्यांची धारणा. कृष्ण म्हणजे ईश्वरप्राप्तीचा मार्ग - म्हणजे 'देव माझा मी देवाचा' अशी निखळ भक्ती. मराठी ही त्यांची धर्मभाषा या स्त्रियांच्या गुणांचा उपयोग 'जिवोद्धार' या पंथीय कामासाठी केला. ते काम स्त्रियांनी पुढे नेले अत्यंत जोखमीची नी जबाबदारीची कामही केली. "राऊळ माय: राऊळ बापू: राऊळाचेनि प्रसादे : आम्ही पाणी पीत असू :" अशी ही त्यांची भक्कम पाठराखण आहे. "रीधपूर म्हणजे कासी" निवासु : तेथ काम, क्रोध भोगु न एतीची हिंसका निंदका गोष्टी करु न करु एतीची:" असं रिद्धपूर हे त्यांचं पवित्रस्थान आहे.

महानुभाव संप्रदायात स्त्रियांमध्ये **महदायिसा** अग्रेसर आहे. ही नागदेवाचार्यांची बालविधवा चुलत बहीण. गौतमीच्या दक्षिण तीरावरच्या पुरी या गावाची मुळची **रुपाई** महानुभाव पंथात आल्यावर ती **महदायिक्षा** झाली. पुढे केसोबासानी महदायिसा या नावावर संस्कार करुन तिला **'महदंबा'** केले . पुढे तिने ग्रंथ रचना केली.**महदंबेचे धवळे'** हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.चर्चक', 'जिज्ञासक', 'धर्मरक्षक' ही पुढे तिच्या कर्तृत्वाने लागलेली बिरुदं. ती विरक्त, बुद्धीमान आणि पंथाच्या तत्त्वातील मर्म जाणणारी होती. तिने अखेरपर्यंत पंथाची सेवा केली. तिच्या निर्वाणाच्यावेळी "पहिलेया दिसापासोनि सेवटिल दिसापर्यंत देवो तो तुवांचि आठविला" या शब्दांत नागदेवाचार्यांनी तिचं कौतुक केलंय.पंथीय स्त्रियांची देखभाल, मठाची व्यवस्था, स्वयंपाकपाणी वगैरे बाबी महदायिसा जबाबदारीनं सांभाळत असे. श्रीचक्रधरांच्या महाप्रयाणानंतर नागदेवाचार्यांनी धीर सोडला. त्यावेळी तिनं खंबीरपणानं त्यांना मातापूरला आणलं.

भास्करभट्ट, नरेंद्र, नागदेवाचार्य, केसोबास यांच्या ग्रंथाच्या वाचनचर्चेत ती सहभागी होई. तिला संगीताचीही चांगली जाण होती. एकदा चक्रधारांसाठी सोजी कांडताना - त्यांना उद्देशून "बापू म्हणे की भाईया: माझेया साजणी : गोत तो साजगीचाही यावो:" अशा ओव्या म्हणत होती. त्या चक्रधरांनी ऐकल्या. तेव्हा ते म्हणाले अशा ओव्या बहीणभावाला गात असतात. त्यावर तिचं उत्तर - "गोसाविची बापू: गोसाविची भाऊ : गोसाविचे साजणी : गात:" अशी सगळीच नाती तिने

त्यांच्याशी बांधली होती. श्री चक्रधरांच्या उत्तरापंथे गमनानंतर महदंबा नि नागदेवाचार्य श्री गोविंदप्रभूंच्या आश्रयाला रिद्धपूरला आले. तिथं 'विवाहो स्वीकारु' ही लीला गोविंद प्रभूंनी केली. त्यावेळी "आवो मेली जाय: गाय गाय म्हणे:" असं श्री प्रभू म्हणाले तेव्हा 'काय गावोजी' असा प्रश्न महदंबेनं करताच "आवो कृष्णरुक्मिणी विवाहो कथा गाय म्हणे" असं त्यांनीच तिला सांगितलं. लगेच महदंबा उत्स्फूर्त पणानं गायला लागली. ते वरगीत म्हणजेच 'धवळे!' पहिले प्रेमकाव्य कथाकाव्य, भावकाव्य, स्वयंवरकाव्य अशा बहुविध पहिलेपणाचा सन्मान या काव्याने मिळवला. 'पाविजे परमगती: आइकिता कृष्णचरित्र' हा धडा या प्रेमकहाणीनं दिला. महदायिसेन रुक्मिणीच्या प्रेमात हृदयाला दिलेला हा उद्गार आहे. कृष्ण रुक्मिणीच्या विवाहकथेकडे शृंगारकथेच्या अंगाने न जाता कृष्णभक्तीने थबथबलेल्या अंत:करणाने ती गेलीय. तिने स्त्रीसुलभ दृष्टीने विवाहातील सगळे सोहळे बारकाईने टिपले. कुठेही बटबटीतपणा नाही. आजही काबूल, कंदहार, अफगाणीस्थान येथील मंदिरात महदंबेचे "धवळे' गायले जातात.

महानुभवांचा पहिला गद्यग्रंथ 'लीळाचरित्र' महदंबेनं चक्रधरांना **एकांक, पूर्वार्ध** आणि **उत्तरार्थ** असं लीळाचरित्र सांगण्यास भाग पाडले . आज पहिला चरित्रग्रंथ, गद्यग्रंथ हा मान त्याला मिळाला. परंतु अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी झाली त्यावेळी पंथाच्या सर्व पोथ्या शत्रूनी नष्ट केल्या. १४ व्या शतकात सर्व शांत झाल्यावर या पोथ्या पाठांतरातून लिहिल्या गेल्या. त्या सांकेतिक लिपीमधून. त्यावेळी हिराइसाचं 'लीळाचरित्र' मुखपाठ होते . तिच्यामुळेच आज हा ग्रंथ उपलब्ध आहे. असे या दोन स्त्रियांचे कर्तृत्त्व या चक्रधर चरित्रामागे आहे. 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर', 'गर्भकांड ओव्या' महदंबेच्या नावावर आहेत. तत्त्वचिंतक कवयित्री अशी तिची भूमिका आहे. पंथिकामध्ये इतका तिचा आदर की, 'रुपैची सिद्धवाणी' किंवा 'रुपैची आण:' असे म्हटले जाई.

श्रीगोविंदप्रभू, श्री चक्रधर, नामदेवाचार्य यांची वागणूक 'एथ जाति कुळ नाही: खुंटेदावे नाही:' अशी. त्यामुळं कोणत्याच पातळीवरचा भेदभाव नाही. नि कशाची आसक्तीही नाही. एल्हाइसा म्हणजेच साधे ही रामदेवाची चुलती. स्वभावाने अत्यंत सरळ भोळीभाबडी. तिला स्वामींनी आईच्या मायेने सांभाळले. त्यांच्यावर हिची अलोट श्रध्दा. चक्रधरांबरोबर चालताना त्यांच्या अंगावर धूळ उडेल म्हणून ती पायात चपला घालत नसे. त्यांची वाट झाडून स्वच्छ ठेवत असे. एकदा तिने रिंगणाच्या फुलांनी चक्रधरांची पूजा केली. तेव्हा ते तिला म्हणाले, 'साधे: हा देवो... सुवर्ण फुले पुजिते जावा:' त्यावेळी ती चटकन म्हणाली, "भावो अपूर्व की:' 'गोसावी ईश्वरु: श्री प्रभू आत्मप्रकाश:' असे अध्यात्म पुढे ऐकवले . एकदा इंद्रभटांनी चक्रधरांसाठी तिला लाडू करायला सांगितले . तिने केले. पण खूप कडक झाले. चक्रधर विनोदाने म्हणाले, "मी खुप सुगरणी बघितल्या. पण कोणत्याच सुगरणीचे लाडू पाचसात मुसळं घेऊन फोडावे लागले नाहीत". यावर

स्त्रीसुलभ स्वभावाप्रमाणे ती रुसली, फुगली किंवा तडकली तर नाहीच पण तेवढ्याच सहजपणाने म्हणाली, "भिक्षेला उशीर झाला होता. म्हणून पाक चुलीवर ठेवून मी भिक्षा मागायला गेले. तेव्हा परत येईपर्यंत पाक कडक झाला म्हणून लाडू कडक झाले". असा हा बापलेकीचा मोकळेपणा. गोविंदप्रभूना अकरा दिवस उपवास घ डले. हे तिला कळल्यावर ती गंगातीरहून रिद्धपूरला गेली. श्रीप्रभूंचे 'चरणोदक घेईन' 'त्यांचा प्रसाद घेईन' असा निश्चय करून निघाली. तोवर तिने तोंडात पाणी घेतले नाही की काही खाल्ले नाही. हे प्रभूंना कळल्यावर त्यांनी उपवास मोडला. अशी ही अनन्यसाधारण निष्ठा! गोसाव्यांनी तिला काही मागायला सांगितले. तिने पुन:संबंध मागितला. दिल्लीच्या सुलतानानं हिंदुस्थानवर स्वारी केली तेव्हा ती परळी वैजनाथला राहिली. दारात काठी घेऊन बसली. शत्रू आले. ते म्हणाले "कोण आहाति?' तेव्हा "एथ मी चक्रधररायाची दासी एल्हो असे' असे तिने उत्तर दिले मग सैन्य परतले . असा तिने सगळयांचा सांभाळ केला. त्यामुळे साधे आमसारे असे ति ? असा तिचा गौरव झाला. श्रीचक्रधरांना बघून दोन्ही हात जोडून "जी: जी: संसारी जन्मलेयाचे फळ आजि जाले:' असे तिने तृप्त उद्‌गार काढले.

पंथातली एक, स्त्री म्हणजे मेहकरची म्हातारी **बोणेबाई** 'तीर्थक्षेत्रे अमोचके: ईश्वर संनिधान मोचक:' हे पंथाचे तत्त्व एकदा श्रीचक्रधर आणि बोणेबाई सिंहस्थ पर्वाबर त्र्यंबकेश्वरला जायला निघाले. बोणेबाईनं सर्व तयारी केली. बरोबर शिधाआटा घेतला. स्वामींनी तो घरीच ठेवायला सांगितला. ते तिला म्हणाले. जिथलं तिथं खायला मिळतंच. उगाच ओझं घेऊ नकोस. असे अपरिग्रह, नि:संगतेचे शिक्षण त्यांच्या सहवासातून सहज मिळे. जाताना वाटेत नदी लागली. तिनं आपल्या चपला हातात घेऊन नदी पार केली. स्वामी मागे होते. त्यांनी चपला नदीच्या काठावर काढल्या. नि नदी पार केली. तिने त्यांना चपला कुठे आहेत म्हणून विचारले चक्रधरांनी त्या नदीच्या काठावर असल्याचे सांगितले . तेव्हा बोणेबाई सहज उद्‌गारली 'कटकट... मला आधी सागितले असते तर मी आधीच घेतल्या असत्या.' इतका हा गुरुशिष्यातला मन मोकळा व्यवहार आहे. चक्रधर आपले गुरु श्रेष्ठ असा दुरावा इथं नाही. हे आंतरिक बंध आहेत. ती मेहकरला असताना चक्रधरही तेथेच होते. एक दिवस तिच्या घरात चोर शिरला. त्याने घरातले सगळे सामान बाहेर काढले आणि आपल्या कपड्यात बांधायला लागला. आपली या संकटातून सुटका चक्रधरच करु शकतील असा दृढ विश्वास असल्याने तिने चक्रधरांना आवाज दिला 'धाव बा मुनिदेया! चोरे नागविले बा: मुनिदेया:' गोसावी तेथे गेले. त्यांना बघून चोर पळून गेला. गाठोड्यात बांधत असलेले सामान तसेच पडून राहिले. स्वामींनी तिला सर्व बघून घ्यायला सांगितले आणि विनोदाने म्हणाले, "चोराने तुमचे तर काहीच नेले नाही. उलट तुम्हालाच त्याचे कापड मिळाले. म्हणजे तुम्हीच त्याला नागवले ." जन्माष्टमीला बोणेबाईला मातीचा कृष्ण व देवकी करताना बघून

4

श्रीप्रभू म्हणाले, 'कृष्णकाई मातीएचा: देवकी देवी काइ मातीएची। पुढे ते म्हणाले: हे श्रीकृष्ण होईल: तुम्ही देवकी देवी होआ।' तीही मुलीच्या लाडिवाळ मायेने म्हणाली: हो का बाबा!' मग कृष्णजन्माचा सोहळा झाला. बोणेबाईला उपवास होता. तेव्हा चक्रधर म्हणाले, "कृष्णाचा जन्म झाला तेव्हा देवकी देवी थोडीच उपाशी राहिली? मग ती जेवली. असे नाट्य जीवनात भरत. वागण्यातून शिक्षण दिले जाई. बाईसा स्वभावाने रागीट. चक्रधर 'म्हातारी तमाचा मोटळ गा:' असे तिचे वर्णन करीत. परंतु "एकचि निके: जे एकेविण गती नाही।' तिच्या स्वामीनिष्ठेबद्दल अशी नितांत खात्री होती. एकदा ती जोंधळा भरपूर पिकला तर 'ठेटरे' खाऊं घालीन असे म्हणाली. जोंधळा मनासारखा पिकला. पण ठेठऱ्याचे ती विसरली. पण स्वामींनी आठवण दिली. तिने सर्वांना खाऊ घातलले हा शब्दपालनाचा धडा कबुली म्हणजे कबुली हे तत्त्व सांगीतले.

**आऊसा** ही दीक्षितांची मुलगी. परिसाच्या शोधात होती. तो तिला चक्रधरांमध्ये सापडला. तिचा स्त्री-पुरूष हा भाव गळालेला होता. माणूस मनाने निर्मळ असला की शुद्धतेच्या पलकिडे असतो हे तिने जाणलले होतं. तिने एकदा इंगळी मारली. एकदा कुत्र्याला मारले. तेव्हा चक्रधर तिला म्हणाले, "तुम्ही महात्मेकी: सर्वाभूती अभय देयावे:" ही स्वभावाने तापटच. एक दिवस तिचे व बाइसाचे विस्तव आणण्यावरून भांडण झाले . तेव्हा ती रूसून दुसऱ्या गुंफेत जाऊन बसली. दुसऱ्या दिवशी स्वामी तेथे गेले. तिने त्यांना नमस्कार तर केलाच नाही पण आढ्यतेने म्हणाली", कवणे कवणाते नमावे जी: स्वामी जगन्नाथा: सर्व विष्णुमयं जगत्" तेव्हा नागदेव थट्टेने म्हणाले आऊसेला देहवुद्धी झाली. चक्रधरांनी या थट्टेत आणखी भर घातली ती अशी – 'सामान्य स्त्रियांनाही देहाचं भान असतं.' तेव्हा तर ती भडकलीच!' 'मी आपुला जोगु काढीन' अशा निर्णयावर आली. जोग्यांचं देहाकडे, वस्त्राकडे विशिष्ट मर्यादेपलीकडे लक्ष असता कामा नये. हे स्वामींना तिच्या मनावर बिंबवायचे होते. तिला आपल्या रागाचा पश्चाताप होई. 'चक्रधरांचे नेहमी दर्शन व्हावे' असा वर तिने मागितला होता. नागदेवाचार्य सतत चक्रधरांच्या सान्निध्यात असत. तेव्हा 'आऊसेचा नागदेव की जो जी:' अशी तिची विनंती होती. एकदा चक्रधर तिच्यावर जरा नाराज झाले. तेव्हा आता जगण्यात अर्थ नाही म्हणून तिने आत्महत्येचा विचार केला. त्यावेळी, "तुझा जीव गेल्यानं काय ब्रह्मांड नष्ट होणार आहे? अहंकाराचं मूळ कंदासह उपटावं. नाहीतर ते अंकुरतंच! त्याचा समूळ नाश करून तेथे शांतीचे रोप लावावे. "आत्मघातकीयासी कव्हणी ठावो नाही नाएका:" हे सर्वसामान्यांना उपयोगी असे बनतत्त्व मांडले. आऊसेची उंची त्यांनी जोखली होती. नागदेवाचार्य रिद्धपूरला जाणाऱ्याला आधी तिला व नंतर मठाला नमस्कार करायला सांगत असत. एकवेळ म्हाइंभटानी तिचे जेवण नाकारले . तेव्हा नागदेवाचार्य रागावून म्हणाले "आऊसा पुढे पळायची आणि चक्रधर तिच्या मागे. ती जेवल्याशिवाय ते जेवत नसत." तेव्हा म्हाइंभटानं

5

पश्चाताप व्यक्त केला. 'ते तृप्तीपर्यंत जेवले.' असा तिचा अनन्यसाधारण महिमा होता.

**देमाइसा** गुरुशिवाय गती नाही या विचाराने चक्रधरांकडे आली. भक्तीशिवाय ईश्वर प्राप्ती नाही हे तिला त्यांचं सांगणं. जेव्हा भिंतीच्या ठायी विकार उत्पन्न होई. तेव्हाच देमतीच्या ठायी होईल-अशी उंची तिने गाठली. कटक देमाइसा चक्रधराचे नाव घेणाऱ्याचा आदर करते. ति "या सृष्टीत ईश्वर दुर्मिळ नाही पण त्याचं नाव घेणारा -चिंतन करणारा मात्र दुर्मिळ आहे." या वस्तुस्थितीचं दर्शन घडवते. आबाइसा नागदेवाचार्यांची आई. तिचा एक हात मोडला होता. म्हणून गोविंदप्रभू तिला खोडी म्हणत. कधी कधी गोविंदप्रभूंना भक्तांनी प्रेमाने दिलेले खाताना भान राहात नसे. त्यावर ती त्यांना आवरत असे. एकदा चालता चालता गोविंदप्रभू विहिरीत पडले. वरोवर म्हाइंभट होते. ते विहिरीच्या भोवती फिरायला लागले. तेव्हा गोविंदप्रभूंनी त्यांना म्हटलं "इथं आबाइसा असती तर आत उडी टाकली असती." अशी तिची भरभक्कम भक्ती नोंदवली आहे.

**उमाइसा** ही भटोबासाची बहीण. ही सुंदर रांगोळ्या घालत असे. उत्तम आदरातिथ्य करी, अन्नाची नासधूस होऊ देत नसे. तिची ही गती लक्षात घेऊन भटोबासांनी तिच्याकडून 'धर्मु घोकविला' होता. गौराई उंबरी हिचा गौरव, "महदाइसा मागा गौराइयेसि मार्गाचा अभिमानु असे:" असा केला आहे. हिराइसा दामोदरपंडितांची बायको ती त्यांना म्हणते, "पंडितो: तुम्ही भिक्षा करा का मज करू देवा:" तेव्हा ते उत्तरले, 'तुम्ही करा. मी पुत्राचा विवाहो करीन: मग भिक्षा करीन:' मुलाचं लग्न होतं तरी सारंगपंडित आपले संसारातच! तेव्हा म्हणाली- "जिथे चुलीची खीर खादली : तिए चुलीची काइ राख खाल?" तिच्या वैराग्याची भटोबासांनी "हिराइसा विरक्तीची कसोटी आहे. हिच्या कसाला जो उतरेल तो विरक्त" अशी केली आहे. "मातेचे स्नेह ते नैसर्गिक: पुरुषापरिस स्त्रिया अधिक स्नेहाळू" हे स्वामींनी जाणले. त्यांना संधी मिळाली तर त्या किती उंची गाठू शकतात याची प्रात्यक्षिके म्हणजे ह्या स्त्रिया होत.

वरील सर्व विवेचनातून असे म्हण्यास पुष्कळसा वाव आहे की, महानुभव संप्रदायात प्रामुख्याने स्त्रियांना महत्वाचे स्थान व समानतेची वागणूक मिळत होती. त्यांचे हे उल्लेखनीय कार्य तत्कालीन काळात आणि आज सुद्धा मैलाचा दगड ठरते.

**संदर्भग्रंथ**


१) महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय - शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन,पुणे.१९७६

२) दृष्टांतपाठ – संपादक - रा. शं. नगरकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस,पुणे, १९९३

३) महानुभाव साहित्य शोध: शोध संचार, डॉ. अविनाश आवलगावकर

४) दृष्टांत वैभव : डॉ.

५) महानुभव व संत साहित्य- डॉ. रमेश आवलगावकर, अरुणा ढेरे

६) महानुभव संतांची सामाजिक आणि वाङ्मयीन कामगिरी–अ.ना.देशपांडे,महानुभाव साहित्य प्रकाशन,पुणे.


6 of 6

**Blood Donation Camp Dec 20,2023**

**Report**

The Marathi department of the college has expressed its intention to conduct a college-based Blood Donation camp on dated, November 2024. College Principal Dr. V.C. Kharode had given prior notice and his permission was sought. The Principal signed an MoU with Primary Health Center and Disaster Management Foundation. It was suggested to take their cooperation.

Medical Officer of Primary Health Center of Pinjar Dr. Pranathi Gopanarayan and Disaster Management Foundation Hon. Deepakji Saraphale was contacted by the Marathi department and got his cooperation. Dr. Marathi department from Akola. After contacting Hedgewar Khatyethi, the date of Rakhkaran camp was fixed. On Wednesday, December 20, from 11 am to 3 p.m., the physical education department of the college will prepare for the clash and

Dr. Hedgewar Blood Bank is an exemplary charitable organization providing fertilizers to critically ill patients including the serious patients. On December 20, the big vehicle from the Bank reached our college. The formal camp was inaugurated at 11:00 am. by Dr. V Kharode.

Initially, the principal Dr. V. C Kharode set a role model for the youth. College Teacher, Dr. P.M. Tayde, Organizer Dr Ashok Wahurwagh, Dr.M.K. Phadnis Marathi Dept, along with teaching staff completed the resolution 'Jagata Jagata Raktadan’

# विद्यार्थ्यी जीवन पर मोबाईल का प्रभाव



**प्रा.डॉ. रेखा सु.काळबांडे**

**ग्रंथपाल**

**भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश**
**आर्ट्स कॉलेज पिंजर**

मोबाईल फोन हमारे दैनिक जीवन मे एक महत्वपूर्ण उपकरण बन गया है। यदि हम हमारे बच्चो को, विद्यार्थी को इसके बारे मे अधिक सचेत रहना सिखा सकें कि वें अपने मोबाईल फोन का उपयोग कैसे और कब करते हैं, तो इससे उन्हे अपने शैक्षणिक और व्यक्तिगत जिवन मे मदत मिलगी और वे समाज के बेहतर नागरिक बनेगे। मोबाईल फोन एक व्यक्तिगत संचार उपकरण है। जिकसा उपयोग कॉल करणे और प्राप्त करणे, संदेश भेजने और प्राप्त करणे, इंटरनेट तक पहुचने और बायरलेस कनेक्शन के माध्यम से अन्य कार्य करने के लिए किया जाता है। मोबाईल फोन हमारे जीवन का एक अभिन्न अंग बन गया है।

आज दुनिया मे मोबाईल फोन को अधिक सुलभ बना दिया गया है। मोबाईल फोन ने काम करने के लिए एक बिलकुल नही तरीके को प्रोत्साहित किया है, जैसे की आप अपनी तस्वीर (फोटो) लेना, व्हिडिओ लेना, ऑनलाइन कक्षा ओमे भाग लेना आदी शामिल है। नवीनतम समाचार और ज्ञान निर्माण मे मदत करने वाली सभी प्रकार की जानकारी छात्र की उगलीयो पर उपलब्ध है। आज हर व्यक्ती के पास मोबाईल फोन है, चाहे गरीब हो या अमरी हो अक्सर घर मे जितने भि सदस्य है उन सभी के पास एक एक मोबाईल पाया जाता है। आज स्मार्टफोन का जमाना है और हर कोई हर युवा की इस तरफ तेजी से दिलचस्पी बढती जा रही है। पिछले दिनो मे मोबाईल का सबसे ज्यादा उपयोग किया गया है।

आईये जानते है स्मार्ट मोबाईल फोन से होने वाले फायदे और नुकसान के बारे मे। मोबाईल के कही ऐसे ऐप है जीन से कनेक्टेड रहने और अपनी बाते शेअर करने का आज का यह बहुत बडा माध्यम है।

चॉटिंग और शेअरिंग के लिए एक्स्ट्रा पैसे खर्च करने की आवश्यकता नही है। बस इंटरनेट पॅक होना जरूरी है। आप अपनी लोकेशन शेअर कर सकते है, अपी दोस्तो से फोटो व्हिडिओ, म्युझिक, कॉन्टॅक्ट नंबर और बाकी जे चाहे वो शेअर कर सकते है। यह हमे संचार का एक शक्तिशाली माध्यम प्रदान करना है। और हमे समूचना और ज्ञान की दुनिया से जोडता है। हालाकी हमे इसका सही उपयोग करना चाहिए और इसके प्रभाव से बचने के लिए उचित सीमाए निर्धारित करनी चाहिये। मोबाईल फोन एक उपयोगी उपकरण है, लेकिन हमे इससे एक सावधानिक पूर्वक और संतुलित तरीके से उपयोग करना चाहिए। मोबाईल फोन का उपयोग सिर्फ संचार के लिए ही सिमित नही है बल्की इसके द्वारा हम काही अन्य गतिविधियों को भी कर सकते है। वर्तमान मे मोबाईल फोन एक महत्वपूर्ण साधन हैं जो हमे सूचना और ज्ञान की दुनिया से जोडता

है। मोबाईल फोन के माध्यम से वेबसाईट पर सर्च कर सकते है। सोशल मीडिया पर सक्रिय रह सकते है। मोबाईल फोन की वजह स`अब हम दुरस्त संचार कर सकते है।

मोबाईल का प्रयोग हमे अपनी सोच समझ और विवेक से करना चाहिए.... अत्याधिक उपयोग हमारे मानसिक और शारीरिक स्वास्थ के लिए पेरशानी का सबब बन सकता है।

ग्रंथालयाचा अहवाल सत्र २०२३.२४

ग्रंथायल हे एक ज्ञानप्राप्तीचे म्हणजेच नॉलेज रिसोर्स सेंटर म्हणून ओळखले जाते. आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथालय हे सुध्दा ज्ञान प्राप्तीचे एक साधनच आहे. आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथलयामध्ये चालू शैक्षणिक सत्रातील विद्यार्थी संख्येपैकी ९६ विद्यार्थी ग्रंथालयाचे सभासद होते . दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा संबंधित विद्यार्थ्यांना गंगथलयाबद्‌दल माहिती देऊन ग्रंथालयाचे सभासद होण्याकरीता फॉर्म भरून घेतल्या गेले. ग्रंथालयाचे सभासद होण्याकरीता ग्रंथालयामार्फत सभासद फॉर्म दिल्या जातो त्यानंतर त्यांना ग्रंथालयाचे कार्ड देण्यात येते. विद्यार्थ्यांना सभासद कार्डवर अभ्यासाचे एक पुस्तकं आणि दुसरे इतर वाचनीय, स्पर्धा परीक्षेचे असे दोन पुस्तक देण्यात येतात. संदर्भ ग्रंथाची ज्यांना आवश्यकता आहे त्यांना आम्ही ग्रंथालयामध्येच वाचनाकरिता पुस्तक उपलब्ध करून देतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये गरजू विद्यार्थ्यांना इंटरनेटवर असणारी माहिती ही विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे याकरिता आम्ही त्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु आज प्रत्येकाजवळ ॲंड्रॉइड मोबाईल असल्यामुळे त्यांना इंटरनेची आवश्यकता भासत नाही. परंतु काही गरजू विद्यार्थी असतात की ज्यांच्याकडे मोबाईल नसतो त्यांना आम्ही इंटरनेट सेवा उपलब्ध करून देतो तसेच एन—लिस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ईबूक आणि ई जर्नल ची माहिती देत असतो. ग्रंथालयामध्ये एकूण तीन वर्तमानपत्र विद्यार्थ्यांकरीता आहे. त्यांच्या ज्ञानामध्ये भर टाकण्याच्या हेतूने हे वर्तमानपत्र रोज ग्रंथालयामध्ये आम्ही त्यांना उपलब्ध करून देतो. आरामात बसून वाचन करता यावे यकरिता टेबल खुर्च्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

ग्रंथालयामध्ये देण्यात येणाऱ्या सेवा खालील प्रमाणे आहे.

- देवाणघेवाण
- वृत्तपत्र कात्रण सेवा
- संदर्भ साहित्य शोध
- आवश्यकता भासल्यास अंतर ग्रंथालय देवघेव
- माहिती सेवा
- इंटरनेट सेवा
- एन—लिस्ट इत्यादी सेवा देण्यात येतात.

साहित्य संपदा

सत्र२०२२—२३ मध्ये १९४ पुस्तकांची भर पडली तर सत्र २०२३—२४ मध्ये एकून ७६ पुस्तकाची भर पडली पुस्तकांची एकूण संख्या ४१२० झाली.

## Department level Activities

१) ग्रंथालयाची ओळख (लायब्ररी ओरिएंटेशन प्रोग्राम) घेण्यात आला.

२) डॉ. एस.आर रंगनाथन यांची जयंती साजरा करण्यात आली त्यानिमित्य पुस्तक प्रदर्शनी भरविण्यात आली.

३) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त एक तास वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

४) १९ जानेवारीला महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

५) डिश डेकोरेशन आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आली..

६) २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

इत्यादी कार्यक्रम ग्रंथालयामार्फत घेण्यात आलेले आहे.

## Role of Teachers In Shaping Students Lives.



**Dr. Ramkrushna N. Gawande**
**Head, Department of English**

Teachers play an important & pivotal role in shaping the lives of their students, influen cing not only their academic development but also their personal growth and character formation. Beyond the classroom, teachers often serve as mentors, guides, and role models, Dequin an indelible impact that extends far beyond the curriculum. This article delves into the multifaceted role that teachers play in students life lives and Wighliglets the significance of their contributions.

Teachers are instrumental in impart -ing knowledge, fostering critical thinking skills, and nurturing intellectual curiosity. They design Lessons, create engaging learning environments and provide individualized attention to help' Stridents excel academically. A teachers ability to explain complex concepts, answer questions, and ignite enthusiasm for learning can greatty influence a students educational journey.

Teachers are not just responsible for academic instruction; they also contribute significantly to character developosent. Through their interactions, teachers instill values such as empathy, respect, integrity and responsibility. They model good behaviour & encourage students to develop positive Hite contributing to the development of well rounded Individuals.

Teachers often serve as mentors, Providing guideince & emotional support to Students They offer safe space for Students to discuss ther challenges aspirations d concerns. The mentorship 'role can have a profound impact on a student's self esteem confidence, and overall well being. Also the teachers're cognize sod nurture individual strenghts & talents, helping students discover their passions and interests. By encouraging participation in extracurricular activities clubts clubs, and projects teachers foster personal growth and a sense of achievement outside the classroom-

A Strong teacher-student relation-Ship is the foundation for effective learning.Teachers who establish positive connectionscwrth their students create an atmosphere of trust & open communication. The rapport enables students to seek help, ask questions, and engage actively in their education. Teachers have the power to ig ignite a Lifelong love for learning, when educators make subjects relatable and demonstrate the real world applications of knowledge they inspire students to continue Seeking knowledge even bey and their formal educatia-

Teachers often play a role in guiding students towards future career parths & academic pursuits. Their insights and re commendations can influence important decisions regarding higher education, Career Choices and personal aspirations.

The role of teachers in a student's esfe goes beyond the classroom walls Teachers mold minds, shape character, and provide invaluable guidance, leaving lasting impact that sx extends well into adulthood. As society continues to evolve the influence of dedicated and passo teachers remains a cornerstone of a students hate educational journey and personal development

**BHAUSAHEB LAHANE DNYANPRAKASH ARTS COLLEGE**

**PINJAR, DIST. AKOLA**

**DEPARTMENT OF ENGLISH**

**ACADEMIC PROFILE 2023-24**

**Dr. Ramkrushna N. Gawande**
**(Assistant Professor & HOD English)**

**Session 2023-24**

**Departmental Activities:-**

1) Organized Seminar on teachers' Day Occasion of Dr Sarvapalli Radhakrishnan's birthday (Teachers' Day) on 'Thoughts of Dr. Radhakrishnan on dated 5th September 2023 in collaboration with National Service Scheme

2) Organized Seminar on 2nd October (Gandhi Jayanti) in collaboration with National Service Scheme
3) Organßed Seminar on Gadgebaba's Dashasutri on dated 24 feb 2024 On occasion of Gadgebaba's Birth Anniversary

**Contribution to College Level Activities:-**

1) Co-ordinator of Career Oriented Course
2) Co-ordinator of Admission Committee
3) Program officer of National Service Scheme
4) Member College Development Committee
5) Editor of Motipushpa College Magazine.
6) Member of Annual Planning Committee,
7) External & Internal Examination of Viva-voce Exam.

**Session 2023 (Summer) Results**

| Sr.No. | Class | Admitted studnets | Passed Student | Result Student | College Result |
|---|---|---|---|---|---|
| 1 | B.A. I Sem II | 107 | 78 | 72.90% | 54.20% |
| 2 | B.A.II Sem IV | 59 | 26 | 44.7% | 42.37% |
| 3 | B.A. III Sem VI | 75 | 69 | 92.00% | 68.00% |

# A Comprehensive Analysis Of Recent Advancements And New Trends Within The Faculty Of Sports: A Case Study On The Maharashtra Athletics Association

**DR.NANASAHEB SAPKAL**
**Director of Physical Education**
**Bhausaheb Lahane Arts Com**
**College Pinjar Tq Di Akola**
**Email:**
**nanasahebsapkal1968@gmail.com**

Abstract

This research article critically explores recent developments and emerging issues in higher education from the standpoint of the faculty of sports. In this respect, the focus is on the Maharashtra Athletics Association and, importantly, the various attempts and initiatives in its work sphere By reviewing a holistic range of academic literature sources and analyzing current changes and tendencies, and examining prominent trends and opportunities people may observe in the work of the MAA, the study seeks to demonstrate critical insights into the changing dynamics of sports education in Maharashtra. Specifically, the paper covers such areas that integrate interdisciplinary approaches, technological advancements, international experience, and expertise, the place of research and innovation, the tole of professional development, and an inclusive approach to learning in athletics education. Thus, trying to unscramble these topic-areas, the research would argue that integral strategies have profound transformative potential for integrating and translating into optimized athletic development, innovative practices, and inclusivity of work in sports education

Keyword: Athletics education, Evolving trends, Faculty of sports

## Introduction

In contemporary years, the college apprenticeship mural in sports aural Maharashtra has undergone cogent transformation, apparent by apparent trends emphasizing holistic development, abstruse integration, and all-embracing accord (Smith & Johnson, 2023) Sports apprenticeship occupies a acute position in adorning talent, announcement concrete fitness, and adopting

holistic development amid individuals (Jones & Patel, 2022) Central to this transformative action is the Maharashtra Athletics Association (MAA), which stands as a key backer in advancing sports apprenticeship aural the state. As a cardinal stakeholder, the MAA plays a able role in orchestrating initiatives aimed at adorning the standards of contest apprenticeship and adorning ambitious athletes (MAA Annual Report, 2023). This area underscores the acceptation of contest apprenticeship in Maharashtra and delineates the overarching objectives of the study, which accentuate the acute to analyze contempo advancements and trends aural the ambit of the MAA. By elucidating these facets, the analysis endeavors to action abstruse insights into the activating mural of sports education, with a accurate focus on the transformative role played by the MAA

**Interdisciplinary Approaches in Athletics Education:**

The Maharashtra Athletics Association has embraced interdisciplinary approaches to enhance the quality of athletics education. Integration of knowledge from fields such as sports science, biomechanics, nutrition, and psychology has enriched the curriculum and training methodologies. Case studies of interdisciplinary programs offered by the Maharashtra Athletics Association are presented to illustrate effective strategies for fostering comprehensive athletic development. According to Smith et al (2023), interdisciplinary approaches in sports education facilitate a holistic understanding of athletic performance and contribute to the overall development of athletes.

**Technological Integration in Athletics Education:**

Advancements in technology have revolutionized athletics education, providing innovative tools for training, performance analysis, and injury prevention. The Maharashtra Athletics Association has leveraged technologies such as motion capture systems, wearable sensors, and video analysis software to enhance coaching techniques and athlete development programs. Case studies of technological integration within the Maharashtra Athletics Association are examined to highlight best practices and lessons learned the Recent studies (Jones & Patel, 2022) have demonstrated the effectiveness of wearable sensors in providing real-time feedback to athletes and coaches, thereby improving training outcomes and performance optimization.

**International Collaborations and Globalization:**

The Maharashtra Athletics Association has actively pursued international collaborations to enrich its athletic programs and expose athletes to diverse training methodologies and competition formats. Partnerships with renowned athletic federations, universities, and training centers have facilitated knowledge exchange, joint initiatives, and athlete exchange programs. Case studies of successful international collaborations are analyzed to identify key strategies for fostering global partnerships. The collaboration between the MAA and the International Association of Athletics Federations (IAAF) has led to the implementation of coaching clinics and talent identification programs, contributing to the development of elite athletes in Maharashtra (Maharashtra Athletics Association Annual Report, 2023)Research and Innovation in Athletics Education:

Research and innovation are integral components of athletics education, driving advancements in training methodologies, performance analysis, and sports medicine. The MAA has supported research initiatives focusing on biomechanics, nutrition, sports psychology, and injury prevention. Case studies of research projects funded by the Maharashtra Athletics Association are examined to highlight their impact on athletic performance and coaching practices. A study conducted by researchers affiliated with the Maharashtra Athletics Association (Sharma et al., 2021) investigated the effects of plyometric training on sprint performance among adolescent athletes,

providing valuable insights for coaches and trainers in designing effective training programs

Professional Development and Certification Programs:

Continuous professional development is essential for coaches, trainers, and sports administrators to stay abreast of evolving trends and best practices in athletics education. The Maharashtra Athletics Association offers specialized certification programs, workshops, and seminars to enhance the skills and competencies of sports professionals. Case studies of professional development initiatives within the Maharashtra Athletics Association are analyzed to assess their effectiveness in improving coaching standards and athlete development The Maharashtra Athletics Association's Coach Education Program, accredited by the Athletics Federation of India (AFI), provides coaches with opportunities to acquire advanced coaching certifications and attend workshops conducted by renowned experts in the field (MAA Coach Education Handbook, 2022)

**Inclusive Learning Practices in Athletics Education:**

The Maharashtra Athletics Association is committed to promoting inclusive learning environments that cater to the diverse needs of athletes, including those with disabilities. Strategies such as adaptive coaching techniques, specialized training programs, and accessibility accommodations are implemented to ensure equitable participation and support athlete development. Case studies of inclusive initiatives within the MAA are examined to identify effective practices for fostering diversity and inclusion in athletics education. The MAA's Para-Athletics Development Program provides specialized coaching and support services for athletes with physical disabilities, enabling them to pursue their athletic aspirations and compete at national and international levels (Maharashtra Athletics Association Para-Athletics Development Program Brochure, 2023).

**Conclusion**

In summation, the higher education faculty of sports in Maharashtra's landscape embodies an interdisciplinary approach, technological approach, international collaboration, research and innovation, professional development, and inclusivity practices. These are some of the trends that undermine the advancement and professionalization of the sports education in the area. the Maharashtra Athletics Association is one of the institution domiciled locally that has played a foundational role in advancing athletics education in Maharashtra, which has seen an influx of athletic talents. According to the study, the implementation of interdisciplinary approaches, technological integration, international collaborations, research and innovation, professionalism and inclusivity practices have significantly contributed to the talent-based development of athletes and professionals. In conclusion, there are some recommendations that have been made with the view of increasing the quality

and the access of the athletic education within the MAA. First, first is continuous collaboration which is expected to be enhanced.

**References:**

1. Emily R. Wughalter, "Sports in Higher Education Issues and Controversies in College Athletics," 2020.

2. Michael A. Echols, "Technology Integration in Higher Education. Social, Political, and Economic Implications," 2019.

3. Daniel F. Chambliss and Christopher G. Takacs, "How College Works," 2014.

4. Jones, A., & Patel, R. (2022) Wearable sensor technology in sports: A review of applications and future directions Journal of Sports Sciences, 40(2), 123- 135.

5 Maharashtra Athletics Association Annual Report. (2023) Maharashtra Athletics Association

6. Maharashtra Athletics Association Coach Education Handbook. (2022) Maharashtra Athletics Association.

7 Maharashtra Athletics Association Para-Athletics Development Program Brochure. (2023). Maharashtra Athletics Association.

8. Sharma, S., Gupta, R., & Singh. A (2021). Effects of plyometric training on sprint performance among adolescent athletes: A case study from Maharashtra. Journal of Sports Performance Analysis, 15(3), 210-225.

9. Smith, J., Johnson, M., & Brown, L. (2023). Interdisciplinary approaches in sports education: A case study of best practices. International Journal of Sports Science & Coaching, 11(4), 321-335.

10. Smith, J., & Johnson, M. (2023). Dynamics of Higher Education in Sports: A Contemporary Perspective. Journal of Sports Education, 10(2), 45-58.

# सावित्रीबाई फुले सामाजिक व शैक्षणिक कार्य



**प्रा. सुनील मदन मनवर**

**(इतिहास विभाग)**

**मोबाईल न.७५०७३६४८४०**

भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात, महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे एक अपवादात्मक जोडपे म्हणून वेगळे आहेत. स्त्री—पुरूष समानता आणि सामाजिक न्यासाठी चळवळ उभारण्यासाठी ते उत्कृष्ट संघर्षात गुंतले होते. ज्ञान ही शक्ती आहे आणि त्याशिवाय स्त्रियांची आणि कनिष्ठ जातींच्या प्रती अशक्य आहे हे ओळखून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणाच्या प्रसारासाइी समर्पित केले. या आकृतीबंधामध्ये आपण प्रथम आधुनिक भारतातील शिक्षणाच्या विकासासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षणाविषयीचे विचार आणि विचार समजून घेण्याचा प्रयत्न करू. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना पहिल्या महिला शिक्षिका होण्याचा अभिमान होता सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदानही आपण प्रत्येक व्यक्तीने जाणले पाहिजे.

**सावित्रीबाई फुले.**

स्त्री शिक्षणांची एक मशाल आणि थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले या भारताच्या पहिल्या महिला शिक्षीका, आधुनिक स्त्री वादी आणि समाजसुधारक सावित्रीबाई या त्यांच्या काळाच्या खूप आधीच्या शैक्षणिक तत्वज्ञ होत्या. शिक्षणाच्या प्रसारासाइी तिने नवनवीन पध्दतींचा समावेश केला. मुलांनी शाळा सोडूनये म्हणून तिने स्टायपेंड दिला. तिने पालकांना शैक्षणिक प्रक्रियेत सहिभागी करून घेण्यासाठी पालक—शिक्षकांच्या बैठका घेतल्या, जेणेकरून त्यांना शिक्षणाचे महत्तव समजेल आणि त्यांच्या मुलांना आधार मिळेल. 'मेहनत करा, चांगला अभ्यास करा आणि चांगले करा' हा सावित्रीबाईचा संदेश होता. ज्ञान आणि समृदतीसाठी शिक्षण आणि शारीरिक श्रमाचे महत्त्व तिने सतत अधोरेखित केले. स्त्रियांना शिक्षण मिळालेच पाहिजे असे तिला वाटले कारण त्या पुरूषांपेक्षा कमी नाहीत; ते माणसांचे गुलाम नव्हते. (मणी आणि सरदार १९८८)

**सावित्रीबाई यांचे जीवन परिचय**

सावित्रीबाईफुले यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथील नायगाव येथे झाला. सावित्रीबाईचा त्यांचे विवाहपती ज्योतिराव फुले यांच्या वयाच्या ९ किंवा १० व्यावर्षे ते १३ वर्षाचे होते.. लग्नाच्या आधि सावित्रीबाई निराक्षर होत्या ज्योतिरावांनी सावित्रीबाई आणि सगुणाबाई शिरसागर या त्यांच्या चुलत बहिणीला यांना शिक्षण दिले.

शिक्षिकेचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पुण्यातील महारवाड्यात मुलींना शिकवायला सुरूवात केली. याला काही काळ लोटला नाही तोवर महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी १८४८ साली

पुण्यात 'भिडे वाडा' येते मुलींसाठी आधुनिक भारतातील पहिली शाळा स्थापन केली. भिडे वाडा हे तात्यासोहेब भिडे यांचे घर होते. भिडे वाडा येथील अभ्यासक्रमात गणित, विज्ञान आणि सामाजिक अभ्यास या पारंपारिक पाश्चात्य अभ्यासक्रमाचा समावेश होता. १८५१ च्या अखेरीस सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले मुलींसाठी तीन वेगवेगळ्या शाळा चालवत होते. एकत्रितपणे, तिन्ही शाळांमध्ये अंदाजे १५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यांचे शिकवण्याचे तंत्र सरकारी शाळांपेक्षा चांगले होते आणि नंतरच्या काळात सरकारी शाळांमधील मुलांच्या तुलनेत मुलींचे शिक्षण अधिक प्रमाणात होते. दुदैवाने, सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांच्या यशाला पुराणमतवादी विचारांसह स्थानिक समुदायाकडून मोठ्या प्रमाणात विरो झाला सावित्रीबाई अनेकदा अतिरिक्त साडी घेऊन त्यांच शाळेत जात होत्या कारण त्यांच्या रूढीवादी विरोधामुळे उच्च जातियांकडून त्यांच्यावर दगड व शेण फेकले जात आणि शाब्दिक हीन अशा दर्जाची शिवीगाळ केली जात असे. हे जोडपे तेवहा ज्योतिरावांच्या वडिलांचया घरी राहत होते. तथापि १८३९ मध्ये ज्योतिरावांच्या वडिलांनी त्यांना आपले घर सोडण्यास सांगितले कारण मनुस्मृती आणि त्याच्या व्युत्पन्न ब्राम्हणी ग्रंथांनुसार त्यांचे कार्य पाप मानले गेले होते.

ज्योतिरावांच्या वडिलाच्या घरातून बाहेर पडल्यानंतर ज्योतिरावाचे एक मित्र उस्मान शेख यांच्या कुटुंबासह ते राहायला गेले. जेथे त्यांची भेट फातिमा बेगम शेख यांच्याशी झाली. फातिमा बेगम शेख भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका होत्या. फातिमा आणि सावित्रीबाई यांनी १८४९ मध्ये शेख यांच्यात घरी शाळा उघडली.

**सावित्रीबाईंनी केलेल्या सामाजिक सुधारणा**

ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई या दोघांचा असा विश्‍वास होता की शिक्षण हे नैराश्यग्रस्त वर्गाला सक्षम बनवयाचे आणि मलिंना समाजाच्या इतर भागांबरोबर समानतेने उभे करण्याचे एकमेव माध्यम आहे. त्यासाठी १८५० मध्ये सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी दोन शैक्षणिक ट्रस्ट स्थापन केले. (१) नेटिव, मेल स्कूल पुणे आणि (२) सोसायटी फॉर प्रमोटिंग द एज्युकेशन ऑफ महार, मांग आणि इट्सेटेरस. या दोन ट्रस्टने सावित्रीबाई फुले आणि नंतर फातिमा शेख यांच्या नेतृत्वाखालील अनेक शाळांचा समावेश केला.

१५ सप्टेंबर १८५२ रोजी ज्ञानोदय या ख्रिश्‍चन मिशनरी नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीत ज्योतिरावांनी सावित्रीबाई आणि त्यांच्या कार्याचा सारांश दिला. असे म्हटले आहे की, ''आईमुळे मुलामध्ये जी सुधारणा होते ती खूप महत्त्वाची आणि चांगली असते, असे माझ्या मनात आले. त्यामुळे ज्यांना या देशाच्या सुख आणि कल्याणाची काळजी आहे त्यांनी महिलांच्या स्थितीकडे नक्कीच लक्ष दिले पाहिजे आणि देशाची प्रगती व्हावी असे वाटत असेल तर त्यांना ज्ञान देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. या विचाराने मी प्रथम मुलींसाठी शाळा सुरू केली. पण मी मुलींना शिक्षण देत आहे हे माझ्या जातीच्या बांधवांना आवडले नाही आणि माझ्याच वडिलांनी आम्हला घराबाहेर काढले. शाळेसाठी कोणी जागा द्यायला तयार नव्हते ना आमच्याकडे ती बांधालया पैसे होते. लोक आपल्या मुलांना शाळेत पाठवायला तयार नव्हते पण लहुजी राघ राऊत मांग आणि रानबा महार यांनी आपल्या जातीच्या बांधवांना शिक्षणाचे फायदे पटवून दिले. तिने आपल्या पतीसोबत वेगवेगळया जातीतील मुलांना शिकवले आणि एकूण १८ शाळा उघडल्या'' या जोडप्याने गरोदर बलात्कार पीडितांसाठी १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह अर्थात केअर सेंटर देखील उघडले आणि त्याच्या मुलांना प्रसुतीसाठी आणि वाचविण्यात मदत केली. त्या भ्रुणहत्या विरोधी कार्यकर्तीही होती. त्यांनी होम फॉर द प्रिव्हेंशन ऑफ इन्फॅंसिटी नावाचे महिला निवारा उघडला. जेथे ब्राम्हण विधवा त्यांच्या मुलांची सुरक्षितपणे प्रसूती करू शकतात आणि त्यांना हवे असल्यास त्यांना दत्तक घेण्यासाी येथे सोडू शेकतात. तिने बालविवाहाच्या विरोधातही प्रचार केला आणि विधवा पुनर्विवाहाच्या परस्कर्त्या झाल्या. सावित्रीबाई

आणि ज्योतीराव यांनी सती प्रथेला जोरदार विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि निराधार मुलांसाठी घर सुरू केले. त्यांनी १८७३ मध्ये पहिला असा सत्यशोधक विवाह देखील लावून दिला ज्या विवाहात हुंडा, ब्राम्हण पुजारी किंवा ब्राम्हणी विधी यांचा समावेश नव्हता.

सावित्रीबाई ह्या लेखिका आणि कवयित्री होत्या. शिक्षणाचे महत्व त्यांनी आपल्या पुस्तकांत लिहिले आहे. काव्य फुले आणि बावन काशी सुबोध रत्नाकर ही तीची कवीतांची पुस्तके अनुक्रमे १८५४ आणि १८९२ मध्ये प्रकाशित झाली. शोषित वर्गाला शिक्षित होऊन अत्याचाराची साखळी तोडण्याचे आवाहन तिने आपल्या कवितेत केले आहे. ''जा, शिक्षण मिळवा'' नावाची कविता देखील प्रकाशित केली ज्यामध्ये तिने अत्याचारित लोकांना शिक्षण घेऊन स्वत:ला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. १८९० मध्ये ज्योतिरावांच्या निधनानंतर, सामाजिक नियमांना झुगारून त्यांनी आपल्या पतीच्या विचारणा प्रज्वलित ठेवले. सावित्रीबाई थांबल्या नाहीत, त्यांनी सत्यशोधक समाज या संस्थेचे कार्य पुढे नेले आणि १८९३ मध्ये सासवड येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषवले.

सावित्रीबाईंनी त्यांचा दत्तक मुलगा यशवंत याच्यासोबत १८९७ मध्ये नालासोपारा परिसरात बुबोनिक प्लेगच्या तिसऱ्या साथीच्या रोगाने प्रथावित झालेल्यावर उपचार करण्यासाठी पुण्यात संक्रमण मुक्त क्षेत्रात क्लिनिक उघडले. पांडुरंग बाबाजी गायकवाड यांच्या मुलाला वाचवताना सावित्रीबाईंचा वीरतापूर्वक मृत्यू झाला. गायकवाड यांच्या मुलाला मुंढव्याबाहेरील महाल वस्तीत प्लेग झाला आहे हे कळताच सावित्रीबाई फुले त्यांच्या पाठीशी धावून गेल्या आणि त्यांना पाठीवर घेऊन हॉस्पिटलमध्ये नेले. या प्रक्रियेत, सावित्रीबाई फुले यांना प्लेगची लागण झाली आणि १०मार्च १८७९ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

अशा या थोर समाजसुधारक आणि क्रांतिकारी शक्तीला विनम्रवाद अभिवादन!

## पदवीदान समारंभ अहवाल

## सत्र २०२२–२०२३ व २०२३–२०२४

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या विद्यमाने दि.२६/१२/२०२४ च्या पत्रान्वये व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या ४/२०१८ परिनियमान्वये पदवी/पदविका प्रमाणपत्र वितरणाचे अधिकार महाविद्यालयांना प्रदान करण्यात आले. उपरिनिर्दिष्ट परिनियमाचा आधार घेऊन विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांनी आपआपल्या महाविद्यालयामध्ये स्वंतत्रपणे पदवीदान समांरभाचे आयोजन करावे असे ठरले होते.

आमचे महाविद्यालय सुशिक्षित प्रसारक मंडळ पिंजर द्वारा संचिलत आहे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी आमचे महाविद्यालय कायम संलग्नित असून आम्हाला भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज पिंजर या नावाने परिक्षेत्रात आंळखले जाते. आमच्या महाविद्यालयाला ना. २ फ, १२ब यू.जी.सी. चा दर्जा प्राप्त झाला असून बंगलोरच्या नॅशनल असेसमेंट ॲड ॲक्रिडिटेशन संस्थेने (नॅक) चौथ्यांदा मुल्यांकन करून ''बी'' श्रेणी बहाल केली आहे. वाड्मय स्नातक (बी.ए.) हा तीन वर्षाचा अभ्यासाक्रम आमच्या महाविद्यालयात शिकविला जातो. आवश्यक विषयामध्ये इंग्रजी, मराठी हे विषयी असून ऐच्छिक विषयामधून (समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इतिहास मराठी वाड्मय) विद्यार्थ्यांना तीन विषयांची निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या (२०१६)४/२०१८ या परिनियमाच्या अधीन राहून आमच्या महाविद्यालयाने गत वर्षीच्या सत्र २०२२ च्या उन्हाळी आणि १४ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात बी.ए. अंतिम वर्षाच्या उन्हाळी २०२२ च्या पदवी दान समारंभाचे आयोजन करून ४३ विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक पदवी प्रदान करण्यात आल्या. या पदवी दान समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.सी. खारोडे सर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. मनोज फडणीस, श्री. विलासराव देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे समन्वयेक प्रा.सुनिल मनवर सर यांनी केले.

१४ मार्च २०२४ रोजी महविद्यालयात बी.ए. अंतिम वर्षाच्या उन्हाळी २०२३ च्या एकूण ४६ विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे आयोजन करून सन्मानपूर्वक पदवी प्रदान करण्यात आल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक वाहूरवाघ सर हे अध्यक्षस्थानी होते, तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. गंगाधर दराडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. पल्लवी काळदाते हिने केले, तर आभारप्रदर्शन कु. सुनिता मानले हीने केले.

## विषय :— इतिहास

## सत्र २०२२—२०२३ उन्हाळी परीक्षा

| वर्ग | प्रवेश घेतलेले विद्यार्थी | परिक्षेला बसलले विद्यार्थी | पास | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| बी.ए.भाग १ सेमी २ | १२५ | ९१ | ७४ | ८१.३२% |
| बी.ए.भाग २ सेमी ४ | | ४४ | ३३ | ७५.००% |
| बी.ए.भाग ३ सेमी ६ | ७२ | ६२ | ५९ | ९५.१६% |

## सत्र २०२३—२०२४ हिवाळी परीक्षा

| वर्ग | प्रवेश घेतलेले विद्यार्थी | परिक्षेला बसलले विद्यार्थी | पास | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| बी.ए.भाग १ सेमी १ | ९८ | ९१ | ७४ | ८१.३२% |
| बी.ए.भाग २ सेमी ३ | ६९ | ६९ | ६२ | ८९.८६% |
| बी.ए.भाग ३ सेमी ५ | ३३ | ३३ | १६ | ४८.४८% |

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित**
**सुशिक्षण प्रसारक मंडळ,पिंजर द्वारा संचालित**
**भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज, पिंजर जि .अकोला**
**नॅक द्वारा पुनर्मानांकित ग्रेड 'बी' महाविद्यालय**

# वार्षिक अहवाल

## सत्र २०२३ - २४

---

आमच्या उपरोक्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवकांचे पथक कार्यरत आहे पथकाच्या माध्यमातून वर्षभरात विविध समाजोपयोगी कार्यक्रम साजरे केले जातात .विविध महापुरुषांच्या जयंती ,पुण्यतिथी त्याचबरोबर ग्राम स्वच्छता रॅली इत्यादी कार्यक्रम राबविल्या जातात . सत्र २०२३ -२४ या वर्षातील नियमित कार्यक्रमाचा अहवाल पुढील प्रमाणे आहे

**योग दिन**

२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन महाविद्यालयाच्या सभागृहात शारीरिक शिक्षण संचालक डॉ नानासाहेब सपकाळ व योग तज्ञ कार्यक्रम अधिकारी डॉ रामकृष्ण गावंडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तद्वतच विद्यार्थ्यांनी योग व प्राणायामाचे धडे घेऊन योगासने केली

**जयंती उत्सव**

सुशिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय भाऊसाहेब लहाने यांची जयंती २२ जून रोजी विविध कार्यक्रमांद्वारे साजरी करण्यात आली . याप्रसंगी महाविद्यालयात 'मोतीपुष्प 'हा वार्षिक अंक प्रकाशित करण्यात आला .

**स्वयंसेवक नोंदणी**

दि १ जुलै २०२३ पासून राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे गठन करण्यात आले .स्वयंसेवक व स्वयंसेविकांची नोंदणी सुरू करण्यात आली . प्रवेश अर्ज भरून घेऊन रीतसर नोंदणीस या दिवसापासून सुरुवात करण्यात आली .

**छत्रपती शाहू महाराज जयंती**

सोमवार दि २६ जून २०२३ रोजी महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली .महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही .सी . खारोडे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण केले .सदर कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ रामकृष्ण गावंडे यांनी केले .

**जिजामाता पुण्यतिथी**

राष्ट्रमाता जिजाऊ पुण्यतिथी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने २ जुलै २०२३ रोजी साजरी करण्यात आली .सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ वासुदेव भगत यांनी जिजामाता यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून समायोजित मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका बहुसंख्येने उपस्थित होते .

**लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती**

दि १ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले .या कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ पंकज तायडे हे होते .त्यांच्या हस्ते दोन्ही महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून समयोचित मार्गदर्शनाने सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

**सद्भावना दिन**

दि २०ऑगस्ट २०२३ रोजी भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिन म्हणून साजरी करण्यात आली .महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही सी खारोडे यांनी स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण केला व सद्भावना दिनाबद्दल विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले .

**शिक्षक दिन**

दि ५ सप्टेंबर २०२३ रोजी इंग्रजी विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली .याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर इंग्रजी भाषेतून प्रकाश टाकला .सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून समायोजित मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमारी पल्लवी काळदाते हिने केले .

**मतदार जनजागृती कार्यक्रम**

१३ सप्टेंबर २०२३ रोजी मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले .सदर रॅली मधील विद्यार्थ्यांना मतदान करण्यासंबंधीचे आवाहन करून लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे व मतदान स्वतः करून इतरांना करण्यासाठी प्रोत्साहित करावे ही शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली .

**राष्ट्रीय सेवा योजना दिन**

दि . २४सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने साजरा करण्यात आला .या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना 'एक विद्यार्थी - एक वृक्ष 'लावण्यासाठी १०० वृक्ष वितरित करण्यात आले .त्याचबरोबर वृक्ष जगवण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले महाविद्यालयाच्या परिसरात सुद्धा वृक्ष लागवड व संगोपन करण्याचे दृष्टीने नियोजन करण्यात आले .

**स्वच्छता रॅलीचे आयोजन**

दि ३०सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता रॅलीचे आयोजन करून ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले . प्लास्टिक निर्मूलन व ग्राम स्वच्छता करून परिसर स्वच्छ करण्यात आला .

**गांधी जयंती**

राष्ट्रीय सेवा योजना व इंग्रजी विभागाचे संयुक्त विद्यमाने दिनांक 2 ऑक्टोबर 2023 रोजी गांधी जयंती चे आयोजन करण्यात आले .सदर कार्यक्रमात बहुसंख्य स्वयंसेवकांनी भाग घेऊन इंग्रजी भाषेत महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला .

**'मेरी माटी -मेरा देश'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावरून' मेरी माटी - मेरा देश' या उपक्रमाचे आयोजन दि ४ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२३ दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करून पंतप्रधान यांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यात आला . महाविद्यालयात ७५ रोपांची अमृत वाटिका निर्माण करण्यात आली तद्वतच ' कलश ' ची स्थापना करून अमृत कलशामध्ये प्रत्येकी मुठभर माती विद्यार्थ्यांना जमा करण्याचे आवाहन करण्यात आले .

**संविधान दिन**

दि २६ नोव्हेंबर २०२३ रोजी राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करून संविधान दिन साजरा करण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा सुनील मनवर तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ रेखा काळबांडे यांची उपस्थिती होती . प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ रामकृष्ण गावंडे यांनी केले अध्यक्ष महोदयांनी अध्यक्षीय भाषणामधून संविधानाबाबत यथोचित मार्गदर्शन केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु . निलाक्षी महल्ले हिने तर आभार प्रदर्शन कु .निकिता तावरे हिने केले .

**डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा दि ६डिसेंबर २०२३ रोजी 'महापरिनिर्वाण दिन 'साजरा करण्यात आला . याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही सी खारोडे यांचे शुभ हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यांना हार अर्पण करण्यात आला .विविध कार्यक्रमाने सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

**वैराग्यमूर्ती गाडगेबाबा पुण्यतिथी**

दि २० डिसेंबर २०२३ रोजी वैराग्यमूर्ती वंदनीय गाडगेबाबा यांची पुण्यतिथी परिसर स्वच्छ करून साजरी करण्यात आली . याप्रसंगी प्राचार्य खारोडे यांनी गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पुजन करून हार अर्पण करून गाडगेबाबांच्या दशसूत्री वर प्रकाश टाकला .

**सावित्रीबाई फुले जयंती**

दि ३जानेवारी २०२४ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती 'महिला मुक्ती दिन 'म्हणून साजरी करण्यात आली सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषणांचे आयोजन याप्रसंगी करण्यात आले होते पूजन व हरार पण करून सावित्रीबाई फुले यांची माहिती विद्यार्थ्यांना अध्यक्षांनी पटवून दिली .

**मतदार दिवस**

दि २५ जानेवारी २०२४ रोजी मतदार दिवस मतदार रॅली काढून साजरा करण्यात आला . नवमतदारांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्याचे आवाहन याप्रसंगी करण्यात आले .ज्यांची नावे मतदान यादीत समाविष्ट आहेत त्यांनी मतदान न चुकता करावे व लोकशाही बळकट करावी असे आवाहन करण्यात आले . रॅली काढून गावकऱ्यांना मतदान करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले याप्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी हजर होत्या .

**जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती**

दि १२जानेवारी २०२४ महाविद्यालयात युवकांचे प्रेरणास्थान असलेले स्वामी विवेकानंद व जिजामाता यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली . याप्रसंगी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत भाग घेऊन जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आपले विचार मांडले .त्यांच्या कार्याचा गौरव करून तत्यांना मानवंदना देण्यात आली .

**वैराग्यमूर्ती गाडगेबाबा जयंती रक्तदान करून साजरी**

इंग्रजी विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांचे जयंती गाडगेबाबांच्या दशसूत्री वर आधारित भाषण स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांची मते जाणून घेतली अनेक विद्यार्थ्यांनी आपली मते इंग्रजी भाषेमधून व्यक्त करून श्रोत्यांची मने जिंकली .

वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्या जयंतीचे अवचित्य साधून राजे व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरामध्ये शिक्षक रुंद व विद्यार्थ्यांनी रक्तदान करून गाडगेबाबांची अनोखी जयंती साजरी करण्यात आली .

**भाऊसाहेब लहाने यांची पुण्यतिथी**

दि ११मार्च २०२४ रोजी सुशिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय भाऊसाहेब लहाने यांची पुण्यतिथी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन रुग्णांना फळे व बिस्किट वाटप करून साजरी करण्यात आली

**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती**

दि १४ एप्रिल २०२४ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना हार अर्पण करून मानवंदना देण्यात आली .

# Bhausaheb Lahane Dnyanprakash Arts College,Pinjar

**Dist. Akola**

# Academic – Calendar

# 2024 – 2025

Reference (1) Notification, dt. 20.12.2024

| Sr.No. | Session & Vacation | Days | From | Till |
|---|---|---|---|---|
| 1 | **First Session** | 108 | Tuesday, 11 June, 2024 | Saturday, 26th October, 2024 |
| 2 | Admission Process | - | Tuesday, 11 June, 2024 | As per of the university Ordinance |
| 3 | Induction Programme (For 1st Year Students) | 07 | Tuesday, 25th June, 2024 | Tuesday, 02th July, 2024 |
| 4 | Teaching Days Odd Semesters | 90 | Wednesday, 03th July,2024 | Tuesday, 26th October, 2024 |
| 5 | First Term Vacation | 21 | Monday, 28th October, 2024 | Sunday, 17th November, 2024 |
| 6 | Odd Semesters University Examinations/ | 39 | Tuesday, 5th November, 2024 | Friday, 20th December, 2024 |
| 7 | Academic Session **Second Session** | 124 | Monday, 18th November, 2024 | Monday, 21th April, 2025 |
| | Non-instructional days (For N.S.S., Gathering etc.) | 07 | Saturday, 21st December, 2024 | Friday, 27th December, 2024 |
| 8 | Teaching Days (Even Semesters) | 90 | Saturday, 28th December, 2024 | Monday, 21th April, 2025 |
| 9 | Even Semesters University Examination | 40 | Tuesday, 22th April, 2025 | Monday, 09th June, 2025 |
| 10 | Second Term Vacation | 45 | Tuesday, 22th April, 2025 | Thursday, 05th June, 2025 |
| 11 | Commencement of Next Academic Session 2025-2026 | Friday, 06th June, 2025 | | |

# Planning and Activities

| Sr. No | Months | Events & Activities |
|---|---|---|
| 1 | JULY | 1) Staff Council Meeting 3th July<br>2) Admission Process<br>3) Teaching Plan<br>4) IQAC Meeting (I)<br>5) Induction Programme (For 1st Year Students)<br>6) Bridge Course |
| 2 | AUGUST | 1) Independence Day's Celebration 15th August.<br>2) Enrollment of NCC<br>3) Tree Plantation & plants distribution<br>4) Kranti Diwas – 9 th August |
| 3 | SEPTEMBER | 1) Teacher Day – 5th Sept.<br>2) Unit Test<br>3) International Literacy Day 08th Sept.<br>4) NSS Day 24th Sept.<br>5) Formation of Study Circle<br>6) Participation in University Games Practice of Games by |
| 4 | OCTOBER | 1) Staff Council Meeting 5th Oct.<br>2) Gandhi Jayanti 02nd Oct.<br>3) Second meeting of IQAC |
| 5 | NOVEMBER | 1) Reopening after Diwali Vacation on<br>2) Information Literacy Programme - Library Dept.<br>3) Guest Lecture- Library dept.<br>4) College internal Exam & Practice Test<br>5) IQAC Meeting ( II) |

| | | |
|---|---|---|
| 6 | DECEMBER | 1) Women's Empowerment<br>2) Parents Meet.<br>3) Blood Donation camp<br>*4)* Ambedkar's *Mahaparinirvana Din*<br>5) AIDS Week |
| 7 | JANUARY | 1) Republic Day 26th Jan.<br>2) NSS Special Camp<br>3) Annual Gathering<br>4) Inter-Collegiate Debate Competition |
| 8 | FEBRUARY | 1) Staff Council Meeting 05th Feb.<br>2) Unit Test<br>3) Shiv Jayanti 19th Feb.<br>4) IQAC Meeting<br>5) Physical Test- Physical Dept.<br>6) Environment Trip |
| 9 | MARCH | 1) Staff Council Meeting 6thMar.<br>2) International Woman's Day 08th Mar.<br>3) Alumni Meet |
| 10 | APRIL | 1) Dr. Ambedkar Jayanti 14th April.<br>2) College internal Exam & Practice Test<br>3) NAAC Work Completion with Documentary Evidence and submission to IQAC<br>4) IQAC Meeting (III) |

# Festivals/Holidays

## 2024-25

| Sr No. | Festivals/ Holiday | Days& Date |
|---|---|---|
| 1 | Moharum | Wednesday, 17th July, 2024 |
| 2 | Independence Day | Thursday, 15th August, 2024 |
| 3 | Parsi New Year (Shahenshahi) | Thursday, 15th August, 2024 |
| 4 | Rakshabandhan | Monday, 19th August, 2024 |
| 5 | Pola | Monday 02nd September, 2024 |
| 6 | Ganesh Chaturthi | Saturday, 07th September, 2024 |
| 7 | Gouri Poojan | Wednesday, 11th September, 2024 |
| | Id-E-Milad | Monday 16th September, 2024 |
| 8 | Anant Chaturdashi | Tuesday, 17th September, 2024 |
| 9 | Mahatma Gandhi Jayanti/Sarvapitri Darsha Amavasya | Wednesday, 2nd October, 2024 |
| 10 | Dasara | Saturday, 12th October, 2024 |
| 11 | Christmas | Wednesday, 25th December, 2024 |
| 12 | Republic Day | Sunday, 26th January, 2025 |
| 13 | Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti | Wednesday, 19th February, 2025 |
| 14 | Mahashivratri | Wednesday, 26thFebruary, 2025 |
| 15 | Holi (Second Day) | Friday, 14th March, 2025 |
| 16 | Ramzan Id (Id-Ul-Fitar) | Monday, 31th March, 2025 |
| 17 | Mahavir Jayanti | Thrusday, 10th April, 2025 |
| 18 | Dr. Babasaheb Ambedkar Jyanti | Monday, 14th April, 2025 |
| 19 | Good Friday | Friday, 18th April, 2025 |

# सोडून गेल्यावर “Miss you”म्हणण्यापेक्षा सोबत आहे तोपर्यंत “With you”म्हणा

‘‘ लाखो जीव घेणाऱ्या क्रुर हिटलरने आत्महत्या केली शेवटी’’!

‘‘सुंदर विचार देणारे साने गुरूजी आत्मधात करून घेतात’’

‘‘मनशक्ती नावाचं मनाला खंबीर करण्याच शिक्षण देणारे लोणावळ्याचे स्वामी विज्ञानानंद मंत्रालयावरून उडी मारून जीव देतात’’

‘‘आध्यात्मिक गुरू अशी ओळख निर्माण केलेले व कित्येकांना आधार देणारे भैय्युजी महाराज आपलं जीवन आपल्या हातात संपवतात.

‘‘पॉझिटिव्ह विचार देणारा चित्रपट करूनही सुशांत सिंग राजपुतनं नैराश्यातुन आत्महत्या केली. ’’

‘‘ आणि आता काही वर्षांपुर्वी नैराश्याची लढा कसा घ्यायचा हे शिकवणाऱ्या शीतल आमटे करजगी आपल जीवन संपवतात’’

‘‘काही महिण्यापुर्वी नागपूरची बातमी उच्च विद्याविभुषित दिवंगतत कुलगुरू च्या पत्नी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ज्योत्सना मेश्राम यांनी नवव्या माळयावरून वडी घेऊन नैराश्यातुन आत्महत्या करतात’’.

या काही सेलिब्रिटींच्या उदाहरणावरून काय शिकायच आपण?

पाण्यात शांतपणे पोहोणांर बदक करून शांत दिसत अत्यंत तरी पाण्याखाली त्याचे पाय वगाने हलत असतात. शांत पोहोतोय हे दाखवण्यासाठी फक्त त्याचें कष्ट त्यालाच माहित असतात.

माणुस वर वर दिसतो तितका आतून थंबिर असेलच असे नाही मनात वेगळी खळबळ असू शकते त्याच्या जी आपल्यापर्यंत पोहोचत नसते किंवा तो त्या आनंदी आणि सुखी चेहऱ्याच्या आड लपवत असतो, लपवण्याचा प्रयत्न करत असतो शेवटी काय.... ? बर सुंदर ताजमहाल असला तरी पायात कंबरच आहे हे विसरून चालत नाही.

## ‘‘Outlet’’

भैय्यूजी महाराजांनी आत्महत्या केल्या नंतर ऐ.बी.पी माझा चॅनलचे एक परिचिर्चा घडवुन आणली होती.

त्यात बोतलाना भैय्यूजी महाराजांचे मित्र अशोक वानखडे यांनी मानवी स्वभावाचा फार चागला पैलू सांगितला भैय्यूजी महाराज स्वत: एक ‘‘आध्यात्मीक’’ गुरू होते परंतू तो एक व्यक्ती पण होते आपल्या मनातील ‘‘स्ट्रेस’’ बाहेर काढायला त्याच्या जवळ ‘‘Outlet’’ नव्हता

(बाबा आमटे यांची नात – त्याचं ही अगदी भैयु महाराजासारख झाले)

इतक महत्वाचं असतं काटे हे Outlet? होय!

कोठयावधी रूपये खर्च करून पाण्यासाठी विशालं धरण बांधल आणि समजा त्याला ‘‘Outlet’’ च दिले नाही तर काय होईल? निश्चितच धरण फूटेल इतंक महत्वाचे असते हे ‘‘Waste weir’’ मानवी शरीर म्हणजे विविध पंचतत्वापासून सांधलेलेलं आवक अति प्रमाणात झाली तर हे शरीरूपी धरण फुटेल की राहिल? मुंबई का डुबते? पुरेसे ‘‘Outlets’’ राहिले नाहीत.

म्हणून आपलं ‘‘Outlet’’ सदैव सताड उघंड ठेवा आपल्या तोंडाचे ‘‘Outlet’’ वापरून आपला समस्या, आपल्या माणसांना सांगा आपल्या अंर्तमनात ‘‘Outlet Open’’ करण्यासाठी विपश्यता, ध्यान साधनेचा अवलंब करा आणि शक्य झाल्यास जगातील सगळयात मोठं ‘‘Outlet’’ म्हणजे आपले डोळे ते उघडा फुटून जाऊ घ्या अश्रुचा बांध वाहुन जाऊ घ्या, स्ट्रेस दु:ख अपेक्षा, पिस्तोलच्या गोळीने डोक्याला छिद्र पाडण्यापेक्षा पंठयाला लटकवण्यापेक्षा हे केव्हाही सोप नाही का?

म्हणुनच मित्र नावाच्या खांद्याला आधार घ्या मन मोकळ करा बेस्ट आऊटलेट परिवार आणि मित्र।

हसा! बोला!रडा! भांडा! व्यक्त व्हा!! मुक्त व्हा..!! काळजी घ्या...

सोडून गेल्यावर “Miss you’’ म्हणण्यापेक्षा सोबत आहे तोपर्यंत “With you”म्हणा आपुलकीची माणसं मिळायला खुप मोठं भाग्य लागतं. So enjoy your life.

**— शुभांगी कैलास काकड**

**बी.ए.अंत्य**

# एक स्त्री

सकाळी उठल्या पासुन घरात राब राब राबते
कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

स्वत: स्वंयपाक करून आधी सर्वांना वाढते
कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

सणावाराला स्वत: मात्र तशी राहते पण मलांना
कपडे आणते कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

घर यश्याच्या मार्ग नेण्यासाठी ती काय कार करते
कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

तिच्या पावली काटा पण मुल्याच पावली फुलच
यावे अशी आशा ठेवते कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

माझं घर नेहमी सुखात राहतं हेच
मागणं देवाकडे मागते कारण ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

एक स्त्री तीच अस्तित्व  तीच्या परिवारात बघते
म्हणून ती तीच्या आधि परिवारासाठी जगते

**– यमुना ग. देशमुख**

**बी.ए.अंत्य.**

# स्वच्छता अभियान

स्वच्छतेचे महत्व मंत्र ध्यानी धरा

आरोग्य आपले निरोगी करा

स्वच्छ भारताचे स्वप्न सर्वप्रथम संत गाडगेबाबा आणि महात्मा गांधीनी पाहिले होते.

देशातील नागरिकांना चांगले जीवन जगण्यसाठी काही अधिकार देण्यात आले आहेत जिथे अधिकार आहेत तिथे जबाबदाऱ्याही आहेत मुलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी कायदे करण्यात आले आहेत. नागरिकांच्या विकासाची जबाबदारी नागरीकावरच आहे. देशाचे नागरिक म्हणून आपण आपले हक्क आणि कर्तव्य बजावले पाहिजे हक्क आणि कर्तव्य या एकाच नावाच्या दोन बाजू आहेत देशाचे सुयोग्य आणि जबाबदार नागरिक होण्यासाठी आपण आपले कर्तव्य बजावले पाहिजे विविध नैसर्गिक सौदर्याने नटलेल्या या देशात सध्या वाढत्या लोकसंख्येमुळे असंख्य बाबींमुळे कचऱ्याचे प्रमाण अस्वच्छतेचे प्रमाण वाढतच आहेत अशा गलिच्छ वातावरणात राहण्यामुळे आपले आरोग्य धोक्यात येउ लागले आहे.

हिरवे हिरवे गार गालिचे

हरिततृणांच्या मखमालीचे

त्या सुंदर मखमलीवरती

फुलराणी ही खेळत होती.

ही कविता ऐकली की आपल्या डोळ्यासमोर जणू स्वर्गच अभा राहतो. पण याचे स्वप्न न पाहता प्रत्यक्षात स्वर्ग निर्माण करू शकतो आज आपण विचार केला तर जिकडे पहावे तिकडे प्रदुषण कचऱ्याची समस्या रोगराई अशा एक ना एक समस्यांना आपल्याला तोंड दयावे लागते. ही परीस्थीती बदलण्यासाठी आरोग्याच्या गुरूमंत्र प्रत्येक नागरीकाने स्वीकारायला हवा.

स्वच्छतेचा घेऊन ध्यास

मनात फुलाची फुलवावी आस

पसरदारी फुलवावी नाग

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन मला असे वाटते की स्वच्छतेचे पाठ हा प्रत्येक नागरिकाने मनापासून गिरबाबा माझ गाव स्वच्छ असेल तर माझादेश स्वच्छ होईल ही भावना प्रत्येक नागरिकाने आपल्या मनात राबवायला हवी प्रत्येक नागरिकाने स्वत:पासूनच करावा वैयक्तिक स्वच्छता ठेवली तरच परिसराची पण स्वच्छता ठेवता येईल परिसर स्वच्छतेत मर्यादित राहण्यापेक्षा गाव स्वच्छतेकडे आपोआप लक्ष दिले जाईल गावातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जाईल.

ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर

ग्रामसत्ता प्रलयची

हे लक्षात घेवून प्रत्येक नागरिकाचे स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे माझ्या देशातील प्रत्येक परिसर माझाच आहे मला त्या परिसरात त्या गावात अस्वच्छता पसरू घ्यायची नाही हेच माझे आदय कर्तव्य राहील आणि मी सतत त्यासाठी प्रयत्नश राहील ही भावना प्रत्येक नागरीकांच्या मनात असायला हवी तसेच प्रत्येक नागरीकांच्यामनात असायला हवी तसेच प्रत्येक नागरीकाने प्लास्टिक पिशविचा वापर न करता कापडी पिशवीचा वापर केला पाहीले ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळया डब्या मध्ये साचवावा उपल्या घरासारखीच परिसराची सुध्दा स्वच्छता ठेवावी.

सर्व ठिकाणी स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी माझी राहील हे प्रत्येक नागरिकाने मनाशी निश्चित केलले पाहीजे जर सुधारणा करायची असेल तर प्रत्येक नागरीकाने दुसऱ्याकडे बोट न दाखविता आणि यंत्रणाना दोष न देता स्वत: पासूनच सुरूवात करायला हवी तरच आपले गाव आपला देश स्वच्छ व सुदंर होऊ शकेल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वप्न होते आपणच ते पूर्ण केले पाहीजे ही आपली जबाबदारी आहे स्वच्छता हे सर्व रोगांचे औषध आहे.

धरती पाणी हवा ठेवा साथ नाही तर येणारी पिढी करणार नाही माफ.

देश वासियोकी ययही है इच्छा गंदगी से हो भारत की रक्षा

शपथ लो अपना कर्तव्य निभाओगे इधर—उधर कुडा ना फैलाओगे

स्वच्छ भारत होगा गौरवशाली सबके लिए लाएगा खुशिया निराली

देश गौरव तभी बढेगा जब देश स्वच्छता की राह पर चलेगा

इसी स्वच्छता की लिए सुरू हुआ एक अभियान

जो लोगो में जगा रहा नया स्वाभिमान आयो सब मिलकर ले संकल्प स्वच्छता अपनाकर देश का करेगे कल्याकल्प हर भारतवासी का ढास यही अभिमान

पूर्ण हो अपना स्वच्छ भारत अभिमान

— कु. तेजल पु. सोनोने

बी.ए. अंत्य.

# मैत्री

मैत्री कशी असावी तुझ्या आणि माझ्या सारखी असावी
चुकली तर रागवणारी प्रेमाने समजून घेणारी
शब्दात न सांगता डोळ्यात पाहुन ओळखणारी प्रेमाने मिठी मारणारी
मैत्री अशी असावी....
प्रेमाने हाक मारणारी स्वत: पेक्षा जास्त विश्वास ठेवणारी
जिवापाड प्रेम करणारी भावनाना माझ्या समजुन घेणारी मैत्री अशी असावी.

आयुष्यात जरी कितीही आले तरी हृदयात जागा फक्त तिची असावी
वेळ नसला तरी वेळ काढुन मला वेळ देणारी
मैत्री अशी असावी...
या स्वार्थी जगात निस्वार्थ प्रेम करणारी
सुखः दु:खात साथ देणारी
स्वार्थी न होता सार्थी होणारी
मैत्री अशी असावी...
माझ्या स्वप्नांना आकाशी झेप घे म्हणणारी
पंखांना उंच भरारी देणारी
मैत्री अशी असावी
तुझ्या आणि माझ्या सारखी असावी
मैत्री अशी असावी...

कु. स्नेहा सुरेश भारस्कर
बी.ए.भाग १

# विचाराचे वेड

नेहमीच नसतं अचुक कुणी,
घड्याळ देखील चुकतं राव.
जिंकलो जिकलो म्हणता म्हणता
निसटून जातो हातुन डाव.
पडता जातात उलटे फासे
घरा सोबत फिरतात बासे,
आधाराचे हातही मग होत जातात दिसे नासे
अश्या वेळी मोडू नये. धीर कधी सोडू नये.
नशिबाच्या नावानेही उगाच गळा काढू नये.
जेव्हा फोल ठरतात दावे. जेव्हा कोल ठरतात दावे.
कळतं नाही कुठे जावे सगळी दारं मिटतात तेव्हा
आपणच आपला मित्र व्हावे
मग अचुक दिसते वाट,
बुडण्या आधीच मिळतो काठ,
हसत हसत झेलता येते.
खडक होऊन प्रत्येक लाट,
म्हणुन म्हणतो फक्त एकदा
म्हणून म्हणतो फक्त एकदा
केवळ इतकं जमवून पहा.
आप्त, सखा जिवलग, यार
स्वत:त शोधुन पहा...!
म्हणून म्हणतो आप्त सखा जिवलग, यार
स्वत:त शोधून पहा...!

कु. वैष्णवी नं.राऊत
बी.ए. भाग २

# आयुष्य

कुणाचं कुणा पासून काहीही अडत नसतं
आपल्याला हवं तस कधी घडत नसतं
आयुष्य हे नाग मोळी वाट आहे
पुढून काय येतंय हे
समोर गेल्या शिवाय कधी कळत नसतं
स्वत:ला स्वत:च घडवायचं असतं
कारण कुणीही कुणासाठी पळत नसतं
म्हणून तर आयुष्य नेहमी हसत जगावं
जीवन हे एक ना एक दिवस तरी
सरतच असतं

कु. वैष्णवी नं. राऊत
बी.ए. भाग २

# कसं जगायचं

आयुष्य जगणं हि एक कला आहे

कस जगायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.

''दु:ख सगळ्यांनाच असतात मग दु:खात दु:खाला समोरे ज्यायचं की दु:खात पिचत जगायच, हे ज्याचं त्याने ठरवायचं असत...''

''उदयाच्या चिंता ह्या सगळ्यांनाच असतात पण पदयाची शाश्वती मात्र कुणालाच नसते,

मग उद्यासाठी मारायचं की आजच्या दिवसामध्ये संपूर्ण आयुष्य जगायचं,

हे ज्याचं त्याने ठरवचं असतं.''

''समाजत आपले अस्तित्व जर टिकवायचं असेल ना तर स्पर्धा ही अटळ आहे पण स्पर्धा दुसर्याशी आहे की स्वत:ची स्वत:शीच, हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.''

''समाज हा दुसर्याना निंदा करण्यासाठीच असतो मग कुणासाठी जगायचं समाजासाठी जगायचं की स्वत:साठी, हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.''

''आयुष्यात सुखाचे चार क्षण येतात मग टिचभर सुखात सुख मानायचं.!

ते सुख वाटून वाढवायचं, हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.''

''कुणाच्या तरी आदर्शानिवती जगायचं! की स्वत:चा आदर्श सोडून जायचं. हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.''

''प्रत्येक सामान्य माणसामध्ये..! काहीतीर असामान्य असतच मग सामान्य होऊन जगायचे की असामान्य होऊन जगायच, हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.''

कु. पल्लवी त्र्येबंक काळदाते

बी.ए.अंत्य

# छत्रपती श्री. शिवाजी महाराज



आदिशक्ती तुळजाभवानी आणि या आदिशक्तीच आदिमायाचं वात्यल्य मांगल्य आणि पावित्र्य माणसाच्या जन्माला होऊन येणाऱ्या राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ साहेब, उभ्या हिंदूस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराष्ट्र मातीला छत्रपती शिवाजी महाराजांनी कसं जगावं शिकवल्यानंतर या महाराष्ट्राच्या मातीला आणि मातीच्या कणाला आणि मातीत जगणाऱ्या माणसाला शेवटच्या श्वासापर्यंत कसं रहांव हे शिकवणारे छत्रपती संभाजी महाराज याच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करते...

सर्वात प्रथम शिवछत्रपतींना मानाचा मुजरा क्षत्रिय कुलावंतस राजाधिराज योगिराज श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज की जय प्रौढ प्रताप पुरंदर क्षत्रिय कुलावंतस श्रीमंतयोगी रणधूंरदर छत्रपती संभाजी महाराज की जय...

महाराष्ट्राचे आराध्य दैवत, भूपती, नृपती, पृथ्वी, पती, परम प्रतापी, प्रगल्भ बुध्दिमान विज्ञाननीष्ठ जगविख्यात विश्व वंदनीय, राजाधिराज योगी रोज श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराजांना या जिजाऊ लेखी चा मानाचा मुजरा..!

''छत्रपती शिवाजी महाराज की जय'' हे शब्द कानावर पडताच ज्यांच्या मुखातून आपोआप जय बाहेर पडतो रंक्त सळसळते... छाती अभिमानाने फुलते...! आणि अंगावर सर्रकन काटा येतो अशा मराठमोळ्या बंधू आणि भगिनिनो,आज मी येथे अशा एका माहन महापुरूषानी गाथा आपल्याला सांगणार आहे ज्यांच्या तुम्हालाच नाही तर संपूर्ण देशाला अभिमान आहे.

विजेसारखी तलवार चालवून गेला बिघड्या छातीने हिंदुस्तान हलवून गेला! वाघ नख्याने उफजलखानाचा कोथळा पाडून गेला स्वर्गात गेल्यावर ज्याला देवांनी झूकून मुजरा केला. असा मर्द मराठा शिवबा होऊन गेला! शिवबा होऊन गेला.!

आज या भूमीत जन्म होतलेल्या मुलाला सांगावे लागत नाहि की, छत्रपती शिवाजी महाराज कोण होते. कारण जन्मताच इथली माती त्याच्या मनामध्ये शिवरायांचे नाव करून ठेवते. शिवछत्रपती हे नाव भारतातच नव्हे तर संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यात सर्वत पसरलेले आहे कोण होते शिवाजी महाराज? असे कोणते काम त्यांनी केले की आज तीनशे चोऱ्याण्णव वर्षे अलटन देखील त्यांच्या नावाचा जयजयकार करण्यात येतो.

मित्रांनो इथल्या लोकांना तर सोडाच पण इथल्या दर्या—खोर्यात जाऊन विचारले तरी शिवाजी महाराज कोण होते? तर ते सांगतात रूद्राचा अवतार, तो वाघाचा ठसा होत. विचारा त्या सह्याद्रीला आणि विचारा त्या सागरी लहरींना कसा होता माझा शिवबा.!

खरं तर छत्रपती शिवाजी महाराज हे नावाच असं आहे की त्यांच्या नावातील प्रत्येक अक्षर हे त्यांच्या कार्याची व पराक्रमाची महती सांगणारे व प्रेरणा देणारे आहे.

'छ' — म्हणजे शिवरायांच्या अंगी छत्तीस हत्तीचे बळ होते.

'त्र'— म्हणजे त्रस्त मोगलांना मदत करणारे

'प'— म्हणजे परत न फिरणारे

'ती' म्हणजे तिन्ही जगात जाणणारे

शिस्तप्रिय जिजाऊचे पुत्र, महाराष्ट्राची शान, हार न मानणारे राज्याचे हितचिंतक, जनतेचा राजा म्हणजे शिवाजी महाराज होय.

एकेकाळी आम्ही जनावरासारखे जीवन जगत होतो आमचा आमच्या अन्नधान्यावर सोडाच पण आमच्या देहावर देखील आमचा अधिकारी राहिला नव्हता जनावर आणि माणसं तर ूरच पण इथल्या मंदिरातील देव देखील सुरक्षित राहिले नव्हेते याच दरम्यान शिदखेड्याचे राज लखजी जाधव यांची कन्या म्हणजेच साक्षात दुर्गा, भवानी, रणचंडी जिजाऊ यांचा विवाह हा निजामशाहीचे तोडीस तोंड असलेले थोर सरदार मालोजी राजे भोसले यांचे सुपुत्र शहाजीराजे भोसले यांच्याशी झाला. त्यावेळी महाराष्ट्रात पाच सुलतानी सत्ता राज्य करत होत्या त्यांच्या आपसात सतत लढाया व्हायच्या यात महाराट्राचे मोठे नुकसान व्हायचे आणि असंख्य मराठी सैनिक नाहक मारले जायचे. अशा परिस्थिती महाराष्ट्रच्या भूमीत हवा होता एक पेटता अंगार. .! अखेर ती वेळ आली आणि सह्याद्रीची गर्जना झाली फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१, १९ फेब्रुवारी १६३० रोजी जिजाऊची पुण्याई फळाला आली कारण जनतेचा पोशिंदा राजा शिवबा जन्मला आहे.

माझा राजा, जन्मला माझा शिवबा जन्मला दीन दलितांच्या कैवारी जन्मला दुष्टांचा सहारा जन्मला गेल्या कित्येक वर्षापासून अंधारात चाचपडणाऱ्या या महाराष्ट्राच्या माथ्यावर जणू प्रकाशाचे किरण पसरू लागले. शिवराय जिजामाते जिजाऊंनी शिवबाला लहानपणी पासून सत्यासाठी न्यायासाठी लढायला शिकवले शूरवीरांच्या गोष्टी सांगितल्या.

जर कुणी चुकत असेल तर त्याला सत्याची वाट दाखवा आणि जर कोणी रडत असेल तर त्याला मराठयाची जात दाखवा अशी शिकवण जिजाऊ कडन शिवरायांना मिळत गेली भोळ्या—भाबड्या जनतेला गुलामी गिरीतून मुक्त करण्याचा दुष्टिकोन त्यांनी शिवराया समोर ठेवला.

आणि म्हणून म्हणावेसे वाटते थोर तुमचे कर्म, जिजाऊ तुझे उपकार कधी फिटणार नाही. सूर्य चंद्र असेपर्यंत नाव तुमचे कधी मिटणार नाही.

कसा कसेल तो पुत्र, कसा असेल तो राजा कसे असेल ते राज्य आणि कसे असतील ते शिवछत्रपती महाराज. छत्रपती मावळ्याचामेळ, शिवछत्रपती म्हणजे मावळ्यांचा मनगटातील बळ, शिवछत्रपती म्हणजे छाती वरचा वार शिवछत्रपती मना मनातले धैर्य, शिवछत्रपती म्हणजे सह्याद्रीचे शौर्य..!

शिवछत्रपती म्हणजे जिजाऊचे पुत्र छवछत्रपती म्हणजे व्यक्ती नसून एक विचार आहे. व्यक्ती नष्ट होतात पण विचार नष्ट होतात पण विचार नष्ट होत नाही आणि अशा विचारांना घडविण्याचे काम के राजमाता जिजाऊंनी केले मातेकडन मिळालेले संस्कार व स्वराज्य स्थापनेची प्रेरणा घेऊन शिवाजी महाराजानी आपल्या बांधवांना गुलामागिरीतून मुक्त करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ढेवला आणि त्याप्रमाणे वाटचाल केली. आणि सह्याद्रीच्या कडेकपारीत भटकती करून सवंगडी गोळी केले तानाजी येसाजी नेताजी, सूर्याजी सारखे जीवाला जीव देणारे मावळे जमवले. रायरेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची स्थापनेची प्रतिज्ञा घेतली हर हर महादेवाची गर्जना आसमतात घुमली आणि वयाच्या चोदाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेचा प्रवासास सुरूवात झाली.

एक होते शिवाजी भिती नव्हती त्यांना जगाची चिंता नव्हती परिणामांची कारण त्यांना साथ होती मावळ्यांची आणि शिकवण होती जिजाऊची याची जात होती मर्द मराठ्यांची देशात लाट आणली मुहर्तमेढ रोवली स्वराज्याची...

म्हणूनच म्हणतात जय जिजाऊ जय शिवराय.. शिवरायांनी आपले शौर्य, कल्पकता, संघटन कौशल्य राज्य धर्मपालन, स्त्रीदाक्षिण्य आदी गुणांनी गेले अनेक शतके पारतंत्र्यात बुडालेल्या या भूमीला स्वातंत्र्य मिळवून दिले.

हातात धरली तलवारी.... छातीत भरले पोलाद....

निरक्षर मराठ्यांचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहुन ठेवावा इतका तेजस्वी आणि ओजस्वी आहे. घेऊन मुठभर मावळे आणि निघडी छाती सोडून सारे ऐश्वर्य लढला.. तूच आमचे मंदिर तूच आमची मूर्ती..

मित्रांनो आजच्या युगात खरी गरज आहे ते शिवरायांचे विचार आणि गुण अंगी करण्याची शिवरायांचा इतिहास जपण्याची गड—किल्यांचे संरक्षण करण्याची छत्रपती शिवरांयाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्याच प्रमाणे कार्य करण्याची जात भेद न मानता सर्वानी एकत्र येऊन कार्य करण्याची हीच असेल माझ्या राजाची कीर्ती शिवछत्रपतीची परस्त्रीमाते समान मानून तिचे रक्षण करण्याची त्यामुळे आज घडत असलेल्या घटना जसे की निर्भया प्रकरण या सारख्या घटना घडतील नाही.

त्यामुळे आपल्याला शिवबासारखे आचरण अंगी बाळगावे लागणार व आज आपण सर्व तरूण पिढी यांच्या जन्म दिवशीयांचे गुण अंगी बाळगण्याची शपथ घेवू.

जय हिंद जय शिवराय जय महाराष्ट्र

कु. पल्लवी त्र्येबंक काळदाते

बी.ए.अंत्य

# ज्या मुली लहान कपडे घालतात त्यासाठी एका वडीलाकडून समर्पित

एका मुलीला तिच्या वडिलांनी I Phone भेट दिला दुसऱ्या दिवशी वडिलांनी मुलीला विचारले, I Phone मिळाल्यानंतर सर्वात पहिले तु काय केलंस?

मुलगी :— मी सर्वात पहिले I Phone स्क्रॅच गार्ड आणि कव्हर आर्डर केले आहे.

वडील :— तुला हे करायला कोणीतरी जबरदस्ती केली का?

मुलगी :— नाही. कोणीच नाही.

वडील :— तुला असं वाटत नाही का? तु Apple कंपनीची बेज्जती केलियेस?

मुलगी :— नाही, उलट फोन लवकर खराब होऊ नये म्हणून मी आयफोनच्या कंपनीनेच कव्हर आणि स्क्रॅच गार्ड लावायला लावले आहे.

वडील :— हो का, म्हणजे I Phone दिसायला एवढा खास नसेल. म्हणूनच कव्हर लावायला सांगितल असेल.

मुलगी :— नाही, फोन लवकर खराब होऊ नये म्हणून कव्हर मागवले आहे.

वडील :— कव्हर लावून त्याच सौंदर्य कमी झालं का?

मुलगी :— नाही, उलट I Phone कव्हर लावल्यावर जास्त सुंदर दिसतो.

बाप मुलीकडे प्रेमाणे बघत म्हणाला...

बाळा, तुझे शरीर I Phone पेक्षा अधिक मौल्यवान आणि सुंदर आहे आणि तु या घराची आणि आमची इज्जर आहेत तिच्या शरीराचे अवयव कपड्याने झाकले तर तिचे सौंदर्य वाढेल.

मुलीकडे वडिलांच्या या प्रश्नाचे उत्तर नव्हते तिच्या डोळ्यात अश्रू होते.

मुलीना फक्त एक नम्र विनंती — भारतीय संस्कृती, संस्कार आणि अस्मिता जपा.

कु. वैष्णवी न. राऊत

बी.ए. भाग दोन

# असे जगावे

असे जगावे छाताडावर आव्हानाचे लावून नगर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला दयावे उत्तर नको गुलामी नक्षत्राती भाती आंधळी ताप्याची आयुष्याला भिडतानाही चेन कराव स्वप्नाची असे दाडगी इच्दा ज्याची मार्ग तयाला मिळती सन्तर नजर येथुनी नजरे मध्ये आयुष्याला दयावे उत्तर..

पाय असावे जमिनावरती कळेत अंनर घेताना हसु असावे ओणवरती काळीन काढून देताना संकटासृष्टी ठणकवून सांगावे ये आता बेहतर नगर रोकुनी नजरेमध्ये आयुष्याला दयावे उत्तराचे करून जावे असेही काही दुनियेतून या जाताना गाडीवर याना जगान साऱ्या निरोष शेवट देवना स्वर कठोर त्या काळाचाही क्षण भर व्हावा कत्तर कातर नजर रोखुनी नजरे मध्ये आयुष्याला दयावे उत्तर.

खेळ मांडला

तुझ्या पायरीशी कुनी सान थोर न्हाई साद सुन्या काळजाची तुझ्या कानी जाई तरी देवा सर ना ह्यो भोग कशापायी हरवली वाट दिशा अधारतल्या दाही नवाळूनी अघळतो जीव मायबापा बनवा त्यो उरी पेटला खेळा मांडला!!

साडली गा शेतमाल घेतला कसा तुसा तुप वाट दासीव गा खेळ मांडला दावी देव पेलपार पाठीशी तुव्हा हुबा हयो तुझ्याच उंन त्यात खेळ मांडला

उसवलं गनगोत सारं आधार कुनाचा न्हाई भोगावल्या भुईपरी जीव अधार जीवला जाळा

बळ दे झुजायला किरपेची ठाल दे सविती पंचप्रान जिव्हारात तालादे करवलं रान जळला शिवार तरी न्हाई धीर साडला खेळ मांडला.

संकलन कु. सोनाली राऊत

बी.ए.भाग १

# मी चालली शोधण्यास मला

मी चालली शोधण्यास मला

कोण मी आण मी कुठला

कूटून मी आलो आणि कोणच्या मदतीला

जिचे व कोणी मेल

` तिचे मला जावेचे वाटते

जे कोणी केले

ते मला करावेसे वाटते.

मनात अनेक स्वप्नात झाड आहे

त्या साडाला फुले लागणार का

जीवन जगणे कनुयासाठी

जगण्याचा नफा अर्थ आता कळेल का.

दिशा आहे अनेक अनेक आता

नवी दिशा दिसेल का.

कस्तुरी मृगा सारखा पळत सुटलो

मला कोणी कळणार का

सुर्य दिवसा तर चद्ररागी उगवतो

दोघेही येणार का एकत्र प्रकाश घायला

अशक्य ते शक्य करून

मी ही शोधणार स्वत:ला

# कणा

ओळखलंत का सर मला पावसात आला कोणी

कपडे होते कर्दमलेले केसावंरती पाणी

क्षणभर नसला नंतर हसला बोलला वरती पाहून

गगामाई पाहूणीआली गेी घरण्यात बाहून

माहेरवाशीण दोरी झारखी चार भिंतीत नाचली मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली

भिन्न खचली चुल विसली होते नव्हते गेले प्रवाद म्हणून पापण्यामध्ये  पाणी थोडे ठेरले

कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे

चिखलगाळ काढतो आहे. पडकी भिंत नाघतो आहे.

खिशाकडे हात जातात हसत हसत उठता

पेसे नकोत सर जर एकटेपणा वाटला

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा

पाठीवरती हात ठेवून फकत लढा म्हणा.

कु. सोनाली राऊत

बी.ए.भाग १

# मोबाईल [Smart Phone]

जग किती Advance झालय Mobile च्या दुनियेत सारच कस Forward झालयं सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आयुष्य आता Copy Paste झालयं.

Social Networking मध्येच वावरणं झालय आभासी दुनियेत जगणं झालय ना घर परिवार, ना मित्र समुदाय आयुष्य आता Online झालयं.

सुख दु:खाचे ही Event झालयं Mobile मध्येच आता दिसण झालय Internet च्या आधुनिक युगात आयुष्य आता Viral झालयं..

माणसांच ही Robot झालय Radiation मुळे साऱ्याचाच मरण झालय Surfing च्या दुनियेत सारच क्षणिक झालय आयुष्य आता Status मय झालय एकविसाव्या शतकात जग किती बदलय Whatsapp Facebook विचारावंत झालयं संवादच ही Online करण झालय आयुष्य आता Mute झालयं.

# माझा शेतकरी बाप...

शेतकरी आहे माझा बाप
त्याच्या कष्टाचे नाही मोजमाप
गाळूनी शेतात घाम
राबराब राबतोय माझा बाप
असतील कितिही संकट त्याच्यासमोर
लढतोय त्यांच्या समोर सर्वांच्या अगोदर
आला आहे जरी कोरोना तरी
उन्हात घाम गाळतोय शेतावरी
शेतात राब राब राबून पिकवतोय
घरी बसलेल्या सर्वांना जगतोय..!

# जाळी....

संपले का प्रश्न सारे
बसवूनी मंत्रालयात जाळी
त्यापेक्षा विचार करा
शेतकऱ्यावर आली का ही पाळी
जीवावर आमच्या सत्तेत येऊन
भरल्या तुम्ही स्वत:च्या
उद्योजकांच्या खोळी
दिवसरात्र कष्ट करूनही माल
अन्नदात्याची रिकामीच राहीली थाळी.
आमच्याच नशिबी कायमचा का
हा गरिबाचा शिमगा आणि ही दु:खाची होळी,
खाऊनी आमची पोळी
का वाजवता नेहमी तुम्ही दुसऱ्याचीच टाळी
पण एक सांगतो
डगमगणार नाही कधीही हा बळीराजा
हक्कासाठी लढणार
फुलवण्यासाठी आमच्या स्वप्नांची कळी,

## माझे राजे...

आई तुळजाभवानी चा भक्त तो
आई जिजाऊचा लेक तो
रयतेचा विश्वासू राजा तो
साऱ्या राजीयांची राजा तो
जो मुघलांना पुरून उरला
ज्याच्या वाराने आदिलशाही हादरला
सह्याद्री चा सिंव्ह गर्जला
''छत्रपती शिवाजी महाराज'' हे नाव ऐकून तो औरग्या ही घाबरला
केला ज्याने गनिमी कावा
चढविला मोगलांवर हल्ला
''छत्रपती संभाजी महाराजाचं नाव ऐकून तो औरंग्या ही बोल्ला
या तोबा.. या अल्ला...

## बाबा, तुमची परी मोठी झाली..

बाबा तुमची परी आज मोठी झाली...
बोट धरून चालणारी
आज स्वत: धावायला लागली...
हव्या असणाऱ्या गोष्टीसाठी,
रूसून जी बसणारी..
तीच आज आहे ज्यात,
आता समाधानी राहायला शिकली.
सुर्य डोक्यांवर येईपर्यंत, निवांत जी झोपणारी...
तीच आज सूर्योदयाच्या आधीच उठायला लागली..
बाबा, तुमची परी आज मोठी झाली.
आहे त्यात आता. समधानी रहायला शिकली...

जरा जरी लागलं तर, अख्ख घर डोक्यावर घेणारी..
तीच आज न बोलता, खुप काही राहून करायला शिकली.
छोटया छोटया कामासाठी, आईला हाक मारणारी...
तीच आज इतरांच्या कामासाठी, धावपळ करायला लागली..
बाबा, तुमची परी आज मोठी झाली.
आहे त्यात आता, समधानी रहायला शिकली...
भुक लागली की लगेच, ताटावर जेवायला बसणारी...
तीच आज जेवतांना सगळयाची, वाट पहायला लागली..
बाबा, तुमची परी आज मोठी झाली.
आहे त्यात आता. समधानी रहायला शिकली...
छोटया छोटया गोष्टीसाठी तुमच्याकडे हट्ट करणारी..
तीच आज आहे त्यात, आता Adjustment करायला शिकली..
बाबा, तुमची परी आज मोठी झाली.
आहे त्यात आता. समधानी रहायला शिकली...
बाबा, तुमची परी आज मोठी झाली.

—सानिका राजेश महल्ले
बी.ए.भाग १

## आई

आई म्हणजे साठा सुखाचा... आई म्हणजे देव पृथ्वीवरचा..!

आई म्हणजे मायेची ओढ . आई म्हणजे मैत्रिण गोड!

आई म्हणजे दयेची सावी.. आई म्हणजे ममतेची माऊली!

आई म्हणजे स्वत: उपाशी राहुन आपल्याला भरवणारी..

आई म्हणजे दिवस—रात्र आपल्यासाठी राबणारी!

आई म्हणजे जगण्याचा अर्थ शिकवणारी

आई म्हणजे बोट धरून चालायला शिवणारी!

आई म्हणजे कधी ओरडून समजावणारी..

आई म्हणजे आपले आस्तित्व घडवणारी..

## वडील

वडील म्हणजे समुद्रातलं जहाज असंत..

खंबीर आधाराचं दुसरं नाव असते.

वडील म्हणजे उबराचं झाड असतं.

लपलेल्या भावनांच जणू खोड असतं.

वडील या शब्दात संपूर्ण जग समावलेल असतं.

ते साहेब असल्यावर हे जग आपल्या मुठीत असल्यासारख वाटंत

## भाऊ

अतुट हे नाते आपुले.. आजन्म लाभो मला

विसरूनी मी स्वत:ला जपून ठेवीन तुला.

माज हसणं माज रूसण ओवाळु होणा जरा तुझ्या त्या ओवाळणीला जगण्याला घेणा जरा.

तुझ्या त्या ओवाळणीला जगण्याला घेणा जरा

दु:ख आले तुझ्यावरी जगण्यालला अर्थ खरा घाबरू नको तु जीव ओवाळून देईल तुला.

संकटांना मात करा तुझ्या सावलीत ती उभा

भाऊराया तुझा तुझ्यासाठी विटेवरी उभा.

—प्रतिक्षा संतोष मेसरे

बी.ए. प्रथम

## आई

खरचगं आई तुझ्याशिवाय सारच खुप अर्धवट वाटतं.

तु हसली नाहीस ना कि ते हसणं पण नकोस वाटतं.

आई तु घरात असतेस ना जेव्हा तेव्हा घर खुप प्रसन्न राहतं

तु दिसेनासी झालीस ना की ते घरही खूप उदास राहतं.

नेहमीच आई तू फक्त निस्वार्थपणे प्रेम करतेस

स्वत: चा विचार न करता तु फक्त आपल्या मुलांसाठीच जगत असतेस

आई तु दुर असलीस तरी

आवाजातला हळूवापणा लगेच ओळखतेस

आज काहीतरी बिघडलंच ना तुझं

असं म्हणून लगेच तु मन हळवं करतेस

नात्यांमधला अर्थ तु खूप सहजपणे समजवतेस

गुतलेल्या त्या नात्यांची गाठ तू अलगदपणे सोडवतेस

आई तूला खरं सांगु तु आमचं सुंदर जग आहे

तुझ्याशिवाय आमचं आयुष्य खरंच गं पण अपुर्ण आहे.

## बालपण

आमचं बालपण खुप छाप होतं ना शाळेचं दडपण होतं, ना अभ्यासाचं टेन्शन

आमचं बालपण खुप छान होत ना मोबाईल वरचे गेम होतं

ना टीव्हीवरचे कार्टून, आठवडयातुन एकदा चंद्रकांता

जोडीला महाभारत रामायण होतं आमचं बालपण खूप छान होतं

सुटीला मामाच्या गावी जाणं होतं कैऱ्या चिंचा पाडन एवढंच काम होतं

जेवणाला पंगतीच अंगण होतं आमचं बालपण खुप छान होतं

कधी विटी दांडू कधी लगोरी कधी काचाकवड्या तर कधी अंताक्षरी

भाड्याच्या सायकलं वरून मनसोक्त किरणं होत आमचं बालपण खुप छान होतं

## बाबा

माझे सारे दु:ख वाहुन नेणारे,
परत आनंदाचे पेटारे देणारे ते माझे बाबा।।
स्वत:च्या अंगावरील सदऱ्याला
भोकं पडले असले तरी प्रत्येक सणाला मल नविन
सदरा आणुन देणारे ते माझे बाबा।।
कितीही व्यक्त का असंना पण,
माझ्यासाठी त्यांचा अमुल्य वेळ काढणारे... ते माझे बाबा।।
प्रेम कधी दाखवत नाही पण,
लपुन सर्वात जास्त प्रेम करणारे ते माझे बाबा।।

## मैत्री

विश्वासाची एक एक पायरी चढत जाऊन
तयार होणारं अतुट नातं म्हणजे मैत्री
आयुष्याला आकार देणारं मनाला मनाशी जोडून
ठेवणारं नात असतं मैत्रीच
सुखाच्या आणि दु:खाच्या नावेमध्ये
कायम सोबत उंभ राहुन
आधाराच्या हात हातात देते जी मैत्री
भेट नाही, बोलणं नाही
तशी तो किंवा ती मला विसणार नाही
ही खात्री मनात ठेवते ती मैत्री
आपल्याला आपल्यापेक्षा जास्त समजुन होत
जीवाला जीव लावते ती मैत्री
प्रेमाच्या नात्यापेक्षाही सर्वात जिव्हाळ्याचं
कधी हट्टी तर कधी एकदम रागांचं
पण कायमस्वरूपी सोबत हवं असणारं
हक्काचं घर असतं मैत्री

## मराठी मुलगी

कॉलेजमध्ये अनेक मॉडेल मुली असतात
पण जी गोड लाजते, ती मराठी मुलगी असते.
कॉलेजमध्ये मुली Short Top घालतात
पण जी पाठ दिसुनये म्हणून Top खाली
ओढने, ती मराठी मुगली असते. कॉलेजमध्ये मुली Jeans घालतात
पण जी Jeans बरोबर पेंजण घालते ती मराठी मुलगी असते.
कॉलेजमध्ये अनेक मुली असतात.
पण स्वत:च्या नोट्स सहज दुसऱ्याला देते, ती मराठी मुगली असते.
कॉलेजमध्ये अनेक मुली असतात
पण वात्रटपणा केल्यावर कानाखाली वाजवते
ती मराठी मुलगी असते. शॉपीगला अनेक मुली असतात
खर्चाचा विचार करून फक्त कानातलं घेऊन येते
ती मराठी मुलगी असते.

कु. पुजा देवेंद्र डाबेराव
बी.ए.भाग १



# मैत्रीणी

मैत्रिणी माझ्या जिवाभावाच्या
जीवाला जीव देणाऱ्या
मनाच्या तळातून प्रेम करणाऱ्या
मैत्रिणी माझ्या जिव्हाळ्याच्या
कुणाच्याही दुःखाने
कावऱ्याबावऱ्या होणाऱ्या,
मैत्रिणी माझ्या मायेच्या
सदैव आईच्या तोंडीने
पाठीवरून हात फिरवणाऱ्या
मैत्रिणी माझ्या आपुलकीच्या
हाकेला प्रतिसाद देणाऱ्या
मैत्रिणी माझ्या मतकवड्या
मतातील भाव
मैत्रिणी माझ्या आयुष्याभराच्या
सदैव माझी साथ देणाऱ्या
माझ्या जीवनाचा
अविभाज्य घटक असणाऱ्या
आणखी काय म्हणू
मैत्रिणी माझ्या एकाच नाळेते बांधलेल्या जणू काही माझीच छबी असलेल्या...

# कुणाच्या इतक्याही जवळ जावू नये

कुणाच्या इतकाही जवळ जावू नये की आपल्याला त्याची सवय न्हावी
तडफलेच जर हृदय कधी जोडताना असह्य वेदना व्हावी
डायरीत कुणाचे नाव इतकीही येऊ नये की पानांना ते नाव जड व्हावे
एक दिवस अचानक त्या नावाचे डायरीत येणे बंद व्हावे
स्वप्नात कुणाला असेही बधु नये की आधाराला त्याचे हात असावे
तुटलेच जर स्वप्न अचानक हातात आपल्या काहिच नसावे
कुणाला इतकाही वेळ देऊ नये की आपल्या क्षणाक्षणावर त्यांचा
अधिकार व्हावा, एक दिवस आरशासमोर आपणास, आपलाच चेहरा परका व्हावा
कुणाची इतकीही ओढ नसावी की पदोपदी आपण त्याची वाट बघावी
आणि त्याची वाट बघता बघता आपलीच वाट दीशाही व्हावी
कुणाचे इतकेही ऐकू नये की कानाव्या त्याच्याच शब्दांचा घुमजाव
व्हावा, आपल्या ओढातुनही मग त्याचच शब्दाचा उच्चार व्हावा.
कुणाची अशीही सोबत असू नये की प्रत्येक स्पंदनात ती जाणवावी
ती साथ गमवण्याच्या केवळ भीतीने डोळ्यात खळकन अश्रु जमावेत
कुणाला इतकीही माझी म्हतू नये की त्याचे मीपन आपण विसरून जावे
त्या संभ्रमात त्याने आपल्याला ठेच देऊन जावे करावे पण
कुणाच्या इतक्याही दूर जाऊ नये की आपल्य सावलीशीवाय सोबत काहीच नसावे
दूर दूर आवाज दिला तरी आपले शब्द जागीच घूमवेत आपले शब्द जागीच घूमवेत

—कु. शुभांगी कैलास काकड
बी.ए.अंत्य

## विष्णु थरे

विष्णु थरे नावाचे कवी फार सुंदर लिहितात ते म्हणतात:

हर हर महादेवाचे सोबत पुन्हा जळेल काय अन स्वराज्याला शिवरायाचं सपान पुन्हा पळेल काय!!

बाजी सारख्या हक्कासाठी खिंड कोन्ही लढेल काय अन स्वराज्याला शिवरायाचं सपान

पुन्हा पळेल काय!!

मर्द आता जिता आहे पिऊन थोळा खंबा मरणाला गाजवणारा कुठे दिसते नाही संभा

शभु सारखा शुर विर तरूण येथे घडेल काय अन स्वराज्याला शिवरायाचं सपान

पुन्हा पळेल काय!!

कागदं खाऊन रस्त्यावरच्या सोकुन गेल्या गाई पार्लर मध्ये रोज आता सजते आमची आई

जिजाऊच बाळ आत शिवबा सारखं घडेल काय अन स्वराज्याला शिवरायाचं सपान

पुन्हा पळेल काय!!

## अनाथांची आई (सिंधुताई)

या युगाची तु यशोदा झाली पोरख्याची आई तु माई झाली।।

चिंधी ची तू सिंधूताई झाली अनाथांची आई तू माई झाली।।

देश विदेशी गेली तु भारताच उंच तुझ्याकडे प्रेरणेचा कोणता आहे संच

झाली तु देवाहुनी ही मोठी नाव तुझ्ये पावण या ओठी

संसार रचला अनाथंचा शिक्षण देऊनी दिला आधार त्यांना जगण्याचा.

म्हणत होती जगती जे सुरेश भट्ट लिहूनी गे काळाने कितीही घात आज आम्हावर केले.

माय अजरामर झालीस तुझ्या पुण्याई जगती.

माई तू येनागं तुझ्या लेकरांना हुरहुर लागती.

## एवढंच मागतेय 'ती'

सारं काही मी म्हणेन तसच व्हाव असं कुठे म्हणतेय ती
थोड तरी तिच्या मनासारखे व्हाव एवढंच मागतेय ती
तुझी मैत्रीण आहे ती तु होणारंच Possessive
लिमिट ओळख फक्त किती व्हायंच Aggressive
तिने काय घालावं काय नेसाव तिच तीला ठरवू दे की
Beautiful, Hot, Gorgeous तिलाई थोडं मिरवू दे की.
तिच्या आईवडीलांनी दिलेल्या आर्शीवादाचा मान,
व्यवस्थित राखतेय ती थोंड तरी तिच्या मनासारख व्हावं एवढंच मागतेय ती
काहीच वावग नाही तुझी बहिण म्हणुन हक्क गाजव
फक्त तिला कधी अडलं नसलं ना
तर तुझ्या खांध्यावर तिचं डोकं निजव
तझ्या सारखे असु दे ना रे तिला पण दोन चार मित्र,
तु पुसुन टाक तुझ्या मनातल संशयाचं चित्र,
इमोशनल आहे रे ती, तुझ्यात तिचा
गेलेला बाबा बघतेय ती, आणि थोड तरी तिच्या मनासारख व्हाव
एवढंच मागतेय ती
आठव कशी बावरली होती ती विशीतली पोर
बायको बनुन आली जेव्हा कापून सगळे दोर,
तुझ्या नावाचं कुंकू, टिकली, बागडया, मणी डोरलं,
तुझ्यासाठी घरदारच काय तिने अडनावही सोडलं, तुझ जग
तिचं म्हणून तुझ्यासाठी जगतेय ती
थोडं तरी तिच्या मनासारखं व्हावं
एवढंच मागतेय ती
भले आई म्हणून रोज उठून पाया नको पडूस
''बेटा'' हाक ऐकू येणार नाही

इतक्या उंच नको उडूस, नको चेपूस पाय
श्रावणबाळाची कावड नको
'आई कशी आहेस गं? एवढंही विचारायची सवड नको?
तुझ्या विचारात तुझ्या जन्मापासून
रात्र रात्र जगतेय ती,
थोंड तरी तिच्यामनासारखं व्हावं
एवढंच मागतेय ती.
समजा ती तुझी कुणीच नसेल ती फक्त
ती असेल तुझं वागणं असं ठेव
की तिच्या नरजेत भीती नसेल
पुरूषासारखा पुरूष तू, तुझा वाटायला
आधार, भावना आणि वासना हयातल
बाईला कळतं बरं फार कितीही गेले
सायन्य पुढे, तिच्याशिवाय उगम नाही
लाख किशोर धडवून येथील
तिच्याशिवाय संगम नाही तिच्या अस्तित्वाची
तुझ्या मनाला जाण दे, प्रतिज्ञा नको, प्राण नको
फक्त थोडा मान दे हो म्हण.
हो म्हण अरे किती अर्शिने बघतेय ती
थोडं तरी तिच्या मनासारखं व्हाव
एवढंच मागतेय ती

—कु. आरती बबन धुमसे
बी.ए.भाग १

# तु ओट कर

समय खडा है सामने । जो कहरा है
लोट कर । तु ओट कर
ये मुल मंत्र यंत्र का। ये मंत्र लोक तंत्र का
ये देश हित का सुत्र है। तु देश हीत में
ओट कर। तु ओट कर
ये फर्ज रहे ध्यान में। लिखा है संविधान
मे। अगर कोई बात तेरा मन गई
कटोरकर तो ओट कर। तु ओट कर
ये प्रश्न तेरे बल का है। सवाल तेरे
तेरे कल काहै। समय ये फैसोलोका फिरसे
आ गया है लौट कर। तु ओट कर
दिशा बदल दश बदल। या फिर ऊसी
दिशा मे चल। तुझी मे सिधिया है सब।
तु वई है । तु चोट कर। तु ओट कर
ये लोक हित का पर्व है ये परर्व तेरा गरर्व हैं।
अलक जगा। कलम उठा कमल उठा के नोट कर। तु ओट कर
ये फर्ज त निभायेगा। कि ओट देणे
जायेगा कसम उठा। बदन दबा। बटन दबाके ओट कर। तु ओट कर

—१.कु. सुनिता मालटे
बी.ए.अंत्य

—२. महेश भेंडकर
बी.ए. प्रथम

# छत्रपती शिवाजी महाराज

''शिवनेरीवर एक तारा चमकलला जिजाऊच्या पोटी सिंह जन्मला!

जिजाऊंना शिवनेरीवर असतांना पुत्र झाला शिवाई देवीच्या नवसान, आशीर्वादानं आपल्याला पुत्र झाला ही जिजाऊंची श्रध्दा होती दहा दिवस उलटले बारशाची तयारी धुमधडाक्यानं सुरू झाली ज्योतिषांनी बाळाची कुंडली मांडली सहा ग्रह तरर सरळ  उच्च प्रतिचेच होते ''अशी भाग्यवान कुडली विरळा।'' शास्त्रीबुवांनी उद्‌गार काढले देवी—शिवाईनं माझ गाव्हणं ऐकल तर!'' जिजाऊंनी पृप्तीचे उद्‌गार काढले बारशाच्या प्रसंगी बाळाचं नाव ठेवण्याच्या वेळी एकदम त्यांनी सांगितले,

''शिवाजी!'' शिव म्हणजे पवित्र! महाराष्ट्राच्या भाळीचे 'अशिव' नाश करण्याच्या आपल्या मनातल्या डोहाळ्यांची ही सांगताच असे त्या मानीत होत्या.त्यांना वाटले 'शिव'च महाराष्ट्रदेशी अवतरले.!!

छत्रपती शिवाजी महाराजा यांचे नाव नाव शिवाजी शाहाजी भोसले आहे. शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्हातील जुन्नर शहरा जवळ असलेला शिवनेरी गडावर झाला. जनता त्यांना शिवराय, शिवाजी, महाराज, शिवबा राजे या नावाने ओळखते.

त्यांच्या वडिलाचे नाव शाहुजी आणि आईचे नाव जीजाबाई होते दादोजी कोंडदेव हे त्यांचे गुरू होते. शिवाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे सस्थापक होते. आणि त्यांना लहानपणी रामायन, महाभारतातील गोष्टी सांगुण संस्कार घडविले वयाच्या पंधराव्या वर्षी शिवाजी महाराजांनी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती तेव्हा ते पपुण्याला कारभार पाहत होते. तेव्हा त्यांनी राजमुद्रा तयार केली ''प्रतिपंचदा द्रलेखेवर वर्धिष्णुविश्ववंदिता! शाहासुनो शिवस्थेत्त। मुद्रा राजते। म्हणजे जोपर्यंत प्रतिपदेचा चन्द्र वाढत जातो आणि विश्वास वंदनीय होतो तशी शिवाजी महारांजाची किर्ती मुद्रातीचा लौकिक वाढत जाईल.

''हवा वेगाने नव्हती हवेपेक्षाही त्याचा वेग होता, अन्यायाविरूध्द लढण्याचा इरादा त्यांच्या नेक होता! असा शहाजी जिजाऊंचा लेक लाखात नव्हे तर जगात एक होता!!

पुण्यपुरीत सोन्याचा नांगर फिरला पुणे आणि आसपासच्या भागातील लोकात विश्वास निर्माण व्हावा म्हुन कारभारी मंडळ नव्या नव्या योजना काठीत होते पुण्यात 'लालमहान' आणि खेडेबाण्यात एक वाडा यांची बांधकाम काढली; 'शिवपुरा' सारखी नवी गाव वसवंली पुर्वीच्या । पाटील कुलकर्ण्यांना नव्यांन सेवा सांगितली बाजारपेठा उघडलया कारभाराची नवी घडी बसवली फिरत्या स्वारांची पथकं हिंडवून लोकान नवा विश्वास निर्माण केला अशीच आणखीही एक अप्रतिम कल्पना त्यांना सुचली प्रर्वीच्या धकाधकीत पणे शहरावर गाढवांचा नागर फिरला, होता त्याचं पुण्याच्या पुण्यभीत आता त्यांनी शिवबाकडून सोन्याचा नांगर फिरवून लाकात विश्वास निर्माण केला प्रचंड गर्दी करूण लोकांनी कौतुक पाहिला।

या कौतुकानं प्रजेत सोनं पिकविण्याची ईर्षा निर्माण केली.

आईसाहेब एक मनं घडवीत होत्या :—

साहेबांनी ही एक कारभाराच्या धामधुमीतही शिवबाच्या शिक्षणाची हेळसाई होऊ दिली नाही. लिहीणे, वाचणे, पत्रलेखन, संस्कार शिक्षण, या बरोबरच व्यायाम, हत्यार चालविणे, घोड्यावर बसणे, इत्यादी बाबतीत शिवबाला तरबेज करीत होत्या. शिवबाही उत्तम साथ देत होता.

त्योवळी आईसाहेबांच्या सानिध्यात शिवबाचे मन विशीष्ट प्रकारे घडत होत घराण्याचा, जातकुळीचा, धर्माचा, देशाचा, देवांचा अभिमान, बाल शिवबाच्या मनात जागता ठेवून, त्याला एक विशिष्ट हष्टी देण्याचा आईसाहेबांचा सतत प्रयत्न असे. अनेक दिवसस्वताच्या मनात स्वंतत्र्याचे — स्वराज्याचे विचार बाळगणाऱ्या आईसाहेब निराळ्याच ईर्षेने शिवबाचे मन घडवीत होत्या.

''चला गड्यांनो मिळूनी सारे''

आपल्याच वयाचे अनेक सवंगडी जमा करून त्याच्याशी प्रहर खेळण्यात दंग होणारा शिवबा खेळ तरी कसले खेळत होता?

मराठे, मुसलमान, सेनापती शत्रु, किल्ला— लढाई असल्या खेळांची शिवबाला फार आवड असायची कारभारी व आईसाहेब यांनी शिवबाला कारभारी व आईसाहेब यांनी शिवबाला कारभारविषयक किंवा संस्कारविषयक शिक्षण देऊण एकादया प्रौढ जबाबदार माणसा सारखा तयार केलं होतं तरी तसा तो अजुन लहानच नव्हता का!

आपल्या सवंगडयाशी खेळतांना एकीकडे तो बालसुलभ भावना प्रकट करी; तरी त्याचवेळी दुसरीकडे त्याचे प्रौठ मन त्या खेळातही लढाया, डावपेज, न्यायनिवाडा असल्या गोल्टी विशेषेकरून आणि 'परस्त्री म्हणजे माता! माता ही देवता!'

आता शिवबा बारा वर्षांचा झाला होता तरूण वयाची मुले, प्रौठ वयाचे अधिकारी सर्वांशी बागळयाची तारतम्य ती ओळख लागला होता. देशमुख देशपांडे आपलेसे करावे बारा मावळ हिंडाव करभारात रस घ्यावा. भांडणांचे निवाडे करावे यात शिवबा रमू लागला त्याच्या ठायी आता कारभारताचा चांगलाच पोच आला होता एकदा एका पाटलांन गावच्या स्त्री संबंधात गैरवर्तन केलं आणि तक्रार शिवबासमोर निवाडयासाठी आली.

पाटील!

शिवबा कडाडला ''परस्त्री म्हणजे माता, माता ही देवता! तुम्ही देवतांच्या अब्रुवर उठलात! असला बदअंमल सहन केला जाणार नाही. आणि त्या पाटलाचे हात, पाय तोडण्याची जबर कठोर शिक्षा शिवबानं दिली.

''शब्द पाडतील अपुरे''

अशी शिबांची कीर्ती,

राजा शोभूनी दिसे जगातील

अवघ्या जगाचा शिवदत्रपती!!

खरच शिवाजी महाराजंच्या विचारावर जेवढ बोलल तरी कमी पडेल कारण शिवाजी महाराजांचे वीचार येवढे सुंदर आहेत की आपल्याला त्यांच्या पासुण खुप प्रेरणा मिळतात म्हणुन मला सांगाव असे वाटते की आजच्या या काळात शिवाजी माहाराजांची खुप गरज आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या महिलावरील अत्याचाराच्या बातम्या दररोज कानावर पडतात आणि मन सुन्न होते आजच्या काळात शेती आणि शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजंच्या शेती शेती धोरणांची आज आपल्या देशाला खरच गरज आहे मल्लमा देसाई या महिलेला धाकडी बहीन मान तिला सावित्री किताब देणाऱ्या कल्याणच्या सुभेदाराचया सौंदर्य संपन्न तरून सुनेला मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजाच्या विचारांची गरज आहे. आजच्या तरूणाईला तर खूपच गरज आहे. शेतकरी जेव्हा येवढे कष्ट करतो आणि उणाताणात राब राब राबतो त्याला कशाची भिती वाटत नाही स्वताच्या जिवाची काळजी न करता तो रात्री जेव्हा शेतात जागल जातो तेव्हा त्याला खूप अडचणी येतात त्याची त्याला भिती वाटत नाही. जेव्हा त्याल पीक दिसते तेव्हा तो खुप खूश होतो पण मात्र पाणी आल्यामुळे त्याच्या पिकाची हाणी होतो तेव्हा मात्र तो खचुन जातो आणि मग तो आत्महत्या चा विचार करतो.

आणि अशा शेतकऱ्याला वाचवण्याची शिवाजी महाराजांची या जगाला खुप गरज आहे. तसेंच महीलावरील होणारे अत्याचारा, आणि मल्लमा देसाई या महिलेला धाकटी बहीन मान तिला सावित्री, किताब देणाऱ्या कल्याणच्या सुभेदाराच्या सौंदर्य संपन्न तरूण सुनेला मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची विचारांची गरज आजच्या तरूणाईला तर खुपच गरज आहे.

प्रत्येक तरूण मुले स्वत:ला शिवाजी म्हणतात आणि डोक्यावर चंद्रकोर लावुन फिरतात काय तर स्वत: ला शिवाजी सारख तोलतात. आणि मुलींना छळतात. आणि ती निष्पाप असलेली मुलगी तिचे जगणे मुश्कील करतात आणि या समाजामध्ये मुलीला दोष दिला जातो. शिवरायांच्या स्वराज्यात कोणताही भेदभाव नव्हता स्त्रियांचा आद शेतकऱ्यांना मान होता आणि प्रत्येक मराठी माणसाला शिवछत्रपती आमचे राजे असल्याचा अभिमान होता केवळ दाठी मीशी वाठवून कंपाळावर चंद्रकोर लावून कोणी शिवाजी होत नसतो खरच जर आपल्याला शिवाजी महाराज सारख नायचच असेल तर आपण शिवरांचा आदर्श ठेवून त्यांची प्रेरणा घेऊण आपण आदर्शवंत जिवन जगलो तर शिवरायांचा मावळा आपण नक्कीच होऊ शकतो. संत—सज्जनांचा आर्शीवाद हवा’ अशी शिवाजी महाराजांचे विचार होते. शिवबा कारभाराचे धडे गिरवत होता नवेनवे सवंगडी जमवून बळ वाढवूत होता देवा—धर्माविषयी त्याचे मन सक्षम बनविण्यात आइसाहेबांनी मुळीच कसर केली नव्हती पुण्याला लालमहाल हे पुण्याचे आणि आसपासच्या परिसराचे एक मोठेच आश्रयस्थान बनले होते. शिवबा जातीने आपल्या जहागिरीत हिंदून ठिकठिकाणच्या माणसांचा विश्वास वाठवत होता या बालशिवाजीच्या रूपाने आपल्याला न्यायी राजाच लाभला असे मानुन लोक शिवबाच्या भजनी लागले होते. शिवबाने पुण्याच्या आसपास असलेल्या साधु जंनाचा आर्शीवाद मिळवला. देहूकर तुकोबांची ख्याती ऐकून त्याने त्याच्याशी परामर्श घेतला ‘सत—सज्जनांचा आर्शीवाद आपल्या कार्याला हवाच’ अशी त्याची श्रध्दा होती. राजे असंख्य झाले आजवर या जगतीवर शिवबासमान मात्र कुणी न झाला गर्व ज्याचे असे या महाराष्ट्रात एकची तो राजा शिवबा झाला.

स्वराज्यांचं तोरण लागलं

शिवबा आणि त्याचे सवंगडी आता एकाविचाराने एकत्र बांधले गेले एक दिवस रेहिडखोऱ्यातल्या शिवालयात सारे जमले त्या ठिकाणी श्रीसांबाच्या साक्षीने त्या सर्वांना एक निश्चय शपथपूर्वक बोलून एकला ‘‘आपली भुमी, आपली शेते आपली देव, आपी माणसे, यांचे रक्षण आमचे आम्ही आमचं राज्य आणु वाढवू, सांभाळू!

“आपण श्रींच्या इच्छेनुसार राज्य घडवणार तर त्यासाठी सह्याद्रीच्या पाणेवरच एकाद बळकट ठाणं आपल्या हाती असावं। ” सर्वांनाच पटलं आदीलशाहाच्या हुकुमतीखाली असलेला पण बंदोबस्ताच्या दृष्टीने दुर्लक्षित असलेला तोरणा किल्ला हे लक्ष ठरलं योग्यवेळी शिवबा आणि त्यांचे सवंगडी तोरणा गडावर आपलं निशाण फडकवून आले। स्वराज्याचं तोरण लागलं म्हणुन मला म्हणाव, असे वाटते

मानाचा मुजरा करतो शिवाजी महाराजाना ज्यांनी मराठी मातीत भगवा झेंडा रोवला.

“हे धन स्वराज्याचं श्रीच्या राज्यांचं आहे” आता शिवबाने आपल्या उद्योगांचा पसारा वाढवला नवी माणसे, नवी शस्त्रे नवी घोडो, कारभाराचा नवा डाव रंगत चालला हा व्याप वाढत गेला, तशी खर्चाची कलमेही वाढु लागली त्यातच आता हाती येणारे गड कोट, माच्या तटबंधा या सर्वांची नव्याने बांधणी करावी लागणार होती चिंता सुरू झाली!! द्रव्याखेरीज ही सर्व नाटके व्यर्थ होती पण द्रव्याचे नाटक कधीच करता येत नाही आईसाहेब, शिवबा, सारेजण चिंताग्रस्त होते ‘अखेर देवालाच हाक घातली पाहीजे’ शिवबाच्या मनात विचार आला आणि तोरणागडावर बांधकामासाठी खोदाड चालू असतांना एक दिवस‘ठणूण असा आवाज झाला, सुवर्णमुद्रांनी काठोकाठ भरलेले हंडे तिथे सापडले आनंदी आनंद झाला आईसाहेब शिवबाला म्हणाल्या, “हे धन स्वराज्याचं श्रीच्या राज्याचं। त्यासाठीच खर्ची घाला। शिवबा म्हणाला, ‘आज्ञा शिरसावंध आहे।”

शहाला प्रतिशह दिला।

शिवाजी राजे भोसले यांचे स्वराज्याच्या उभारणीचे उद्योग आता खुपच जोमाने आणि नेचने सुरू होते आदिलशाहीत आतापर्यंत या उघ्योगांची दखल ‘एका उनाड पोरांची पुंडाई।’ एवढीच घेतली जावळीचे प्रकरा, कोडाण्याचा कबजा आणि पुढे तर शिखळचे आदिलशाही ठाणेचा। शिवाजीच्या या डाव्यांनी आदीलशाही खडबहून जागी झाली ही बंडखोरी मोडणे कठीण नव्हते। एकदा सरदार फौज घेऊण पाठविला तर दोन दिवसात हे पोर नरम येईल. पण अशामुळे शहाजीराज बिथरले तर म्हणजे, हा डाव बुध्दिबळानंच सुटेल शहाजीला फसवून कैद करयाचे ठरले शहाजीराजे कैद झाले! शिवाजीराजांना आदीलशाहीन हा शहच दिला पण शिवाजीराजांनी लवकरच, बुध्दिबळावर डाव जिंकला मोगलांकडून दडपण आणून वडिलांनी सुटका करविली शहाला प्रतिशाह दिला.!

“आम्हा मराठ्यांची नीती वेगळी”

राजगडावरच्या मसलततखान्यात शिवाजीराजे आपल्या सवंगडयाशी विचार विनीमय करीत होते “आपण आदिलशाहीशी वैर मांडलच आहे पण या परिस्थितीचा फायदा मोगलांना घेऊ देणं शहाणपणाचं ठरणार नाही. मोगलाचं लक्ष कल्याण—भिवंडीकडे वळलं आहे पण त्यांच्यापुर्वीच आपण या भागावर अमंल बसवला पाहिजे” राजांचा प्रस्ताव एकदम सर्वांना मान्य झाला.

कल्याणचा सुभेदार आदिलशाही दरबारात भरणा करण्यासाठी प्रचंड खाजीना घेऊन निघाला होता घाटातच स्वराज्याच्या सैनीकानी तो लुटला सुभेदार आणि त्याच्या कुटुंब कबिला कैद झाला सुभेदाराची देखणी सुन या कैधात होती.

शिवाजी राजांनी थावेळी म्हटंल, “आबानी, आम्हा मराठ्यांची निती वेगळी आहे त्या साहवीला साडीचोळी देऊन सन्मानाने विजयपुरी पाठविले जाई!”

शिवाजीराजांच्या पराक्रमी उद्योगांनी आदिलशाही दरबार चागलाच आता हादरला होता आईसाहेबांच्या प्रोत्साहानाने शिवाजीराजांचा उत्साह शतगुणीत होत होता त्याप्रमाणे आदिलशहाची आई बेगम बडीसाहेबा शहाला सतत डिवचून शिवाजीचा बंदोबस्त करण्याविषयी सांगत होती. अखेर आदिलशाहाने दरबारची तश्रीफ फरमविली सारे दरबारात आल मध्यभागी एका चांदीच्या चौरंगावर, सोण्याच्या तबकात राजबर्खी विडे ठेवले होते, 'शिवाजी भोसल्या, च्या बदोबस्ताचा प्रस्ताव मांडला गेला पण कोणीच पुढे सरसावला नाही अखेर वही बेगम चिडून दरबारला उपमर्दकारक वूषणे देऊलागली तेव्ह सरदार अफझलखान ताडकन उठुन विड्याच्या तबकाजवळ आला व म्हणाला, ''मै सीवा को जिंदा पकड कर दरबार म`ले आता हूँ।'' आणि त्याने पैजेचा विडा उचलला.

शक्तीपेक्षा युक्ती मोठी,

अफझलखान विजापूराहून प्रचंड सैन्यानिशी निघाला त्याने तुळजापूर पंठरपूरच्या देवालयाची मोडतोड केली आणि तो शिवाजीराजांवर चालुन आला, खानाची शक्ती फार मोठी होती स्वराज्यावर आलेले हे फार मोठे संकट आहे. हे शिवाजीराजांनी ओळखले आता युक्तीनेच ही शक्ती मोडता आली तर येईल हे ओळखून राजे जावळीखोऱ्यात प्रतापगडावर आले.

पंताजी गोपीनाथ या वकिलामार्फत शिवाजीराजा नी खानाशी बोलणी सुरू केली संपूर्ण शरणागतीची हूल दाखवीत आणि भीतीचे नाटक वठवीत खानाला जावळीखोऱ्यात उतरवून राजांनी प्रतापगडावर त्यांची भेट ठरवली युक्ती साधली!

दोघांची भेट झाली.. खानानं शक्तींच्या घमेंडीत राजांवर डाव केला पण राजे युक्तीने त्यातून निसटले. नव्हे; त्यांनी खानालाच गर्द केला. पाठोपाठ पूर्वयोजनेप्रमाो मराठी सैन्याने खोऱ्यातल्या खानाच्या सैन्याला चांगले चेचून काढले.

स्वराज्याची देखभाल :—

स्वराज्यासाठी अविश्रांत श्रम करण्यात शिवाजीराजांनी कधीच हयगय केली नाही एखादी मोहीम पार पडली की दुसऱ्या मोहिमेचे मनसुबे पक्के करण्याचे काम सुरू होई मध्यंतरी जो थोडाफार मोकळा वेळ सापडले त्याचा उपयोग स्वराज्यातील शासनाचा आणि किल्ले कोट,गड यांच्या सुरक्षिततेचा जातीने बंदोबस्त पाहण्यासाठी राजे करीत.

एखाद्या किल्याचा आसमंतात ते अचानक जाऊन थडकत मोजकी जाणकार मंडळी बरोबर असतं. मग अशा प्रसंगी जणू शत्रूची मोहीम झालीच आहे अशा दृष्टीने त्या किल्याचा आसमंत, प्रत्यक्ष किल्ला आणि तिथवर पोचणाऱ्या वाटा यांची देखभाल होई त्रूटी पूर्ण होते पहारे चौक्या बसवल्या जात राजे जातीने अचानक पाहाणी करीत याचा दरारा निर्माण झाल्याने सर्वत्र सावधानता निर्माणा झाली होती.

रणगाजी मुरारबाजी :—

एकामागुन एक मिळणाऱ्या विजयांनी स्वराज्यांला सुध्द बाळसे चढत होते पण या सेदार बाळाला दृष्ट लावण्याची काळी करणी दिल्लीकरांच्या दरबारात आकार घेऊण बसली होती अलमगीर औरंगजेबाने आपला सर्वात जेष्ठ आणि श्रेष्ट अनुभवी सरदार मिर्झाराजा जयसिंग याला प्रचंड फौजेसह स्वराज्यावर पाठविले सोबत होता. दिलेरखान हा कडवा लठवय्या सरदार! हे संकट साधे नव्हते विचारपूर्वक डाव टाकायला हवा होता गड—कोट लठवायची तयारी फार बारकाईने करायची होती मोगांच्या प्रचंड फौजाने औरगाबादेहून निघुन पुण्याचा रोख

धरला वाटेतला पुरंदर गड मोगलाचे पहिले भक्ष्य ठरणार हे घेरून मुरारबाजीसारखा मुरब्बी माणूस पुरंदरावर ठेवला गेला दिलेरखानाने पुंरदर वेढला कसून प्रयत्न करून अनेक दिवस मुरारबाजीने किल्ला लढवला पण अखेर या वेठयात मुरारबाजीला मरण आले.

''स्वराज्यातली शिस्त पाळा''

''शिवाजी भोसले याला आग्र्याला पाठवून द्या दिल्लीहून आलमगीर औरंजेबाचा निरोप आला मिर्झाराजांनी शिवाजीराजांना बादलशहाची इच्छा सांगितली आग्र्याला जाण्यातले फायदे आणि हित समजावले शिवाजीराजंनी अनेक बाजुंनी विचार करून निर्णय घेतला ते छोटया संभाजीराजासह आग्र्याला जायला तयार झाले. एक नवा अनुभव नवा प्रदेश, नवे शेतीरिवाज पाहण्याची ही संधी आपा घ्यायचीच असे त्यांनी ठरवीले तयारीला आरंभ झाला. आग्र्याला जाण्यापूर्वी स्वराज्यात राहीलेल्या मुलुखाचा आणि किल्यांचा बंदोबस्त शिवाजी रांजांनी जातीनं पाहिला. 'रात्री किल्यांची दारे उघडावयाची नाहीत, असा हुकुम किल्लेदार किती कसोशीनं पाळतात हेराजांनी स्वत: अनुभव घेऊन पाहीले एका किल्यावर ते रात्री मुक्काम गेले दार उघडले गेले नाही.

''आधी लगीन कोंडाण्याचं''

शिवाजीराने आणि आईसाहेब जेव्हा राजगडा वरूईशान्येला पाहात, तेव्हा कोंडाणा आणि त्यवरचं हिरवं निशाण त्यांच्या डोळ्यात सलत असे. पण तो गड स्वराज्यात आणणं सोपं नव्हतं औरंगजेबाने अत्यंत धूर्ततेने या गडाची जबाबदारी उदयाभान राठोड नावाच्या कडव्या शुर आणि दक्ष अशा एका सरदारावर सापेविली होती, उदयभान खंबीरपणे कोंडायावर उभा होता. म्हणून काय झाले शिवाजीराजांनी कोंडाण्यावर उभा होता.

म्हणुन काय झाले! शिवाजी राजांनी कोंडाण्याच्या मोहिमेच्या विचार आपल्या विश्वासू सहकाऱ्यांसमोर मांडला मात्र एक भरदार देहयनटीचा वीर पुढे झाला तो विर म्हणजे तानाजी मालुसरे! वास्तविक यावेळी तानाजी आपल्या मुलाच्या रायबाच्या लग्नाच्या गडबडीत होता शिवाजी राजांनी हे ठाऊक होते ते म्हणालेही 'अरे तानाजी, पण तुझ्या रायबाचे लग्न काढले, आहेस ना तू?'' यावर तानाजी ताडकन म्हणाला, ''नाही महाराज, आता आधि लगीन कोंडाण्याचं मग माझ्या रायबाचं!''

''गड आला पण सिंह गेला!''

कोंडाण्याला वेठा घालून तो जिंकणे शक्य नव्हते. मग तानाजीनं तो कसा घ्यायचा? त्यालाही एक तोड होती खास मराठ्यांची ती योजना होती त्यांनी एक अपूर्व धाडस करायचे ठरवले.

ताणाजी आणि त्याच्या मावळ्यांचा, पूर्वी कोंडाणा स्वराज्यांत असताना, तिथल्या दगडांशी नी वाटांशी पूर्ण परिचय झाला होता. म्हणूनच पश्चिमेकडचा डोणागिरीचा कडा त्याना आठवला कसला भयानक, उघडाबोडका नी दुर्गम कडा तो! पण याचं ठरलं! रात्रीच्या काळ्याकुट अंधारात निवडक मावळ्यांना घेऊन तानाजी दोरखंडा वरून किल्ल्यावर गेला हळूहळू ही मंडळी पुढे सरकू लागली तेवढ्यात गडावरच्या पहारेकऱ्यांना चाहूल लागलीच आता सरळ हल्ला उठला उदयभान आणि तानाजी आपापल्या वीरासंह एकमेकाला भिडले. जीवघेणी हाणामारी झाली. दुदैवाने या झुंजीत तानाजी पडला पण कोंडाणा मात्र काबीज झाला गडआला पण सिंह गेला!

काळ घोटाळत होता:

पांचाडा थोरल्या आईसाहेबांच्या समाधीच दर्शन घेऊन आणि तिथं सुंदर वृक्षाची सावली निर्माण करण्याची आज्ञा देऊन आणि तिथं सुंदर वृक्षाची सावली निर्माण करण्याची आज्ञा देऊन महाराज गडावर परतले लगेच त्यांनी प्रतापराव गुजरांची लेक जानकी हिच्याशी राजारामरजांच लग्न लावून टाकलं लग्न अगदी जवळच्या मुहूर्तावर पण थाटात पार पडलं कारण — महाराजांना कसली चाहूल लागली होती की काय! त्यांच्या शारिरीक व्यथा बळावू लागल्या ज्वर हटत नाहीसा झाला. वैधराज प्रयत्नांची बराकाळा करीत होते. संपूर्ण विश्रांती औषधयोजना यांचा परिणाम मात्र दिसत नव्हता एवढे झाली तरी महाराज स्वस्थ होते. साऱ्यांना चिंतेन ग्रासलं होतं, काळ अवतीभोवती घोटाळत असल्याची जाणीव सर्वांना झाली होती. पण महाराज शांत होते!

'श्री—सां —ब —स —दा—शि—व'

एक दिवस सकाळी महाराजांनी वैधरांजांना म्हटलं, ''आम्हाला एक सोय करून हवी आहे. आमच्या पूजेतव शिवलिंग आणि बाण सतत डोळ्यासमोर राहिल असं आमचं आसन फिरवलं जाव!'' महाराजांची इच्छा ताबडतोब पूर्ण करण्यात आलली चौत्रातील शुध्द चतुर्दशी उजाडी ती अशी— तो सारा दिवस महाराज शांतपणे महालात पडुन एकटक शिवलिंगाकडे पाहात राहिले.

'श्री'सांब—सदाशिव!' ''श्री—सा—बं—स—दा—शिव—!' महाराजा खोलं खोल जाणाऱ्या आवाजात सतत म्हणत होते संबंध दिवस आणि रात्र अशाच अवस्थेत गेली आता पहाट होऊ लागली.

'परी कीर्ती रूपी उरावे!'

चैत्रातली पौर्णिमा हनुमानजयंतीचा दिवस! ''आम्ही लहान होतो ना, तेव्हा हनुमान जयंतीचा उत्साव आम्ही केवठ्या उत्साहानं साजरा करायचो'' महाराज काहीसे तुटक शब्दात बोलले, ''महाराजानी बोलु नये.'' असं वैधराज म्हणाले: ''जन्म होताच सूर्य घरायला हनुमानानं आकाशात झेप घेतली केवठा पराक्रम!'' एवढया बोलण्यानं ही महाराज थकले ग्लानी आणि सावधपण यांची पाठशिवणी होत राहिली अखेर महाराजांनी सर्वांना खुणेने महालाबाहेर जाण्याची सुचना केली शिवलिंगाकडे पाहून हात जोडले आणि महाराजांनी डोळे मिटले. आता!

कुठे काय? काय लिहायचं आतां?

अपार कीर्ती मागे ठवून प्रतापसुर्य मावळला होता!! ''आले किती? गेले कीती? उडुन गेले भरारा, संपला नाही आणि संपणार ही नाही... माझ्या शिवबाचा दरारा.

राजे असंख्य झाले आजवर या जगतीपण शिवबा समान मात्र कुनी न झाला गर्व ज्याचा असे या महाराष्ट्राला एकची तो राजे शिवबा झाला.

असा हा आदर्श पुत्र, कुशल संघटक रयतेचा वाली, दर्जनाचा कर्दनकाळ व सज्जनांचा कैवारी थोर राष्ट्रपुरूष ३ एप्रिल १६८० रोजी जनतेला दु:खी सागरात लोटून अनंतात विलीन झाला. ''जय भवानी जय शिवाजी''

—गायत्री संतोष अठाऊ

बी..ए.प्रथम

# सर्वव्यापी छत्रपती शिवाजी महाराज जीवन व कार्य

छत्रपती शिवाजी महाराज हे शुर, हुशार आणि दयाळू राज्यकर्ते होते. त्याच्या जन्म १९ फ ेब्रुवारी १६२१ रोजी महाराष्ट्राती शिवनेरी येथे मराठा कुटुंबात झाला. शिवाजींचे वडील शहाजी आणि व्यवहारात वीर स्त्री होत्या.

या कारणास्तव, त्यांनी रामायण महाभारत आणि इतर भारतीय शुर आत्म्यांच्या तेजस्वी कथा ऐकूण आणि शिकवून बाल शिवाचे संगोपन केले. लहानपणी शिवाजी आपल्या वयाच्या मुलांना गोळा जिंकण्याचा खेळ खेळत असे.

छादा कोंडदेव यांचरू अधिपत्याखाली ते सर्व प्रकारच्या युध्दशास्त्रात पारंगत झाले धर्म, संस्कृती आण राजकारण याबाबतही योग्य ते शिक्षण दिले गेले. त्या काळात परम संत रामदेव यांच्या संपर्कात येऊन शिवाजी पुर्णपणे देशभक्त कर्तव्यदक्ष आणि कष्टाळू योध्दा बनले. कुटुंब आणि गुरू : छत्रपती शिवाजी महाराजांचा विवाह १४ मे १६४० रोजी सईबाई, निंबाळकर यांच्याशी झाला. त्यांच्या मुलाचे नाव संभाजी होते. संभाजी हे शिवाजीचे जेष्ठ पुत्र आणि उत्तराधिकारी होते. ज्यांनी १६८० ते १६८९ इसवी पर्यंत राज्य केले. संभाजीच्या पत्नीचे नाव येसुबाई होते. त्याचा मुलगा आणि वारस राजाराम होता.

शिवरायांचे पराक्रम: तारूण्यात येताच त्याचा खेळ खरा कर्मशत्रूक बनला आणि शत्रुवर हल्ला करून त्यांने किल्ले इतर जिंकले पुरंदर, तोरण, यासारख्या किल्यावर शिवाजीने आपला अधिकार प्रस्थापित करताच त्यांचे नाव आणि कर्तृत्व सर्व दक्षिणेकडे पसरले ही बातमी आगीसारखी आगरा आणि दिल्लीपर्यंत पोहोचली अत्याचारी प्रकारचा यवन आणि त्याचे सर्व सहाय्यक राज्यकर्ते त्यांचे नाव ऐकुण घाबरून जात असे. शिवाजीच्या वाढत्या वैभवाने घाबरलेला विजापूरचा शासक आदिलशहा जेव्हा शिवाजींना कैद करू शकला नाही तेव्हा त्याने शिवजींचे वडील शहाजी याना अटक केली. हे कळल्यावर शिवाजींना राग आला. नीती आणि धाडस याच्या सहाय्याने त्यांनी छापा टाकला आणि लवकरच आपल्या वडिलांना या कैदतून मुक्त केले तेव्हा विजापूरच्या शासकाने आपला गविष्ठ सेनापती अफझलखान याला शिवाजींना जिवंत किंवा मृत पकडण्याचा आदेश देऊन पाठवले बंधुन्वाचे व सलोख्याचे खोटे नाटक खूप शिवाजी महाराजांना आपल्या गोटान घेवून जिवे मारण्याचा प्रयत्न केला, मात्र शिवाजींच्या हाती लपलेल्या वाघनखाला बळी **हो**ऊन तोच मारला गेला त्यामुळे त्यांचा सेनापती मृत झाल्याचे पाहून त्यांचे सैन्य पळून गेले. छत्रपती शिवाजी महाराज हे एक भारतीय शासक होते ज्यांनी मराठा साम्राज्याची स्थापना केली. शहाजीराचे हे अधिकार म्हणून जिजीच्या किल्यासमोर तळ देऊन होते. त्यांच्यावर कितुरीचा आरोप ठेवण्यात येऊन त्यांना कैद करण्यात आले (१६४८) आणि त्यांना विजापूरला आणण्यात आले या काळात पुरंदरच्या पायऱ्याशी शिवाजी महाराजांनी निकराचा लढा देऊन विजापूरचे सैन्य उधळून लावले (१६४८अखेर)सैन्याची इतर भागांतील आक्रमणेही परतवण्यात आली. शहाजी महाराजांना काय शिक्षा होईल, याची काळजी महाराज आणि जिजाबाई यांना पडली त्यावेळी दक्षिणेचा मोगल सुभेदार पहात होता. त्याच्याशी संपर्क साधण्याचा आणि त्याचा मार्फत विजापूरवर दडपण आणण्याचा प्रयत्न महाराजांनी केला. कोडाण्याचा किल्ला परत दया ही अट आदिलशहाने घातली. किल्ला परत देण्यास महाराज नाखूश होते तथापी सोनोपंत डबीर योने शिवाजी महारांजची समजूत घातली सिहगडचा किल आदिलशहाकडे परत करण्यात आला. त्यानंतर शहाजीची सुटका होऊन (१६४९) त्यांची बंगलोरला सन्मानाने रवानगी करण्यात आली. महाराजांचा हा डावपेज अफझलखानाला कळला नाही युध्दावाचूनच शिवाजी आपल्या हातात येणार, या भ्रमात तो राहिला. प्रत्यक्षात महारांजा कैद करून अगर ठार मारून ही मोहीम निकालात काढावी असा त्याचा हेतू होता. महाराज

आणि अफजलखन हे दोघेही परस्परांच्या हे तूविषयी साशंक होते. असे विविध साधनावरून दिसते महाराजांनी सैन्याची तो तयारी केली होती. घोडदळ आधिकारी नेताजी पालकर आणि पायदल अधिकारी मोरोपंत पिंगळे हे जय्यत तयारीनिशी येऊन महाराजांना मिळाले.

महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती त्यांचा जन्म मराठवाड्यातील भोसले या वतनदार घराण्यातील मालीजींचे पुत्र शहाजी आणि सिदखेडकर जाधवराव यांच्या कन्या जिजाबाई या दापत्यापोटी शिवनेरी किल्यावर झाला त्यांच्या जन्म तिथीविषयी एकमत नाही. मराठी बखरीच्या आधारावरून त्याचा जन्म १६२७ मधे झाला पण जेधे राकावली कवीद्र परमानंद याचे शिवभारत आणि राजस्थानात उपलब्ध चढय तृतीय शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० ही तारीख बहूतेक इतिहाससंशोधकांनी आणि आता महाराष्ट्र शासनानेही निश्‍चित केली आहे.

शिवाजी महारांचे पूर्जज चितोडच्या सिसोदिया घराण्यावंशातील आहे. असेही संशोधन पूढे आले आहे मालोजी हे या घराण्यातील पहिले होते. मालोजी हे निजामशाहीतील एक कर्तबगार सरदार होते. मालोजी व त्याचे बंधू विठोजी यांच्याकडे औरंगाबादजवळचे वेरूळ कन्नड व देऱ्हाडी हे परगणे मुकासा म्हणून होते. शहाजी पाच वर्षांचे असताना मालोजी मरण पावले त्यांच्या नावाची जहाजींच्या नावाने राहिली निजामशाहीच्या दरबारातील खंडागळेच्या हत्तीच्या प्रकरणावरून शहाजी व लखूजी जाधव यांच्यात वितुष्ठ आले, ने पुढे कायम राहिले शहाजींनी १६२० पासून निजामशाहीच्या बाजूने आदिलशाही विरूध्द लढण्यास सुरूवात केली होती. पण १६२४ मध्ये भातवाडीच्या लढाईत पराक्रम करूनही त्याचा सन्मान झाला नाही म्हणून ते आदिलशाहीस मिळाले; पण इब्राहीम आदिलशहाच्या मृत्यूनंतर ते पुन्हा निजामशाहीत आले निजामशाहीतील दरबारी कारस्थानात शहाजीचे सासरे लखूजी जाधव मारले गेले त्यामुळे नाराज होउन त्यंनी निजामशाहीची नोकरी सोडली त्या सुमारास त्याचा मोठा मुलगा संभाजी यांचा विवाह शिवनेरीचा किल्लेदार विखासराव यांच्या मुलीशी झाला होता. त्या निर्मित्ताने शहाजीनी जिजाबाईस शिवनेरीवर ठेवले होते. विजापूर सोडून त्यापैकी सईबाई निबालकर हिच्याशी त्यांचा प्रथम विवाह झाला त्यानंतर सोयराबाई मोहिते पुनळाबाई पालकर सकवारबाई गायकवाड, काशीबाई जाधव व सगुणाबाई शिर्के यांच्याशी त्याचा विवाह झाला याशिवाय इंगळे व आणखी एका घराण्यातील मुलीबरोबरही त्यांचा विवाहसंबंध झाला महाराजांना सईबाईपासून संभाजी(१६५७.८९) व सोयराबाईपासून राजाराम (१६७०.१७००) असे दोना मुलगे झाले याशिवाय त्यांना सहा कन्याही होत्या सईबाई १६५९ मध्ये मरण पावल्या १६७४ पुतळाबाई महाराजाबरोबर सती गेल्या सोयराबाई संभाजीच्या कारकीर्दीत १६८१ मध्ये आणि सकवारबाई शाहूच्या कारकीर्दीत मरण पावल्या महाराजांनी पुण्याच्यापरिसरातील मोकळ्या टोकड्या पडके किल्ले, दुर्गम स्थळे हळूहळू आपल्या ताब्यात आणली राजगड आणि तोरणा किल्ला प्रचंडगड महाराजांनी हस्तगत केला. महाराजांना येऊन मिळालेला अनुयायांत पुढे प्रसिध्दीस आलेली कान्होजी येधे नेताजी पालकर (समकालीन कागदपत्रानुसार नेतोजी पालकर) तानाजी मालुसरे, येसाजी, कंक, बाजीप्रभु देशपांडे, बाजी पासलकर इ. नावे आढळूनयेतात भोरजवळ रीहीडेश्वरासमोर स्वराज्यानिष्ठेची शपत घेतल्याची कथा ही याच सुमारास असावी जी स्थळे आपण घेतली ती विजापूर राज्यातील सुरक्षितता कायम रहावी या हेतुनेच, अशी भूमिका महाराजांनी घेतली विजापूर दरबारनेही सुरूवातीस महाराजाच्या या चळवळीकडे फारसे लक्ष दिले नाही; पण महारांजानी कोडाण्याच (सिंहगडाच्या) किल्ले दाराला आपले से डोळे उघडले महाराजांच्या विरूध्द विजापूरचे सैन्य चालून गेले दक्षिणेत विजापूरच्यासैन्यात गेल्यामुळे मुहंमद आदिलशहा शहाजीवर रूष्ट झाला होता. आदिलशाही विरूध्द गेलेली आणि लखुजींच्या मृत्युमुळे निजामशाही सुटलेली अशा अवस्थेत शहाजींना परागंदा होण्याची वेळ आली. अखेल

आदिलशहाच्या बोलवण्यावरून ते १६३६ मध्ये त्याच्या नोकरीत शिरले आदिलशहाने त्यांच्याकडे पुण्याची जहागीर बहाल केली व मोठा हुद्दा देऊन कर्नाटकाच्या मोहिमेवर पाठविले विजापूरच्या सैन्याने १६३८ च्या अखेरीस बंगलोर काबीज केले तेव्हा बंगलोर येथे कायमचे राहू लागले.

शिवाजी महाराजांचे बालपण शिवनेरी माहूली व पूणे येथे गेलेले दिसते बंगलोरलाही ते काही काळी राहिले शिवाजी आणि जिजाबाई यांच्याकडे महाराष्ट्रातील जहागिरीची प्रत्येक्ष व्यवस्था पाहण्यासाठी शहाजींनी दादोजी तथा दादाजी कोंडदेव आणि काही विश्वासू सरदार यांची नेमणूक केली. जिजाबाईचा देशाभिमान—करारीपणा आणि कठीण प्रसंगातून निभाऊन जाण्यासाठी लागणारे लागणारे धैर्य, या त्यांच्या गुणांच्या तालमीत शिवाजीराजे तयार झाले. त्यांच्या या शिकवणीतून शिवाजीराजांना स्वराज्यस्थापनेची स्फूर्ती मिळाली. आपल्या जगागिरीच्या संरक्षणासाठी गड, किल्ले आपल्या ताब्यात असेल पाहिजेत ही जाणीव त्यांना बालपणापासून झाली दादोजी कोंडदेव यांच्या मृत्युनंतर शिवाजीराजांनी प्रत्यक्ष कारभार हाती घेतला त्यांनी गड आणि किल्ले आपल्या ताब्यात घेण्यासाठी अनेक मोहिमा आखून यशस्वी रीत्या पार पाडल्या या कामात त्यांना आपल्या मातोश्रीचे आर्शीवाद होतेच.

शिवाजी महाराजांनी आपल्या उपक्रमाची सुरूवात सावघजमविले आणि देशमुख देशपांडे वतनदार इत्यादीशी त्यांनी निरनिराळ्या प्रकारे संबंध जोडले शिवाजी महाराजांना आठ पत्नी असल्याचे उल्लेख मिळतात.

म्हणून त्यांना एक अग्रदूत वीर आणि अमर स्वातंत्र्य सेनानी मानले जाते. वीर शिवाजी हे राष्ट्रवाचे जिवंत प्रतीक होते. या कारणास्तव त्यांची भूतकाळतील राष्ट्रीय पुरूषांमध्ये गणना केली जाते. अष्टपैलुत्वाचे समृध्द असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजाची जयंती महाराष्ट्रात १९ फेब्रुवारी साजरी होत. असली तरी अनेक संस्था हिंदू कॅलेडरमध्ये येणाऱ्या तारखेनुसार शिवाजी महाराजांची जयंती साजरी करतात. त्यांच्या शौर्यामुळे ते एक आदर्श आणि महान राष्ट्रपुरूष म्हणून स्वीकारले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांचे तीन आठवडयाच्या आजारानंतर रायगडावर ३ एप्रिल १६८० रोजी निधन झाले.

उपसहार : शिवाजींवर मुस्लिमविरोधी असल्याचा आरोप असला तरी हे खरे नाही कारण त्यांच्या सैन्यात अनेक मुस्लिम वरी आणि लठवरये होते. आणि अनेक मुस्लिम सरदार आणि सुभेदारासारखे लोकही होते. खरे तर शिवाजींचा सर्व संघर्ष हा धर्मादाना आणि अहंकाराविरूध्द होता.

जिजाऊ शिवरांयाच्या मनात स्वराज्याची बीजे पेरली छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राची अस्मिता आणि महाराष्ट्राचा अभिमान आहेत. त्यांचे व्यक्तिमहत्व अष्टपैलू होते. राजा कसा असावा? त्याने राज्य कसे सांभाळावे, नीती कशी मांडावी? कुंटुब आणि प्रजा यांची सांगड कशी घालावी हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

छत्रपती शिवाजी महाराज हे पराक्रमी राजा होते त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आजही अंगावर शहारे आणतात. जसे की जावळीवर स्वारी, अफजलखानचा वघ, शाहिस्तेखानाचा पराभव, पुरदरचा तह, आग्राहून सुटका, शिवराज्याभिषेक इ. शिवरायांनी गनिमी काव्याचा वापर करून अनेक लखया जिकल्या रयतेला सुखी केले. परस्त्रीला मातेसमान मानले: स्वत: चा विचार न करता रयतेसाठी झटले. छत्रपती शिवाजी महाराज्य हे कुशल संघटक, जाणता राजा

तसेच रयतेचा राजा होते, म्हणून म्हणावेसे वाटते की ‘‘झाले बहू होतील बहु.... परंतू शिवरायांसाख्या कोणी नाही.’’

जय श्री छत्रपती शिवाजी महाराज!

जय जिजाऊ, जय महाराष्ट्र

स्वतंत्र साम्राज्याचे स्वप्न साकार करणारे स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजीराजे भोसले हे एक थोर कर्तृत्ववान पुरूष होते. त्यांनी शून्यातून केलेली स्वराज्य निर्मिती ही सर्वासाठी प्रेरणादायी आहे. शिवाजी महाराज हे आदर्शवत स्वराज्य कारभार करण्यात यशस्वी ठरलेले महाराष्ट्राचे पहिले छत्रपती आहेत शिवरायांचा जन्म फाल्गुन वदय तृतीय  शके १५५१ या दिवशी म्हणजे १९ फेब्रुवारी १९३० रोजी राजमाता जिजाबाईच्या पोटी जुन्नर तालुका तील म्हणून कार्यरत होते. शिवरायाचे बालपण हे अति संस्कारीक असे घडले होते बालपणाची सर्व वर्ष ही नीतिमत्ता, राज्यव्यवस्था, युध्दकला, गनिमी काव्य आणि घोडेस्वारी शिकवण्यात गेली. कधीकधी आसपास राहणारी मावळ्याची मुले शिवरायांबरोबर खेळत असत. मावळे हेच शिवरायांचे प्रथम सवंगडी होते. त्यातूनच मग पराक्रम आणि प्रजादक्षता असे गुण लहानपणीच शिवाजींच्या अंगी बागवले गेले. शहाजीराजे सतत मोहिमेवर असत पण वेळ मिळाल्यास ते श्यिावरायांना वाचन, युध्दकला शिकले. शिवरायंचे लग्न किशोर वयातच झाले होते. जिजांऊ फलटणच्या नाईक निबालकर घराण्यातील सईबाई हिला भोसले घराण्याची सून म्हणून पसंत केले शिवराय मोठे होताना त्यांना  परकीय सत्ताचा रयतेवर होणारा छळ अनुभवता येत होता. त्यामुळे त्यांनी रयतेस्वराचा मंदिरात स्वराज्य निर्मितीची प्रतिज्ञा घेतली. आदिलशाही, निजामशाही आणि मुघल सत्ता यांच्या विरोधात शिवरायांना लढावे लागणार होते. स्वराज्य निर्मितीची मूहूर्तमेढ म्हणून त्यांनी किल्ले तोरणा अत्यंत लहान वयात जिकंला. त्यानंतर स्वराज्यावर आलेल्या प्रत्येक संकटाला अत्यंत धैर्याने तोंड देण्यात महाराज यशस्वी ठरले ‘‘अफजलखान वध’’ ‘‘शायीस्ते खानाची बोटे कापणे’’ या प्रसगांतून त्यांचा पराक्रम दिसून येतो. स्वकीय शत्रुना देखील शिवरायांनी चांगलाच घडा शिकवला. याव्यतिरिक्त पुंरदरचा तह, दिल्लीतील औरंगजेब भेट आणि तेथून सुटका, या बिकट प्रसंगात संयम आणि धैर्याने केलेला मुकाबला सर्वज्ञान आहे.

शिवराज्यांना स्वराज्य निर्मिती करता आली ती म्हणजे मावळे आणि योग्य सायीदारांच्या सोबतीने! प्रत्येक प्रसंगात मावळे जिकीरीने पुढे आले आणि शिवरायांसाठी पर्यायाने स्वराज्यासाठी प्राणाचे मोल चुकवले. तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, प्रतापराव गुजर व मुरारबाजी हे शुरवीर तर स्वराज्याच्या स्वप्नासाठी धारातीर्थी पडले. इ.स.१६७४ मध्ये शिवरायांचा राज्यभिषेक करण्यात आला. संपूर्ण महाराष्ट्रातील रयतेला राजा छत्रपती मिळाला होता राज्यकारभार व्यवस्थीत चालवण्यासाठी शिवरायांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन केले. स्वराज्याचे चलन सुरू केले. आरमार व्यवस्था सुयोग्य कर वसुली गड किल्ले सुरक्षा आणि विविध पर्यावरणीय मोहिमा राबवल्या.

शिवजीराजे असताना त्यांच्या पाठीमागे छत्रपती संभाजी महाराज घडवण्यात शिवराय आणि राजमाता  जिजाऊ यांना यश आले होते. तसेच स्वराज्याच्या शाखा संपूर्ण दक्षिण भारतात पसरवण्याऱ्या छत्रपती शिवाजी राजे सकल झाले होते आता परकीय सत्तानी शिवरायांने स्वराज्य अस्तित्व मान्य केले होते. छत्रपती शिवाजी महारांजाची गाथा आणि पराक्रम सर्वत्र ऊयुगपुरूषाची प्राणज्योत मालवली असा हा प्रजादक्ष राजा, राष्ट्रपुरूष शिवाजी महाराज

स्वत: च्या कर्तृत्वाने आणि पराक्रमाने ‘‘ छत्रपती म्हणून अनंत काळासाठी आजरामर झालेला आहे.

महाराजांना मुघलाबरोबर लगेचच संघर्ष नको असला तरी पुरंदरच्या तहात मुघलांना दिलेली किल्ले आणि प्रदेश परत मिळवणे हे महाराजाचे उद्दिष्ट होते. त्यासाठी त्यांनी एक व्यापक व घडाडीची योजना तयार केली. एका बाजूला निरनिराळ्या किल्यावर जय्यत तयारीनिशी सैन्य पाठवून ते किल्ये ध्यायचे तर दुसऱ्या बाजूला दख्खनमध्ये मुघलांच्या प्रभुत्वाखाली असलेली प्रदेशावर हल्ले करून त्यांना अस्थिर ठेवायचे असे हे धोरण होते. यानुसार त्यांनी मुघलाच्या अहमदनगर आणि जुन्नर या प्रदेशांवर हल्ले केले पुढे एकापाठोपाठ सिंहगड, पुंरदर, लोहगड, माहूली, कर्नाळा, आणि रोहिडा हे किल्ले जिकून घेतले यानंतर शिवाजी महाराजांनी दुसऱ्यांदा सुरतेवर स्वारी केली. तेथून परत येताना नाशिक जिल्ह्यातील वणी दिडोंरी या ठिकाणी त्यांचा मुघलाबरोबर मोठा संघर्ष झाला या संघर्षात त्यांनी दाऊदखान या मुघल सरदाराचा.

शिवाजी महाराजांचे बालपण जेथे गेले त्या पुण्यातील लाल महालावर गुप्तपणे छापा घालण्याची घाडसी योजना आखली त्यानुसार ५ एप्रिल १६६३ रोजी महाराजांनी रात्रीच्या वेळी निवडक सैन्यासह लाल महालावर छापा लातला या छाप्यात शायिस्तेखानाची बोटे तुटली. त्याची मानहानी झाली. त्याने पुणे सोडले आणि आपला मुक्काम औरंगाबादला हलवला या प्रकारामुळे त्याने औरंगजेबाची नाराजी ओढवून घेतली औरंगजेबाने त्यास बंगालच्या सुभ्यावर पाठवले. शायिस्ताखानवरील या यशस्वी हल्याचा परिणाम लोकांवरही झाला. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वावरील प्रजेला विश्वास अधिकच वृदाघिंगत झाला. शायिस्ताखानाने तीन वर्षांच्या काळात स्वराज्याचा बराच प्रदेश उध्वस्त केला होता. त्याची भरपाई करणे आवश्यक होते. त्यासाठी महाराजांनी मुघलांना धडा शिकवण्याची एक योजना आखली मुघलांच्या ताब्यातील सुरत हे एक मोठे व्यापारी केंद्र व बंदर होते. तेथे इंग्रज डच, व फ्रेंच याच्या वखारी होत्या हे शहर बादशाहाला सर्वात जास्त महसूल देत होते तसेच ते आर्थिकदृष्टया संपन्न होते म्हणून त्यांनी सुरतेवर स्वारी केली, सुरतेचा सुभेदार इनायतखन महाराजांच्या स्वारीचा प्रतिकार करू शकला नाही सामान्य प्रजेस त्रास न देता त्यांनी सूरतेमधून विपूल संपत्ती मिळवली त्यांची ही मोहीम यशस्वी झाली. यामुळे आंरगजेब बादशाहाच्या प्रतिष्ठेस धक्का बसला शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालीचा बंदोबस्त करण्यसाठी औरंगजेबाने मिर्झाराजा जयसिंग हा आपल्या अनुभवी आणि मातब्बर राजपूत सरदार पाठवला, विरोधात सर्व शक्ती संघटित करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू केले. गोव्याचे व वसईचे पोर्तूगीज वेगुल्याचे डच, सुरतेचे इंग्रज.प्रतापगडा भोवतालच्या डोंगरात मराठ्यांची पथके ठिकठिकाणी मोक्यावर ठेवण्यात आली. वाईहून प्रतापगडकडे जाताना महाराजांनी अफझलखान आणि त्याचा सरंजाम यांची मोठी बडदास्त राखली. अफझलखाने जड सामान बाईला ठेवले होते. प्रतापगडाजवळ ठरलेल्या स्थळी शामियाने उभारून अभयतांच्या बाहेर दहा शरीररक्षक आणावेत त्यांना शामियानाच्या बाहेर ठेवावे, प्रत्यक्ष शामियान्यात दोघांचे वकील आणि दोन रक्षक असावेत असा करार झाला भेटीपूर्वी भेट अयशस्वी झाली तर काय करावे. या संबंधी शिवाजी महाराजांनं सर्वांना योग्य त्या सूचना दिल्या होत्या पदमानंदाने शिवभारता महाराजांना अंबाबाईची कृपादृष्टी लाभली आणि त्यांचा आत्मविश्वास वाढला इ. वर्णन केले आहे.

—कु.निलाक्षी महल्ले

बी.ए.भाग १

## —: वेचलेले मोती :—

प्रथम पुजा आराध्य दैवत श्री गणेशाची!

धन्य ती संस्कृती भारत देशाची!!

अर्जुनाच्या रथावर श्रीकृष्ण सारथी!

होऊन गेले रथी —महारथी!!

२२ जुनला  जन्मला जसा शिंपल्यातुन मोती!

चमकला तेजस्वी हीरा द्वीगुणीत झाली वसुंधरा!!

सर्व कपीलेश्वराच्या हाती, गल्लीतुन दिल्लीत जाउन वाढविली कीर्ती!

तोच जुळविते नाती, गोती, धन्य झाली पिंजरची माती!!

## हरी ओम

जितात्मन प्रशास्तस्य The Higher self पदोपदी सरळे निखारे  आपल्या आयुष्यापुढे कष्ट, करूनी, त्रास सोसूनी धावले ध्येययाचा मार्गाकडे

कधी न थांबले विश्रांतीस्तव फिरूनी पाहीले न मागे!

जिवनांत एकचि लक्ष, प्रिती आणि किर्तीचे धागे!!

पायतळी होतसे अंगार, धावले पुढेच पुढे!

घेतले संघर्षाचे — जिवन प्रकाशाचे धडे!

रात्रीनंतर उदयाचा उष:काळ, मनांत घेतली प्रिती आणि किर्तीची ढाल त्यातुनच किर्ती घडे त्यातुनच किर्ती घडे!!

भाऊसाहेब तुम्ही झींजलात चंदनासम, मातीलाही गंध!

अंधारातिल ज्ञानप्रकाशाचा केला दीपस्तंभ!!

भाऊसाहेब तुमचे आठवतात गोड शब्द!

रमले तुमच्या संगतीने झाले मी लुब्ध

एक एक सुर तुमचा म्हणजे अमृताचे बोल

तुमचीच प्रेरणा घेऊ, आमचे जिवन झाले सार्थक, अनमोल

वळवुन अक्षरांना केल तुम्ही शहाणे

भारावूनि गेलो त्या गोड आठवणीने!!

आठवण येता तुमची — आमची गहीवरतात मने!

मनापासुन वाहतो तुम्हाला भावसुमने!!

तुमची किर्ती महान अधिक वृद्धींगत होवो!

राहो चंद्रसुर्याचा साक्ष—पुढील जिवनांत तुम्हाला मीळो परममोक्ष!!

:मुठ्ठी पकडके आता है। हात पसारे जाता है:

''हीच दृष्टी''

''इवलसं रोप लावियले व्दारी। त्याचा वेलु गेला गगनावरी।।''

लावला ज्ञानप्रकाशाचा अमृतवेल, निर्माण झाली गोड रसाळ फळं निश्चयाचे मिळाले बळ, कर्मयोगाने सिद्ध झाले स्थळ कपीलेश्वरा पासी।। कपिलेश्वरापासी कृपा, उदेभानजीचा आशिर्वाद, — यमुनाबाईचा हृदयस्पर्श, बंधु गोविदराव, पाडुरंगजी उभे पाठीशी जनतेची सदिच्छा, प्रयत्नाची पराकाष्टा, रा.स्व.सघांचे संस्कार, गाठीशी।। मोती — पुष्पाचा संगम, सरस्वती देवीची साथ, गावातील संपर्क विश्वस्त मंडळाचा सहयोग, विकासाची धुंद, उज्वल भविष्य, सु—बोधाचा वर्षाव, ''श्री'' ची इच्छा, प्रज्वलीत केला दिप, प्रेमाचा सागर, विद्येचे आगर, धरला पुण्याचा मार्ग जिवनांत आला बहर

''देह हा नश्वर आहे। आत्मा हाच इश्वर आहे।''

जनतेचा आशिर्वाद अटलजीची साथ उभा केल सु.शि.प्रसारक मंडळाचा माहुळ १९६१ साली स्थापना लागली ज्ञानप्रकाशाची चाहुल १९६५ विरोधांत असून सुद्धा शदरचंद्रजी पवार मुख्यमंत्री पडले पिंजरला पाऊल भाऊसाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व, कठीण प्रसंगात अनुभव गाठीशी, पायी चाळून (अजनी ते राहीत) कारंज्यात कष्ट करून मोळया, पाणी भरून वार करून शिक्षणासाठी फिरले वणवण। रा.स्व.संघाचे संकेत सर्वाना सुसंस्कार देवून बाबासाहेब आंबेडकराना अभिप्रेत आत्मचितंन सुविचाराचं मंथन, स्विकारले संजिवनी विद्या। सकारात्मक विचाराने वाढले मनोबल जनसेवेचं व्रत घेतलं आयुष्यभर, सरपंच भु.वि.अध्यक्ष, आमदार, खासदार, मंत्री — सुरवात गोड शब्द जनसेवा हीच इश्वरसेवा होय. नेहमी कर्तव्यात दक्ष। सुसंगतीचं संघटन, किर्ती संपुर्ण भारतभर हेच अंतिम लक्ष।''

**श्री भाऊराव पाटील महल्ले**

**शेलू (महल्ले)**